सिद्धान्तरहस्य

(मराठी)

Rs 15--.

प्रकाशक

श्री पीताम्बरापीठ संस्कृत परिषद्, दतिया (म. प्र.)

ॐ

सिद्धान्त-रहस्य

अर्थात्

सिद्धान्त रत्न मणिमाला

राष्ट्रगुरु श्री १००८
श्री स्वामीजी महाराज

अनुवादक

डॉ. स. मो. अयाचित
एम. ए. पीएच. डी. वेदान्त विशारद
नागपुर विद्यापीठ

– प्रकाशक –
श्री पीताम्बरापीठ संस्कृत परिषद्
वनखण्डेश्वर, दतिया (म०प्र०)

प्रकाशक :

श्री पीताम्बरापीठ संस्कृत परिषद्,

वनखण्डेश्वर, दतिया (म० प्र०)

मराठी

प्रथम संस्करण १०००

मूल्य : ५ रु०

१ ऑगस्ट १९८३

मुद्रक : **शिवशक्ति प्रेस प्रा० लि०**

बैद्यनाथ भवन, ग्रेट नाग रोड, नागपूर–९

प्राक्कथन

'सिद्धांतरहस्य' या पुस्तकाचे हे दुसरे संस्करण संशोधित आणि संवर्धित स्वरूपात परमपूज्य श्री १००८ श्री स्वामीजी महाराजांच्या असीम अनुकंपेमुळे मानव समाजाच्या कल्याणार्थ प्रकाशित केले जात आहे. या पुस्तकाचे पहिले संस्करण १९३८मध्ये दतिया येथील भक्तजनांच्या प्रयत्नांनी प्रकाशित झाले होते. पुस्तकाच्या जवळ जवळ अडीचशे प्रति मुद्रणालयात शिल्लक राहिल्या होत्या. १९४४ मध्ये डिस्काउंट बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकत्वाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी मी झाशी येथे गेलो. त्या वेळी माझ्या पूर्वजन्माचे पुण्य उदयास आले आणि आमचे परम मित्र स्वामी रामतीर्थजींचे भक्त बाबू दीनदयाल मला घेऊन दतिया येथे गेले. त्या ठिकाणीच पहिल्यांदा श्री १००८ श्री स्वामीजींचे दर्शन झाले. नंतर मग कृपादृष्टि झाली आणि महाराज 'अध्यात्म ज्ञान विश्वविद्यालय' स्थापन करण्यासाठी झाशी येथे आले गोपाल बागेत एक महिनाभर झाशीवासियांना सत्संगाचा लाभ झाला. त्याच सुमारास मी सिद्धांत-रहस्याच्या शिल्लक राहिलेल्या प्रति विकत घेतल्या.

मी सिद्धांतरहस्य अनेक वेळा वाचले, परंतु मला मूर्खाला ते समजले नाही. दुसऱ्यांचे तरी कल्याण व्हावे या पवित्र भावनेने मी जिज्ञासु वाटणाऱ्या लोकांना पुस्तक भेट म्हणून देऊ लागलो. अशाच प्रकारे मी सिद्धांतरहस्याची एक प्रत आपले संबंधी संत महात्म्याच्या संत्संगात रुचि असणाऱ्या रामदासजींना दिली होती. त्यांनी हे पुस्तक वृन्दावनच्या एका ब्रह्मचारीजींना दिले. जवळजवळ तीन वर्षानंतर हे ब्रह्मचारीजी फरुखाबाद जिल्ह्यातील ढाईघाट येथे गंगेच्या तटावर असलेल्या रामनगरीत आकस्मिकपणे रामदासजींना भेटले, तेव्हा गद्‌गद होऊन त्यांचे आभार मानू लागले म्हणाले की सिद्धांतरहस्य या पुस्तकाने माझे कल्याण झाले.

त्यात लिहिलेल्या योगाच्या साधना पद्धतीचा अभ्यास केल्याने माझी कुंडलिनी जागृत झाली. मला सिद्धि प्राप्त झाली. या गोष्टीचे रामदासजींना आश्चर्य वाटले व त्यानी परीक्षा घेण्याचा विषय काढला. तेव्हा ब्रह्मचारी म्हणाले, 'प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणेच आपल्या पश्चात् घडणाऱ्या सर्व घटना मला समजतात.' मग ठरले की त्यांनी एका ठिकाणी राहावे. त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी एका माणसाला बसविले. रामदासजी स्वतः तेथून दूर निघून गेले. ते तेव्हा परतले जेव्हा ब्रह्मचारीजींनी रामदासांनी केलेल्या सर्व उद्योगाचे सविस्तर वर्णन केले.

रामदासजींनी मला जेव्हा हे सांगितले तेव्हा माझे डोळे उघडले, आणि पुस्तकाचे महत्त्व माझ्या ध्यानात आले. पण त्यावेळी पुस्तकाच्या प्रति संपल्या होत्या. पुस्तकाचे दुसरे संस्करण तयार करणे अवश्य होते. मी श्रीचरणांना प्रार्थना केली की दुसरे संस्करण प्रकाशित करण्यास अनुमति द्यावी. परमदयाळु महाराजांनी जीवांच्या उद्धारासाठी पुस्तकात लययोग हा विषय वाढवून छापण्याची आज्ञा केली. असे हे संशोधित व संवर्धित दुसरे संस्करण भक्तजनांच्या सेवेस प्रस्तुत केले जात आहे.

परमपूज्य स्वामीजी महाराजांच्या तपस्याकालातील उपलब्धीचे सैद्धांतिक विवेचन पुस्तकात शब्दबद्ध केले आहे. 'गागर में सागर' या म्हणीप्रमाणे सर्व आध्यात्मिक गूढ रहस्यमय साधना पद्धतींचा हा कोषच आहे. वाचून समजण्याची दृष्टि आणि विवेक त्यांच्या दयेवर अवलंबून आहे.

या दुसऱ्या संस्करणाच्या समाप्तीचे पूर्ण श्रेय भाई रामेश्वरजींचे आहे कि ज्यांनी सतत प्रयत्न चालू ठेवले. मी श्री पीतांबरापीठाच्या सर्व भक्तमंडळींचे आभार मानतो. त्यांच्याच भक्ति-श्रद्धा आणि सेवा प्रसाद स्वरूपात त्यांच्या या सेवकाला प्रकाशनाची आज्ञा झाली.

अध्यक्ष

अधिकारी प्रेस, फत्तेहगढ (उत्तर प्रदेश)



भगवती

श्री पीताम्बरा बगला

परिचय

परमदयाळु श्रद्धेय श्री १००८ श्री स्वामीजी महाराजांनी कलिकाल कलुषित दु:खाकुल मनुष्यांचे कष्टनिवारण होण्यासाठी सिद्धांतरहस्य ग्रंथ रचण्याची कृपा केली. शास्त्रातील बहुतेक सर्व विषयांचा समन्वय करून महाराजांनी यात विविध सिद्धांतांच्या रहस्यांचे स्पष्ट वर्णन केले आहे.

ब्रह्माची सत्ता आणि त्याच्या मायेने निर्मिलेले हे विश्व-ब्रह्मांड हा गूढ रहस्याचा विषय आहे. सिद्धांतरहस्य ग्रंथाचा विषय रहस्यपूर्ण आहेच, पण त्याचे लेखक परमपूज्य स्वामीजी महाराज स्वत: देखील एक रहस्यच आहे. गीताकार श्रीकृष्णाप्रमाणे महाराजांचे जीवन आणि लीला दोनही परम रहस्याचा विषय आहे. कोणालाही माहीत नाही की महाराज कोण आहेत ? त्यांना काही नाव आहे की नाही ? जन्म, कुल, जन्मस्थान इत्यादींचा कुणालाही पत्ता नाही !

झाशीमध्ये गोपालबागेत १९४४ सालच्या एका रात्री भावावेशात महाराज आपल्या जीवनातील एका विशेष घटनेचा वृत्तांत सांगून गेले, गेले, आणि एकदम गप्प झाले. त्यांच्या मौनधारणाच्या रहस्याचा बोध झाला तर मग काहीही जाणण्याचे शिल्लक राहणार नाही असे मला वाटते. वृत्तांत सांगितल्यावर मला सक्त ताकीद दिली की मी तो कुणालाही सांगता कामा नये. त्याच घटनेमुळे पूज्य स्वामीजी महाराजांची मंत्रशास्त्राकडे प्रवृत्ति झाली.

सिद्धांतरहस्याचा विषय समजण्यासाठी त्याच्या प्रभावी लेखकाचा थोडा परिचय लोककल्याणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. जिज्ञासु वाचकवर्गामध्ये यामुळे श्रद्धा, भक्ति व विवेक जागृत होऊ शकेल. त्यांच्या स्तुतिपर काही लिहिणे मज अल्पज्ञाच्या हातात नाही. त्यांच्या विषयी

ज्याला जितकी माहिती आहे. त्याला असे वाटते की आपल्याला सर्वात अधिक माहिती आहे. श्रीचरणांपाशी माझ्या सारख्या अकिंचनाची पोच फार कमी आहे, पण जेव्हा केव्हा भेट होते तेव्हा पवित्र अशा लोककल्याणाच्या भावनेने जातो. जे जप-तप घडते ते केवळ यासाठी की मंत्रशक्तीच्या बळावर आणखी जास्त सार्वजनिक सेवा घडावी.

परमपूज्य स्वामीजीमहाराजानी काशी येथे संस्कृतविद्येचे अध्ययन केले. अठराव्या वर्षीच त्यांना तेथेच विरक्ति प्राप्त झाली. जगद्गुरु शंकराचार्यानी प्रतिपादन केलेल्या ज्ञान- मार्गाची दीक्षा घेऊन ते संन्यस्त झाले. दंडी स्वामी झाले. फिरत फिरत पंजाबात गेले. तेथे एका महंताकड़े उतरले होते. त्याच ठिकाणी त्याना मंत्रशास्त्रात प्रगति करण्याची आंतरिक प्रेरणा झाली. त्याना असे वाटले की, ही सुद्धा एक अद्भुत विद्या आहे, तिचा शोध करावा. ते गिरिकंदरातून गुहातून भ्रमण करीत राहिले जिथे कुठे कोणी मंत्र-तंत्र विद्येच्या जाणकाराचा पत्ता लागला तेथे गेले, हस्तलिखित ग्रंथांचा शोध केला, परंतु सांगणारा कोणीही मिळाला नाही. स्वामीजी महाराज घोर तपस्येत प्राणपणाने व्यग्र राहिले. कधी कधी कित्येक दिवस उपाशी राहावे लागे, पण कधीही कुणाला सांगितले नाही.

फिरत फिरत दतियाला पोहोचले. काही काळ गेल्यावर वनखंडेश्वर येथे आले. त्यावेळी महाराजांच्या पायाला जखम झाली होती. चालणे फिरणे कठिण झाले होते. स्थान अतिशय भयानक होते. कोणीही रात्री त्या ठिकाणी थांबत नसे. परंतु स्वामीजींना भय कोठले ? ते भयाच्या पलीकडे गेले होते. महाराजांवर रात्री व्याधींचे भीषण आक्रमण होत असे. परंतु महाराज साधनेपासून विचलित झाले नाहीत. त्यांनी वनखंडेश्वरात ईश्वराला आवाहन केले, व 'श्रीपीतांबरापीठ स्थापन झाले' असे म्हणून महाराजांनी मौन धारण केले.

नंतर जे काही घडले ते शब्दबद्ध होऊ शकत नाही. तो स्वानुभवाचा विषय आहे साधना करूनच तो आनंद प्राप्त होऊ शकतो. गीतेच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास त्यासाठी चर्मचक्षु नव्हे तर दिव्य चक्षुच हवे,

म्हणजे निर्मल, निश्चल मन हवे. हेच रहस्य सिद्धांतरहस्य पुस्तकाच्या स्वरूपात प्रकट करणारे परमपूज्य स्वामी जी महाराजच कोणत्या साधकाला कोणत्या साधनापद्धतीने लाभ होऊ शकेल हे ठरविण्यास समर्थ आहेत. ध्येय एकच आहे, पण तेथे पोचण्यास वेगवेगळे मार्ग असू शकतात. मानव मात्राला त्याच्या त्याच्या पूर्वजन्मीच्या संस्कारानुसार आणि वर्तमान जीवनातील परिस्थितीच्या आधारानेच साधनापद्धति सांगितली जाते.

'सिद्धांतरहस्य' सार्वभौम सनातन सिद्धांतांचे प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदांप्रमाणे समस्त मानवतेच्या कल्याणासाठी ग्रथित केले आहे. या रहस्याची योग्य ओळख परम गुरुदेवच करून देऊ शकतात. गुरुकृपे-वाचून ते शक्य नाही. हेच परम रहस्य आहे.

प्रयागनारायण श्रीवास्तव

अध्यात्मज्ञान विश्वविद्यालय परीक्षा परिषद्,

४६ ए बेली मार्ग, नया कटरा, अलाहाबाद–२

भूमिका

या मायिक संसारात मानवजीवन दुर्लभ आणि क्षणभंगुर आहे हे लक्षात घेता प्रत्येक मनुष्याचे हे मुख्य कर्तव्य आहे की त्याने आत्म-कल्याणाचा सतत प्रयत्न करीत असावे. कल्याणप्राप्तीचे जे मार्ग आणि जी साधने आपल्या त्रिकालदर्शी पूज्य ऋषि-महर्षींनी शास्त्रात सांगितली आहेत त्यांची वास्तविक रहस्ये पूर्णपणे हृदयात ठसवून घेऊन तद्नुसार चालले तर साधकाला निश्चितच अभ्युदय आणि निःश्रेयस यांची प्राप्ति होऊ शकेल. परंतु शास्त्रामध्ये अनेक संप्रदाय आणि विभिन्न मतमतांतरांची विचित्र वर्णने, तसेच अपूर्व प्रतिपादन असल्यामुळे त्यांचे यथार्थ स्वरूप महात्म्यांच्या खेरीज इतरांना समजणे कठिण आहे. पुनः वर्तमान वातावरणाच्या प्रभावाने श्रद्धा-विश्वासावरील वाढलेल्या उणीवेमुळे शास्त्रांच्या उपदेशानुसार वागणे तर दूरच राहिले, उलट तो काल्पनिक आणि निर्मूल असल्याचे सांगून त्याची चेष्टा केली जाते.

अशा स्थितीत मनुष्याला सत्याचे पूर्ण रहस्य निश्चित करणे शक्य होत नाही. त्याला हे समजत नाही की या असार संसारात मनुष्य विशिष्ट रूपात अधिकार घेऊन आलेला आहे आणि जीवनाचे साफल्य हाच मानवाचा प्रधान उद्देश आहे. जगाची यात्रा निःसार प्रवृत्तीमध्येच नष्ट होत आहे. या अमूल्य ज्ञानाविषयी त्याच्या मनात साधारणतः उपेक्षाच दिसून येते याचा परिणाम असा होतो की मनुष्य आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख होऊन 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम्' या चक्रात अडकतो व भयंकर यातना भोगत राहतो. याच कारणाने परमदयाळु पूज्यपाद श्रद्धेय श्री स्वामीमहाराजांनी कलिमलकलुषित दुःखाकुल मनुष्यांच्या कष्टविनाशनार्थ या सिद्धांतरहस्य' नावाच्या ग्रंथाची रचना करण्याचा अनुग्रह केला. यात शास्त्रांच्या बहुतेक सर्व विषयांचा अपूर्व समन्वय करून त्यांच्या सिद्धांतांचे स्पष्टपणे वर्णन केले आहे.

मानव जीवन सफल करण्यासाठी जीवन साधनामय झाले पाहिजे, आणि यासाठी सर्ववादिसंमत सिद्धांतांचे योग्य ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. सिद्धांताचा आश्रय घेतल्याशिवाय कोणतीही गोष्ट निश्चित रूपात समजू शकत नाही. सिद्धांतांचा निर्णय झाल्यावरच मनुष्य निःसंदिग्धपणे व्यवहार करू शकतो. अतएव सिद्धांतरहस्याच्या या मणिमालेत गुंफलेले १०९ सिद्धांत मानवजातीच्या कल्याणासाठी सर्वथा समर्थ आहेत.

आचार्य गौतमानी सिद्धांताची व्याख्या करताना सांगितले आहे की शास्त्रात निर्णय केलेल्या अर्थाला सिद्धांत म्हणतात– 'तत्राऽधिकरणा भ्युपगमसंस्थितः सिद्धांतः । यथा वादिप्रतिवादिभ्यां निर्णीतोऽर्थःसिद्धांतः' वादी-प्रतिवादि-द्वारा अर्थाचा जो निर्णय होतो तोच सिद्धांत. सिद्धांताची ही व्याख्या दार्शनिक तत्त्वांच्या निर्णयासाठी प्रायः उपयोजिली जाते. तथापि व्यावहारिक अर्थांच्या निर्णयासाठी देखील तिचा उपयोग उत्तम प्रकारे केला जाऊ शकतो. ज्या गोष्टी परीक्षेनंतर निश्चित होतात आणि ज्या आचरणात आणल्या जातात त्यानाच प्रायः सिद्धांत या संज्ञेचा अधिकार राहतो. रुचिवैचित्र्याने सिद्धांतांमध्ये भेदही आहे. त्याला विभिन्न संप्रदायात आश्रय मिळतो. परंतु या पुस्तकात प्राधान्याने सर्वतंत्रसंमत सिद्धांताचेच संकलन झाले आहे. व्यवहारात पुनःपुनः येणारे विषय, ज्ञानी पुरुषांच्या विचारावर त्यांचा प्रभाव आणि महात्म्यांच्याकडून वेळोवेळी त्यांचे निर्विरोध प्रत्यक्षीकरण इत्यादि सर्व गोष्टी मिळून सर्वतंत्र सिद्धांतांची रचना होते. सिद्धांतां मध्ये आणखीही भेद आहेत, परंतु या ग्रंथांत एका न्यून आणि व्यापक स्वरूपातच त्यांचे विवेचन आहे.

पुस्तकात सर्वप्रथम आचरणसंबंधी ५२ विषय सांगितले आहेत प्रारंभी 'आचारः प्रथमो धर्मः' या अनुसार आचरणाचे प्रकरण असणे अत्यंत योग्य आणि महत्त्वाचे आहे, कारण शुद्ध आचरणाशिवाय कोणीही व्यक्ति सन्मार्गावर चालण्यास सर्वथा असमर्थ आहे. पुस्तकात सांगितलेले सिद्धांत अत्यंत स्पष्टपणे मांडलेले आहेत, आणि त्यांचे प्रतिपादन सुगम झाले आहे. जर या सिद्धांतांपैकी एखाद्याही गोष्टीचे पूर्ण आचरण आपल्याकडून होईल तर आपला उद्धार दूर नाही.

दुसऱ्या प्रकरणात योगाच्या मंत्र-हठ इत्यादि प्रकारांचे सरळ सार गर्भित वर्णन केले आहे, ते योगी साधकांना अत्यंत उपयोगी आहे. जरी हा विषय संक्षिप्त रूपात सांगितला आहे तरी बहुतेक सर्व उपयोगी विषय त्यात आले आहेत.

तिसऱ्या प्रकरणात विवादांमधून भक्ति-उपासनेच्या रहस्याचे स्पष्टीकरण अत्यंत सुंदर तऱ्हेने झाले आहे. पुराणातून सांगितलेल्या आख्यानांची संगति, मूर्तिरहस्य, वाहनांचे वैज्ञानिक विवेचन, पंचदेव उपासनेचे तात्त्विक रूप, आणि सरस्वती-लक्ष्मी-पार्वती शक्तींच्या योगाचे अपूर्व वर्णन आहे.

चौथ्या प्रकरणात शक्तितत्त्व आणि ज्ञानाचे स्वरूप यांचा निर्णय गंभीर विवेचनाच्या रूपाने झाला आहे. त्याचबरोबर सांख्य आणि वेदांती यांचा संवाद युक्तिपूर्ण आणि चटकदार झाला आहे.

अवशिष्ट प्रकरणात भक्तिमार्गा बरोबर समन्वय रूपात ज्ञानयोगाचे वर्णन, ज्ञानी आणि भक्त यांचा सगुण-निर्गुण-विषयक संवाद, पंचदेवांच्या भक्ताची लक्षणे, इत्यादि विषय योग्य त्या ठिकाणी आणून विचारांची एक अनोखी माला तयार केली आहे.

ग्रंथकाराने आपल्या सर्वतोमुखी प्रतिभेने सिद्धांतांच्या रहस्याचे संकलन सर्व विरोध काढून केले आहे. सिद्धांतांची निवड खरोखरीच अत्यंत उपयुक्त झाली आहे. पुस्तकाची भाषा सुंदर, सरळ, आणि सुबोध आहे. त्यामुळे त्याची उपयुक्तता आणखीच वाढली आहे समजले असे वाटतात तरी समजलेले नसतात असें शास्त्राचे गहन सिद्धांत या पुस्तिकेच्या मननाने अनायास परिचित होतात. खरोखर हिंदी जगतात हे पुस्तक विलक्षण आहे.

ग्रंथलेखक श्रद्धेय श्री स्वामी जी महाराजांच्या परिचयाची स्वाभाविक इच्छा वाचकात निर्माण होईल, परंतु त्यांनी केवळ एवढ्यावरच संतोष

मानावा की श्री स्वामीजी एक विद्वान संन्यासी महात्मा आहेत, व त्यांच्या हृदयात पीडित मानव जातीसाठी सदैव प्रेमाचा झरा वाहत आहे. स्वतः संबंधी स्वामीजींनी क्वचितच कुणाला सांगितले असेल. त्याना जाणून घेणारे त्यांच्या विषयी जे समजत असतील ते स्वतःच्या अनुभवानेच. वस्तुतः महात्म्यांचा परिचय म्हणजे त्यांचे विचार, व ते वाचकांसमोर आहेत.

अत्यंत भाग्याची गोष्ट आहे की आम्हा दतियावासियांवर त्यांची विशेष कृपा आहे. त्यांच्या कल्याणकारी सदुपदेशाने येथील प्रसिद्ध श्री वनखंडेश्वर या ठिकाणी श्री पीतांबरापीठाची स्थापना झाली. येथे वेळोवेळी धार्मिक उत्सवांचे आयोजन होते विशेष प्रसंगी ते उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, गीता, पंचदशी इत्यादींच्या प्रवचनाद्वाराही सर्वसाधारण जनतेला कृतार्थ करीत असतात. गेल्या वर्षी विक्रम संवत् १९९३ च्या पुरुषोत्तम मासात त्यांच्या शुभ प्रेरणेने एक सप्ताहपर्यंत अखंड भगवन्नामसंकीर्तन महायज्ञ झाला, त्यात 'हरे राम हरे राम' या ध्वनीने समस्त नगर निनादित झाले होते.

स्वामीजींच्या जवळ भक्ति-योग-ज्ञान इत्यादि शास्त्रीय विषयांची चर्चा नेहमी होत असते. त्याग-विरक्ति-शांति यांचे मूर्तिमंत रूप म्हणजे त्यांचे दर्शन. उपदेशाने तर कधीच तृप्ति होत नाही. त्यांची विषय विवेचनाची शैली अतिशय सुंदर आणि आकर्षक आहे. या पुस्तकात ही सर्व वैशिष्ट्ये प्रतिबिंबित झाली आहेत, ती सुज्ञ वाचकांच्या निश्चितच लक्षात येतील.

'सिद्धांत-रत्न-मणि-माला' कशा प्रकारे तयार झाली आहे यावर काही विशेष मत देण्याचा अधिकार मला नाही, आणि माझ्यात तशी योग्यताही नाही की मी अशा गंभीर विषयावर काही विचारपूर्ण संमति व्यक्त करावी मी फक्त श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेचे पालन केले आहे. या विषयी विचारशील विद्वान् महात्मे हेच योग्य प्रकारे सांगू शकतील. इतके निवेदन

मात्र मी अवश्य करू इच्छितो की व्यवहार-योग-उपासना-वेदांत इत्यादि सूक्ष्म विषयांवर सरळ इतका निबंध यापूर्वी माझ्या पाहण्यात आला नाही. आशा आहे की वाचकांना या ग्रंथाने पूर्ण संतोष होईल आणि ते तो आचरणात आणून आपले जीवन सफल करून परमात्म्याच्या अनुग्रहाला पात्र होतील.

दतिया
विजयादशमी, संवत १९९५

बलवीरसिंह
साहित्यभूषण



ब्रह्मलीन

श्री पीताम्बरा पीठाधीश्वर राष्ट्रगुरु परमपूज्य श्री १००८ श्री स्वामी जी महाराज, वनखण्डेश्वर, दतिया (म०प्र०)

ॐ तत्सत्

सिद्धांतरहस्य

(सिद्धांतरत्नमणिमाला)

मनुष्याचे जीवन अत्यंत अमूल्य वस्तु आहे. जे जे उत्तम पदार्थ मिळवावे असे शास्त्रात सांगितले आहे, त्या सर्वांचा अधिकारी मनुष्यच आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष चारही पुरुषार्थ याच जन्मात सिद्ध होऊ शकतात, इतकेच नव्हे तर परम पुरुषार्थ अशी जी परमेश्वराची प्राप्ति ती देखील मनुष्यच करू शकतो. परंतु या संसाररूपी जाळ्यात अडकून पडल्यामुळे मनुष्याला हे समजत नाही की ज्या मार्गाने गेले असता आपल्या इष्ट ठिकाणी पोहचून आपल्याला शांति मिळेल असा वास्तविक मार्ग कोणता ? सद्गुरु, सच्छात्र, आणि सत्संग हेच या रहस्याचा बोध करून देऊ शकतात, कारण योग्य सिद्धांतांचा परिचय त्यांच्यामुळेच होतो. याच तीन गोष्टींच्या आधाराने या माळेची रचना केलेली आहे. यापैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट आचरण. बाकीच्या गोष्टी आचरणानंतरच्या म्हणून सर्वप्रथम आचरणाचा विचार करू.

१) अधिकार नसताना कोणत्याहि विषयावर बोलणे व्यर्थ आहे.

२) वाणीच्या संयमाने मनुष्याच्या पुष्कळशा संकटांचे निवारण होते. म्हणून मौनाचा अभ्यास करणे अतिशय आवश्यक आहे. मौन म्हणजे केवळ न बोलणे नव्हे. खरे म्हणजे मौन ही मनाची साधना आहे. "मौनम् आत्मविनिग्रहः" म्हणजे मनाच्या निग्रहाला मौन म्हणतात स्वामी स्वरूपानंदानी या विषयावर एक सुंदर टिप्पणी दिली आहे, ती अशी–

Maunam is the result of control of thought so far as it concerns speech or it may mean the

condition of the muni-practice of meditation– म्हणजे वाणीशी संबंध असलेल्या विचारांच्या संयमाचा परिणाम म्हणजे मौन मुनीच्या अवस्थेला मौन म्हणतात ध्यानाच्या अभ्यासालाही मौन म्हणतात.

३) शब्द आणि अर्थ यांचा संबंध बी आणि अंकुर यांच्याप्रमाणे अनादि आहे. सृष्टीच्या आरंभकाळी हे दोन्ही परम कारणात शक्तिरूपाने राहतात आणि संधि मिळाल्यावर प्रकट होतात. ज्याप्रमाणे गुणपरिणाम नानाप्रकारे अर्थरूप धारण करतात, त्याचप्रमाणे शब्दही अनेक रूपे धारण करतो. प्रत्येक शब्द एक किंवा अनेक अर्थ सुचवितो ज्या प्रमाणे अर्थाच्या बाबतीत विधिनिषेधात्मक व्यवहार होतात की अमुक कार्य करावे, अमुक करू नये, तसेच शब्दाच्याही बाबतीत आहे. सत्य, प्रिय, हितकारक शब्द वापरणे उत्तम. कडू, निरर्थक, निंदात्मक शब्द वापरणे निषिद्ध आहे. योग्य शब्दा-मध्ये देखील तरतम आहे. सात्त्विक, ज्ञान, योग, भक्ति, उपासना, दया, श्रद्धा, उपकार, धर्म, देवता, ऋषि इत्यादि विषय सांगणारे शब्द उत्तम प्रकारचे; राजा, धनिक इत्यादि विषयांचे शब्द मध्यम प्रकारचे, आणि खाट, लोटा, घट, पट, इत्यादि तिसऱ्या दर्जाचे व शिवीगाळ निषिद्ध प्रकारचे शब्द. साधारणपणे अशी गोष्ट अनुभवात दिसते की मंत्र, जप, सद्ग्रंथांचे वाचन,प्रिय शब्दांचा व्यवहार करणाऱ्यांनाच महात्मा,विद्वान्,हितैषी,इत्यादि विशेषणे वापरतात. त्यांच्यामुळेच मनुष्यातील उत्तम गुण समजून येतात. मनुष्य किती मर्यादिपर्यंत शक्ति, ऐश्वर्य, सौंदर्य, प्रेम, जगद्धित स्वतःमध्ये व्यक्त करू शकतो ते कळते या सर्व भावनांचा आविष्कार शब्दांच्या द्वाराच होतो. शास्त्रात सत्य, प्रिय, हितकारक शब्द वापरावे असा उपदेश याच कल्पनेने केलेला आहे.जेव्हा आपण मनुष्य असहनशील,क्षुद्र,कामविकाराधीन, विचारशून्य, मूर्ख, अभिमानी, कपटी, निंदक, गर्विष्ठ झालेला पाहतो, तेव्हा त्याचे एकमात्र कारण या प्रकारच्या भावनांना व्यक्त करणारे निषिद्ध शब्द वापरणे असे आढळून आलेले आहे. यासाठी उत्तम भावना असाव्या अशी इच्छा असली तर योग्य शब्दांचा वापर करण्याची सवय ठेवली पाहिजे.

यावरूनच मनुष्याची पहिली ओळख होते आणि तो कोणत्या श्रेणीचा आहे हे समजते.

४) वस्तुतः वेद, उपनिषदे, गीता, पुराण इत्यादि ग्रंथसमुदाय वाङ्मयाचे औचित्य आणि उच्च विकासाचा इतिहासच होत खऱ्या अर्थाने त्यानाच मनुष्य जातीचा इतिहास म्हटले पाहिजे! केवळ उत्पत्ति, मरण इत्यादि लौकिक सामान्य गोष्टींचा परामर्श म्हणजे इतिहास नव्हे. ज्या मनुष्य समाजात या गोष्टी नाहीत, तो समाज म्हणजे वास्तविक प्राणाशिवाय फक्त शरीराचा आकारच होय. आर्य लोकांचा श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ उत्तम विचार आणि शब्दांचे औचित्य व्यक्त करणारा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. या ग्रंथांच्या आधारानेच मनुष्याच्या विकासाचा इतिहास लिहिणे इतिहासकारांचे मुख्य कर्तव्य आहे. केवळ बाह्य सभ्यतेचे निरीक्षण किंवा त्याच्या अनुरोधाने उन्नति आणि ऱ्हास यांचा निर्णय एकदेशीय आणि अपुरा होईल. शब्दांच्या औचित्याच्या ज्ञानासाठी या ग्रंथांचा अभ्यास करणे साधकाला अत्यंत हितकारक आहे.

५) कोणाच्याहि संबंधी त्याच्या मागे अथवा समोर आपले मत एकच ठेवा जर कोणत्याहि कारणाने अप्रिय सत्य सांगणे शक्य नसेल किंवा ऐकणारा ते ऐकू इच्छीत नसेल, तर कोणत्याहि अवस्थेत त्याची चर्चा करू नका. पुष्कळ वेळा असे दिसते की खोटी सभ्यता आणि लौकिक प्रतिष्ठा यांच्या नशेमध्ये मनुष्य कमी प्रतीचे उद्गार काढतो, व द्वेष किंवा थट्टामस्करी केली जाते. कधी कधी तर अशा वागण्याने पुष्कळच नुकसान होते. मोठमोठे अनर्थ रामायण-महाभारताप्रमाणे होतात ती याचीच उदाहरणे. हल्ली जे दंगे निर्माण होतात त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर हीच गोष्ट आढळते. अशा प्रकारच्या भावनांना शास्त्रामध्ये निंदा, पिशुनता असे म्हटले आहे.

६) ज्याच्या बरोबर संबंध ठेवावयाचे असतील त्याच्या बरोबर ते मोकळेपणाने ठेवा. जर परिणामी सुखावह पण सांगण्यात कडवटपणा बेळेवर धारण करावा लागला तरी काही हरकत नाही. याविरुद्ध आचरण करण्याने

व्यवहार कायमचा पंगु बनतो. जर व्यवहारच करावयाचा नसेल तर संबंध तोडून देखील शांतता टिकविता येते.

७) असे दिसते की पुष्कळसे लोक बाह्य संबंध पाहिले तर वेगळे दिसतात, आणि लोकांना तसेच सांगतात देखील; तथापि मनामध्ये त्याच सोडून दिलेल्या संबंधावर मोठी लंबी-चौडी योजना बनवितात. कोणी आपल्यावर अपकार केला तर त्याचा सूड कसा घ्यावा,अमक्याला खाली कसे पाडता येईल, किंवा तमक्याचे नुकसान कसे करता येईल अशा प्रकारच्या गोष्टींचा ते नेहमी विचार करतात, आणि या गोष्टी तर अत्यंत अहित करणाऱ्या आहेत; त्या प्रतिहिंसात्मक रूपात परिणत होऊन अनर्थ उत्पन्न करतात. म्हणून त्यापासून वाचण्याचा प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

८) कोणाच्याही संबंधात दुसऱ्यांच्या विचारावरून आपले मत बनवू नका. जोपर्यंत कोणत्याहि गोष्टीची पूर्ण परीक्षा तुम्ही करीत नाही, तोपर्यंत कोणतीहि गोष्ट निश्चित करणे हानिकारक आहे. परीक्षेनंतर ती गोष्ट खरी ठरेलही, पण विचार करणे आवश्यक आहे. जे लोक केवळ कानच फक्त उघडे ठेवतात, त्यांना पश्चातापाच्या ज्वाळेत भस्म व्हावे लागते.

९) कोणतेही कार्य करावयाचे असेल तर कर्मयोग्याला सर्वप्रथम साधन, परिणाम, लोककल्याण आणि आत्मकल्याण यावर नजर दिली पाहिजे. या चार गोष्टीत ज्याची कमतरता असेल तीच सर्वप्रथम पूर्ण करण्याचा उपाय केला पाहिजे. त्याशिवाय विरोधी शक्ति देखील कर्मयोग्या-बरोबर टक्कर देतात, परंतु शांति, क्षमा, विचार,आणि आत्मसंयम यामुळे त्या निष्फळ होऊ शकतात. जर या चार गोष्टींमध्ये भोग, लोभ, गौरव, प्रतिष्ठा,गटबाजी आणि द्वेष याना स्थान मिळाले तर ते कार्य दृढ होऊ शकत नाही कोणत्याहि लौकिक विचारानी जे कार्य केले जाते, ते अभिचारा-करिताच होते. कार्य सुरू करण्यापूर्वी या सूत्राचे मनन करीत चित्तवृत्ति सम करावी आणि वेळेवर जरूरीची कार्ये करण्याची संवय ठेवावी जो वेळेचे बंधन पाळत नाही तोच अयशस्वी होतो.

१०) आपला दोष मानणारा सुधारू शकतो. जो उणेपणा खोटेपणाने झाकू पाहतो, तो वास्तविक पुष्कळशी संकटे स्वत:च उत्पन्न करतो. त्याला आणखीही खोटे बोलावे लागते. असे वागणारा अत्यंत शोचनीय अवस्थेप्रत जातो. त्यामुळे दोषांचा समुदाय त्याच्या समोरच वाढत जातो आणि शेवटी तो सर्वनाशाकडे जातो.

११) हे अगदी उघड आहे की आपल्यासारख्या बाह्य जगापासून आशा बाळगणाऱ्यांच्या बाबतीत जगही तुमच्याशी तसेच वागेल, जसे तुम्ही त्याच्याशी वागाल. या अवस्थेत तुम्हाला जे काही मिळत आहे. ते आपल्याच कर्माचे फल आहे. त्यासाठी कोणतेही अदृश्य कारण मानण्याची गरज नाही.

१२) निरर्थक बडबडण्यात वेळ घालविणे,दुर्व्यसनात सापडणे, पत्त्यासारख्या खेळांची आवड बाळगणे, अनावश्यक गोष्टी करणे, निंदा कुचेष्टा करीत राहणे, ही सर्व ध्येयहीन मनुष्याची लक्षणे आहेत अल्पाहार, मित भाषण, दुर्बलांना मदत, ईश्वरावर दृढ विश्वास, सत्य भाषण, निरपेक्ष सेवाभाव, रागद्वेषांचा त्याग, आणि सर्व प्राण्यांवर प्रेम ही चांगल्या पुरुषांची लक्षणे आहेत.

१३) कोणतीही गोष्ट शास्त्र किंवा शिष्ट यांना मान्य असली तरी लगेच ती स्वीकारणे योग्य नाही. जोपर्यंत स्वत: अनुभव येत नाही तोपर्यंत थोड्याफार प्रमाणात अज्ञान राहतेच. संभवत: ती गोष्ट पूर्णपणे खरी असेलही, पण जोपर्यंत आपल्याला अनुभव येत नाही तोपर्यंत कोणत्याही सिद्धांताचा अनुयायी बनणे कधीही उपकारक ठरत नाही. म्हणून कोणत्याहि सिद्धांताच्या परीक्षणात गुणदोष-विचार करताना आपल्याला घाई करून चालणार नाही. आज जी गोष्ट आपल्या अनुभवाला आली, ती कदाचित् पूर्ण सत्य नसून उद्या खोटीही ठरू शकेल. या साठी अशा अपुऱ्या जबाबदारीवर कोणतीही गोष्ट कोणालाही सांगू नये.

१४) जो मनुष्य संयम, नियम, सद्विचार आणि उद्योग यांच्याकडे पाठ फिरवून देखील महत्त्वाकांक्षी म्हणवतो, तो जणु मृगजलाने आपली तहान शमवू पाहतो.

१५) सत्य भाषण आणि सत्यव्यवहार हाच यशाचा सर्वात उत्तम असा सुंदर मार्ग आहे. जेव्हा अपयश नजरेस येईल तेव्हा शोध केल्यास कोणत्या ना कोणत्या रूपात असत्यच सापडेल. त्यासाठी ईश्वर किंवा दैव यांना दोष देणे अज्ञानमूलक आहे. 'सत्यप्रतिष्ठायां क्रियाफलाश्रयत्वम्' (योगसूत्र २।३६) म्हणजे सत्याची प्रतिष्ठापना झाली तरच सर्व क्रिया सफल होतात.

१६) मनुष्याचे शरीर सर्व प्रकारच्या शक्तींचे निदर्शक असे एक अधिष्ठान आहे. योगाच्या साहाय्याने मनुष्य ज्या वस्तूची इच्छा करील, ती तो प्राप्त करू शकतो. मन हेच या पॉवर हाऊसचे मुख्य एंजिन आहे. त्या द्वाराच सर्व काही प्रकट होते. सध्या जी बाह्य विज्ञानाची प्रगति दिसते ती देखील शास्त्रज्ञांच्या मनातच प्रथमतः कल्पनारूपाने प्रादुर्भूत झाली. स्वर्ग, नरक, मोक्ष सर्व गोष्टी मनातच राहतात. हे सर्व दृश्यमान जग मनाचीच कल्पना आहे. मन शुद्ध झाल्यावरच चांगल्या गोष्टी मनुष्याला मिळू शकतात. यासाठी मन शुद्ध, पवित्र राखणे आणि ते एकाग्र करण्याचा सराव करणे हीच प्रगतीची पहिली पायरी आहे. महर्षि पतंजलीनी मनाच्या निरोधाने अनेक प्रकारच्या सिद्धि प्राप्त होतात असे सांगितले आहे. परमसुखरूप ब्रह्मानंद देखील मन शुद्ध आणि पवित्र झाल्यावरच मिळू शकतो. 'मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः'–मन हेच आपल्या बंध आणि मोक्ष या दोहोंचेही कारण आहे.

१७) आपला अपराध करणाऱ्याला क्षमा करणारे मन धीर पुरुषाचे समजावे, कारण वाईट गोष्ट करणाऱ्याकडून आपल्या स्वार्थाला बाधा आलेली पाहताच मनुष्य लगेच त्याचे वाईट करण्यास तयार होतो. अशा रीतीने विकाराचे मिश्रण झाल्याने द्वेष दुष्पट बलवान बनतो आणि दुःखाचे प्रहार होऊ लागतात. वस्तुस्थिति अशी आहे की क्रोधाचा प्रतिकार क्रोध करू शकत नाही. क्रोधामुळे उलट मलिनता आणि जळजळ अधिक वाढत जाते, व शांतता मिळणे अशक्य होते विरोधी मनुष्याच्या विरोधाला निरस्त करणे यालाच क्षमा म्हणतात, व त्यामुळेच विरोधावर विजय मिळवता येतो. "क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति । अतृणे पतितो

वह्निः स्वयमेवोपशाम्यति ।।' क्षमारूपी शस्त्र जवळ असेल तर दुष्ट मनुष्य काय करूं शकणार ? ज्याप्रमाणे गवत नसलेल्या ठिकाणी अग्नि आपोआपच विझतो, त्याच प्रमाणे दुष्टांचे अशा ठिकाणी चालत नाही.

१८) सात्त्विक भावांची उत्पत्ति झाल्यावर सद्विचार, ध्यान, उपासना, लोककल्याण, तसेच आत्मकल्याणहि करणाऱ्या शुभ कर्मांना आरंभ होतो. हा सर्वात विचार महत्त्वाचा. परंतु योगाभ्यासाशिवाय सात्त्विक भावांची उत्पत्ति, आनंदाचा प्रवाह, व सद्विचारांची अवस्था येऊ शकत नाही. आनंददेखील सद्विचारांनीच मिळत असतो. राजस व तामस भावाना आवरण्याचे मुख्य उपाय भजन, अभ्यास व सत्संग हे होत. ही तीनही साधने योगाची प्रधान कारणे आहेत योगमार्गाने जाणाऱ्या साधकाना त्यांचे पालन अत्यंत आवश्यक आहे.

१९) इष्ट वस्तूचे ध्यान,कोणताही सद्विचार मनात स्थिर करण्याचा सराव करणे, जास्तीत जास्त त्याच विचारात मग्न राहण्याची सवय लावून घेणे, ह्याच वाईट गोष्टी आणि विचार या पासून वाचण्याचा मुख्य उपाय आहे बाह्य साधना देखील मनाची एकाग्रता साधण्यास मदत करते, परंतु मानसिक साधना ही चटी मिळविण्यास पूर्ण समर्थ असते व त्यामुळेच विचार निर्मळ होतात. या उपायाची तयारी तेव्हाच होते की जेव्हा एखादा मनुष्य वाईट विचारांचा केवढाही आघात करीत असतांना साधक आपल्या निर्णयापासून थोडाही विचलित होऊ शकत नाही. यालाच आपण ब्रह्मास्त्र म्हणू या, कारण हा उपाय कोणत्याही अवस्थेत निष्फल होत नाही.

२०) तितिक्षा म्हणजे सहनशक्ति वाढविली पाहिजे. तितिक्षेमुळेच विवेक आणि सद्विचारांचे स्वातंत्र्य प्राप्त होते. पराधीन ज्ञानाचे विचार असणे ही देखील एक प्रकारे गुलामगिरी आहे, व तो आळशी मनुष्याची लौकरच पकड घेते. तितिक्षा-शक्ति मिळाल्यावर शत्रूची शक्ति पराभूत होते. हे एक असे शस्त्र आहे की जे मनुष्याला यशाच्या जवळ नेऊन पोचविते, आणि विरोधी शक्तींना निष्प्रभ करते.

२१) रोग निघून गेल्यावर मनाला निर्मळता व शरीराला हलकेपणा जसा प्राप्त होतो, तसेच स्थैर्य जर नेहमी राहील तर मनुष्य विचारांच्या मार्गावर लौकरच उन्नति करू शकेल. आहारात राजस पदार्थांच्या सेवनानंतर तामस तत्त्वे अधिक प्रमाणात येऊन व्याधी उत्पन्न होते. विचारांची उन्नति इच्छिणाऱ्यांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. विपरीत विचारानीच अशी स्थिति येते, म्हणून आहाराच्या बाबतीत विचारांचे नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. राजस व तामस तत्त्वे सात्त्विक तत्त्वांपेक्षा प्रभावी होऊ देऊ नयेत.

२२) आहारातील शुद्धतेमुळेच मन शांत व शुद्ध होते. आहारात जाति, निमित्त आणि आश्रय या तीन दोषांचा विचार होणे जरूरीचे आहे. या तीनही दोषांचा संबंध अन्नाशीच असतो–१) जातिदुष्ट पदार्थ लसूण, कांदा, मांस, मद्य, मिरची, गांजा, भांग इत्यादि होत, त्यांच्या सेवनाने मन व्यग्र बनते व बुद्धि नष्ट होते. २) उष्टे व माशा, डास इत्यादि जंतूचा संपर्क ज्या अन्नाला होतो, त्याला निमित्तदुष्ट अन्न म्हणतात. स्पर्शास्पर्श दोष देखील याच दोषात अंतर्भूत होतात. ३) विहित-अविहित उपायांचा विचार न करता अन्न मिळविणे किंवा ग्रहण करणे याला आश्रयदुष्ट अन्न म्हणतात. म्हणूनच मनु म्हणतो– **"आलस्याद् अन्नदोषाच्च मृत्युर्विप्रान् जिघांसति"** (५/४),म्हणजे आळस आणि अन्नदोष यामुळे ब्राह्मणाचा मृत्यु होतो. या तीन दोषांपासून मुक्त असलेल्या शुद्ध अन्नाच्या सेवनानेच मन शुद्ध होते. मन अन्नाच्याच सूक्ष्म अंशानी बनलेले आहे. वेदातही 'अन्नमयं हि सोम्य मनः' म्हणजे मन अन्नानेच बनलेले आहे असे म्हटले आहे. जसे अन्न आपण सेवन करू,तसेच आपले मन बनेल. म्हणूनच वेदामध्ये सांगितले आहे–"आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः । स्मृतिलाभे सर्व ग्रन्थीनां विप्रमोक्षः" (छान्दोग्य ७) आहारशुद्धीने अंतःकरणाची शुद्धि होते, अंतःकरण शुद्ध झाल्यावर निश्चल स्मृति प्राप्त होते,व स्मृति निश्चल बनल्यावर समग्र दोषांचा विनाश होतो. यासाठी विचारांची उन्नति इच्छिणाऱ्यांनी आहारशुद्धीचे स्मरण ठेवले पाहिजे.

२३) मनुष्यामध्ये असलेला कमीपणा, हट्ट आणि आळस यामुळे त्यावर आपत्ति येण्याचे प्रसंग उपस्थित होतात. त्यामुळे संकटकाळी हे दोष समजून घेऊन ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ईश्वराचे भजन आणि सज्जनांची संगति या द्वारा मनुष्याला खरे साहाय्य मिळते. परंतु या अवस्थेत कर्तव्यालाच मुख्य स्थान दिले पाहिजे, कारण बेकारीच्या स्थितीतच मनुष्य दुर्विचारांना बळी पडतो. त्यामुळे मनुष्याला पुनः दुःखे प्राप्त होऊ लागतात. "कुरु कर्मैव तस्मात् त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः" (गीता ४।१५) म्हणजे कर्म न करण्यापेक्षा कर्म करणेच श्रेयस्कर आहे, म्हणून कर्माचरण करीत रहा, या गीतावचनातही हेच तत्त्व सांगितलेले आहे.

२४) प्रत्येक मनुष्याला कर्तव्याचा संबंध या ना त्या प्रकारे असतोच, काहीही न करता या सतत प्रवाही असणाऱ्या व्यवहारी जगात कोणीही क्षणमात्र देखील राहू शकत नाही. प्रत्येक कृत्याचा मनावर चांगला-वाईट परिणाम अवश्य घडत असतो. यामुळेच संस्कार घडत जातात. त्यातही मनाला जे अधिक चांगले वाटतात त्यांची इच्छा स्वभावतःच उत्पन्न होऊन त्यांच्या फलाच्या प्राप्तीसाठी मनुष्य प्रयत्नशील बनतो आणि हेच तत्त्व लौकिक व्यवहारात मुख्यत्वेकरून काम करीत असते. ही गोष्ट समजून घेतल्यास वागण्याच्या प्रत्येक तऱ्हेची माहिती सरळपणे मिळू शकते.

२५) इच्छेतून निर्माण होणारा व्यवहार शांति आणि सुख यांचे कारण होऊ शकत नाही, कां की, "लाभात् लोभः प्रवर्तते" मिळत गेल्याने लोभ वाढत राहतो. या नियमाने, लोभ वाढत राहिल्यामुळे मनुष्यापासून शांति दूर राहते. याचकरिता इच्छामूलक सकाम व्यवहाराचा सर्वप्रकारे त्याग करावा असे शास्त्रात सांगितले आहे. काही काही थोर लोकांना योग्य गोष्टींचा त्याग पसंत नाही. त्यांच्या मताप्रमाणे कर्मामध्ये इच्छा असणे हेच बंधनाचे कारण आहे, व इच्छा फलाच्या त्यागाने निघून जाते, व नंतर मन व्यग्र राहत नाही. म्हणून योग्य सकाम कर्माच्या स्वरूपतः त्यागाची आवश्यकता नाही. कर्मयोग-मार्गात या दोन मताना संन्यास आणि त्याग असे म्हणतात. "काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः । सर्वकर्म-

फल त्यागं त्यागं प्राहुर्विचक्षणाः ।।" (गीता १८।२) काम्य कर्माच्या स्वरूपतः त्यागाला संन्यास आणि सर्व कर्मांच्या फलत्यागाला त्याग म्हणतात.

२६) मोक्षाच्या इच्छेने साधना करणाऱ्यांसाठी नित्य, नैमित्तिक, काम्य, निषिद्ध आणि प्रायश्चित अशा रीतीने कर्माचे पांच प्रकार करून त्यांची संगति लावली जाते, ती अशी-नेहमी करावयाची स्नानसंध्यादि कर्मे नित्य कर्मे होत. पार्वणश्राद्धादि कर्मे (निमित्ताने आलेली म्हणून) नैमित्तिक, पर्जन्य पडावा या कामनेने केलेली कारीरी इष्टि,आणि पुत्राच्या कामनेने केलेली पुत्रकामेष्टि ही कर्मे काम्य. ब्राह्मणाचा वध, मद्यपान, इत्यादि कर्मे निषिद्ध. निषिद्ध कर्मे केल्यामुळे निर्माण झालेले दोष दूर करण्यासाठी प्रायश्चित्त म्हणून काही कर्मे करावयास शास्त्राने सांगितले आहे. काम्य, निषिद्ध आणि प्रायश्चित्त यांचा स्वरूपतः त्याग करावा. नित्य व नैमित्तिक कर्माचे आचरण अंतःकरणाच्या शुद्धीसाठी असल्यामुळे परमात्म्याच्या ज्ञानाला कारणीभूत होते, म्हणून त्यांचे आचरण आवश्यक आहे.

२७) काम्य कर्माच्या बाबतीत ज्ञानी लोक असे म्हणतात की निषिद्ध कर्माच्या आचरणापासून दूर राहण्यासाठीच त्यांचे विधान केलेले आहे, वास्तविक रूपाने नाही, कारण मुमुक्षूच्या मार्गात अशा कर्मांचा फार मोठा अडथळा निर्माण होतो. इच्छावान् मनुष्य आपल्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्या यासाठी ईश्वराजवळ किंवा निरनिराळ्या देवतांजवळ प्रार्थना करीत असतो. योग्य उद्योग टाळण्याची त्याला सवय जडते. "कृपणाः फलहेतवः" या गीता वचनामध्ये (२।५९) हेच तत्त्व सांगितले आहे. त्यामुळे श्रद्धा, विश्वास, संतोष,इत्यादि चांगले गुण त्याला सोडून जाऊ लागतात,आणि शेवटी मनुष्य पतित कोटीपर्यंत जातो. योगी अरविंदानी या विषयी आपले विचार अत्यंत सारगर्भित शब्दात व्यक्त केले आहेत, ते असे-"But the Supreme Grace will act only in the condition of the Light and the Truth; it will not act in the condition laid upon it by the Falsehood and the Ignorance. For, if it were to yield to the demands of the

Falsehood, it would defeat its own purpose" (The Mother1-2) म्हणजे दिव्य शक्ति प्रकाश आणि सत्य याच अवस्थेत काम करील; अज्ञान किंवा असत्याच्या अवस्थेत जर आपली इच्छा तिच्यावर लादूं तर त्या स्थितीत ती आपले काम करणार नाही. प्रार्थना करणाऱ्यांच्या अशाही मागण्या ती पुरी करू लागेल, तर ती आपल्या दिव्यत्वापासूनच भ्रष्ट होऊन जाईल. अशा स्थितीत अज्ञान आणि ज्ञान यात फरकच काय राहिला? कारण, दिव्य शक्ति असे करू लागल्यावर अज्ञानाचे दुसरे रूप बनेल. म्हणूनच कामनायुक्त प्रवृत्ति देखील निषिद्ध प्रकारातच समाविष्ट आहे. "स शान्तिमाप्नोति न कामकामी" (गीता २।७०) या वाक्यात काम्य कर्मे निषिद्ध कोटीतच घातली गेली आहेत.

२८) ज्याला कोणत्याहि साधनप्रणालीमध्ये अधिकार प्राप्त झाला असेल त्याला त्या द्वाराच आत्मकल्याण, शांति व अभ्युदय मिळू शकतो. यावर विश्वास न ठेवता अंधपरंपरान्यायाने चालले असता एक तर मनुष्य आपल्या साधनेविषयी ढोंगी बनतो, किंवा मनोभिलषित वस्तु न मिळाल्यामुळे साधनेचा विरोधक बनतो व साधनेमधेच दोष काढू लागतो. नेहमी असे पाहण्यात येते की, पुष्कळसे प्रतिष्ठाकांक्षी गृहस्थ भक्तमंडळीत आल्यावर भगवद्गुणानुकीर्तनाच्या वेळी आवेश येऊन डोळ्यातून अश्रूंचे दोनचार थेंब आलेले दाखविण्यातच भक्तीची इतिश्री समजून स्वतःस धन्य समजू लागतात, व तो आवेश निघून गेला की पुनः जसेच्या तसेच राहतात. पुष्कळ लोक आपल्या सुखभोगासाठी, किंवा आपली प्रतिष्ठा टिकावी व लोकांनी आपल्याला देखील परमार्थमार्गावरील पथिक समजावे म्हणून, दुसऱ्या साधनप्रणालीची निंदा करण्यात तत्पर बनतात. हीच गोष्ट ज्ञानी, कर्मी, योगी इत्यादींच्या विषयी देखील खरी आहे. खरी गोष्ट अशी आहे की या अधिकार नसतांना केलेल्या क्रिया आहेत. त्यामुळे उन्नति न होता अधःपतनच होते. आपली साधना या बाजूला तर जात नाहीना, असे सारखे निरीक्षण करणे साधकांनी आवश्यक आहे. पुष्कळ लोकांना योगासारखे पवित्र विषय देखील चुकीचे असल्याचे सांगताना आपण पाहतो. मंत्र-तंत्र खोटे व फसवणारे असल्याचे कित्येकानी सांगितले

असेल. वेद, शास्त्र, साधु, महात्मा, देवदेवतानाही खोटे म्हणणारे आपण पुष्कळ पाहतो. या सगळ्याचे कारण म्हणजे मनुष्याचा क्षुद्र स्वार्थ. त्यामुळेच या सर्वांना आपल्याला सर्वथा अनुकूल नसलेले दिसताच निंदा सुरू होते. जणु काही ही सर्व सृष्टि मनुष्याच्या विचारांच्या आधाराने चालण्याकरिताच बनविली आहे. एखाद्याने कफदोषाने ग्रस्त झाल्यामुळे दुधासारख्या सुंदर, स्वादिष्ट पदार्थालाही अपायकारक म्हणावे व पित्त झाल्यावर त्यानेच दुधाची उपयुक्तता सिद्ध करावी, यावरून अशा मनुष्याच्या निर्णयाने दुधाचे खरे स्वरूप नीट समजेल असे आपण म्हणू शकू का ? अशा प्रकारच्या निंदा-स्तुतीमुळे पदार्थाच्या स्वरूपाचा निर्णय होऊ शकतो का ? हे जसे अयोग्य, तसेच वरील विषयांच्या संबंधी देखील समजले पाहिजे. अनधिकाराने सांगितलेले मत म्हणजे निर्णय नव्हे.

२९) तेविसाव्या मण्यात आम्ही सत्संगाचा विचार केला आहे. तोच आता सांगतो आर्यग्रंथातून सत्संग अत्यंत हितकारी आहे आणि भगवत्कृपेनेच तो मिळतो असे सांगितले आहे. एकंदरीने सत्संग ही एक अत्यंत दुर्मिळ गोष्ट आहे. पुष्कळ काळपर्यन्त सत्संग मानणारा मनुष्यही जेव्हा वाईट संगतीत जातो तेव्हा अज्ञानामुळे तो वाईट संगतीलाही सत्संगच समजतो. सत्संगामुळे जो लाभ व्हावयास पाहिजे तो त्याला मिळत नाही. किती तरी दांभिक लोक सत्संगाच्या नावावर ढोंग वाढविण्याचेच कार्य करीत असतात; कितीतरी माणसे उपजीविकेसाठी सत्संगात आल्याचे सोंग करीत असतात; पुष्कळ अनधिकारी लोक संत-महात्म्यांच्या वेषात सत्संगाच्या नावावर भोळ्याभाबड्या लोकांना फसवीत असतात; कितीतरी पुरुष नैतिक कट व राजकीय प्रचारही सत्संगाच्या नावावर करीत असतात. या गोष्टी नव्या आहेत असे नाही, परंतु खरा सत्संग ठरविणे साधारण बुद्धीच्या मनुष्यास सध्या कठिण आहे इतके निश्चित. म्हणूनच सत्संग दुर्लभ आहे असे म्हणतात.

३०) वाईट कर्माबद्दल नावड, वासनांचा सर्वथा त्याग, पूज्य पुरुषाविषयी भक्ति, सत्सिद्धांतांचे आचरण, सरळपणा व निष्कपट भावाकडे विशेष ओढ, आणि भोगांविषयी नावड जेव्हा उत्पन्न होईल त्यावेळी

आपल्यावर सत्संगाचा प्रभाव पडू लागला आहे असे समजावे. या गोष्टी जेव्हा मिळतील, तेव्हा खरा सत्संग हाच आहे असे समजावे. जे अलभ्य अनुभव महात्म्या पुरुषांना कित्येक वर्षानंतर अत्यंत मुश्किलीने मिळतात, तेच सत्संगात सहज मिळून जातात त्यामुळे सत्संगाचे महत्त्व सर्व मान्य झालेल्या ग्रंथांमध्ये सांगितलेले आढळते. चित्ताला स्थिरता, ज्ञानशक्तीचा उदय, ईश्वरावर प्रेम, संतांविषयी पूज्यबुद्धि, अनेक विषयांचे ज्ञान, पारमार्थिक विषयांवर श्रद्धा आणि त्यांच्या रहस्याचे ज्ञान, तसेच जगाच्या असारतेबद्दल खात्री सत्संगामुळे सोप्या मार्गाने होते. सत्संगाशिवाय मनुष्याचे जीवन अनुभवशून्य आणि निरर्थक आहे असे म्हणतात.

३१) प्रथम मनाची शुद्धि करण्यास सांगितले आहे. याविषयी महर्षि पतंजलींचे म्हणणे असे आहे "मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःख पुण्यापुण्यविषयाणां भावनातः चित्तप्रसादनम्" (योगसूत्र १।३३) सुखदुःख व पुण्यापुण्याविषयींची मैत्री, करुणा व उपेक्षा यांची क्रमाने भावना केली असता चित्त प्रसन्न होते; अर्थात् सुखी प्राण्याबरोबर मैत्री, दुःखी प्राण्याबिषयी करुणा, पुण्यात्म्याविषयी मुदिता म्हणजे प्रसन्नता, आणि दुष्टांची उपेक्षा म्हणजे प्रीति व द्वेष दोनही नसणे–या गुणांच्या योग्य आचरणाने मन प्रसन्न राहते. थोडक्यात हेच तत्त्व गीतेत एका श्लोकात असे सांगितले आहे– "रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् । आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥" (२–६४) रागद्वेषरहित होऊन विषयांचा उपभोग इंद्रियाना मनाच्या अधीन ठेवून घेणारा मनुष्य प्रसन्न असतो. योगसूत्रात जे तत्त्व सांगितले,त्याची व्यावहारिक अवस्था या श्लोकात सांगितली आहे. खरे म्हणजे अशाच अवस्थेत मनाच्या उच्च स्थितीचा परिचय होतो, कारण व्यवहाराखेरीज कोणत्याहि गोष्टीचा परिचय अपूर्णच राहतो. जीवनमुक्ताचा व्यवहार याच अवस्थेतील असतो. असा व्यवहार आत्मसाक्षात्कारानेच सिद्ध होतो. रागद्वेष आत्मज्ञानानेच निघून जाऊ शकतात. 'परं दृष्ट्वा निवर्तते' (गीता २।५९) या वचनात हेच सांगितले आहे.

३२) ज्या महात्म्याना कर्म, उपासना आणि ज्ञान या तीनहि मार्गाचे रहस्य समजले, त्यांच्या मनात स्वभावतःच करुणा, दया, उपकार, प्रेम

वगैरे शुभ गुणांचा प्रवाह सुरू असतो. 'सर्वभूतहिते रता:' या विशेषणाने त्यांचेच वर्णन गीतेत (१२।४) केलेले आहे. भगवान् कृष्णाने 'ज्ञानी तु आत्मैव मे मतम्' (गीता ७।१८) ज्ञानी म्हणजे मीच असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे तो वेळोवेळी अज्ञानी लोकांना शिक्षण देण्यासाठी प्रकट होतो, त्याप्रमाणेच सिद्ध पुरुषांचेही आचरण असते. यालाच लोकसंग्रह म्हणतात. आपआपल्या भावनेप्रमाणे कर्मयोगी लोक त्यांना कर्मयोगी, भक्त भक्तियोगी आणि ज्ञानी पुरुष परमज्ञानी म्हणतात. वास्तविक या तीनही साधनांचे फल जीवन्मुक्त पुरुषांमध्येच पहावयास मिळते. त्यांचा कोणाही बरोबर विरोध नसतो, सर्वत्र समभाव असतो. 'इहैव तैर्जित: सर्ग:' (गीता ५।१९) जीवन्मुक्त पुरुष जीवनकालातच गुणांवर विजय मिळवितो, कारण त्याचे मन समत्वात रमलेले असते. त्यांचे बाह्य आचार भिन्न भिन्न असतात. परंतु वस्तुत: त्यात एकरूपता असते. त्यांचे बाह्य आचार पाहून अज्ञानी लोकांच्या मनांत संदेह निर्माण होतो, तथापि त्यामुळे त्यांचे काहीच नुकसान होत नाही. त्याच महात्म्यांच्या नावाने अनेक पंथ जगात सुरू होतात, परंतु त्या महात्म्याना हे संमत असते असे निश्चयाने सांगता येत नाही, कारण सांप्रदायिकतेचा पुष्कळ दुरुपयोगच झालेला आहे.

३३) सत्पुरुषांचा जन्म कोणत्याहि जाति, कुल, देश यांच्या संदर्भात होत नाही व त्यात अशा प्रकारे फरक करणे योग्यही नाही. वस्तुत: त्यांचा परिचय त्यागानेच होत असतो. ज्या ज्या महात्म्यांनी जितकी म्हणून श्रेष्ठता मिळविली आहे, त्या सर्वाचे श्रेय त्यागालाच आहे. म्हणूनच सत्पुरुषांच्या परिचयाची ही सर्वोत्तम कसोटी आहे. चैतन्य, बुद्ध, नानक, कबीर, येशू आणि महंमद हे सर्व याचे प्रमाण आहे. या कसोटीच्या बाहेर वरवरच्या गोष्टींवरून वाद घालणे व्यर्थ व अडाणीपणाचे आहे.

३४) जितके म्हणून धर्म सांगितले गेले आहेत, त्या सर्वांमध्ये अहिंसा हा परम धर्म मानलेला आहे. अहिंसक बनल्याशिवाय मनुष्याचे कसलेही सदाचरण हत्तीच्या शुचितेप्रमाणे आहे. जो कोणत्याही प्राण्याला आपल्या स्वार्थाकरिता पीडा देत नाही, सगळ्या जगाकडे जो प्रेमाच्या दृष्टीनेच पाहतो, तोच खरा अहिंसावादी म्हणावयाचा.

३५) सत्य, अहिंसा, क्षमा, परोपकार इत्यादि सात्त्विक गुणांचे पालन करा असे मोठे लोक नेहमींच सांगतात, तथापि देश-काल-परिस्थिति बदलल्याने त्यांच्या आचरणात फरक पडतो; कारण ज्याला आपण स्थूल-दृष्टीने सत्य किंवा असत्य, हिंसा किंवा अहिंसा, क्षमा किंवा क्रोध,परोपकार किंवा अनुपकार समजतो, त्याचे स्वरूप कधी कधी बदलते. अशा वेळी उलटच जाणवू लागते. यासाठी या सदाचाराला अपवादही असतात. कधी-कधी ज्याला आपण असत्य समजतो, तेच सत्याप्रमाणे हितकारक वाटते. विराट राजाकडे आपण कोण आहोत हे पांडवांनी सांगितले नाही, परशु-रामाने आपल्या वडिलांच्या आज्ञेने आपल्या आईला मारले, पृथ्वीराजाने महंमद घोरीला क्षमा केली, धृष्टद्युम्नाला द्रोणाचार्यांनी विद्या दिली, इत्यादि उदाहरणे अशी आहेत. परंतु महात्म्यांचा निर्णय असा नाही. त्यांच्या मताने सद्गुणांचे पालन नेहमीच करावयास हवे.

३६) लोकप्रतिष्ठा, स्वार्थ, हिंसा, द्वेष इत्यादि दोषांनी ज्यांचे मन दूषित होत नाही, अशांच्याच अंत:करणात धर्माचे स्वरूप प्रकाशित होते. त्यांची वचने म्हणजेच शास्त्र. 'महाजनो येन गत: स पन्था:' हे सुभाषित याच शास्त्रातून आले आहे. 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ' (गीता १६।२४) म्हणजे काय करावे, काय करू नये या बाबतीत शास्त्रच प्रमाण आहे, हा गीतेचा अभिप्राय अशाच शास्त्रानाअनुलक्षून आहे.

३७) स्वार्थ, ईर्ष्या, द्वेष, वाईटपणा,लोभ ज्यांच्या अंत.करणात आहे, ज्यांना दुसऱ्या कोणाचाही उत्कर्ष चांगला वाटत नाही, जे लोकहिताच्या कार्यात देखील आपला स्वार्थ साधतात, व तसे जमले नाही तर जे दुष्टपणा करण्यास सिद्ध होतात, अशा लोकांनी धर्माची व्यवस्था विचारणे किंवा स्वीकारणे मूर्खपणा आहे.

३८) ज्या देशात किंवा समाजात देश-काल-परिस्थितीप्रमाणे आचार-धर्माचे विवेचन करणारे नसतात, तो देश आणि समाज अध:पतनाकडे जातो,कारण भडकवणारे, प्रतिष्ठाकामी, अहंकारी, इंद्रियपरायण,सुखलोलुप पुरुषच त्या देशाचे त्या वेळी पुढारी व भाग्यविधाते बनतात. त्यांचे मुख्य

काम म्हणजे सत्य. प्रकाशक महात्म्यांची अडवणूक करणे, त्यांच्यावर शक्य त्या प्रकारे खोटे आरोप करणे, आणि मुक्या प्रजेला आपल्याच स्वार्थाला अनुकूल होईल अशा रीतीने हाकणे, जर कोणी धर्मनिष्ठ आपल्या विचाराला चिकटून राहिला तर त्याला प्रसंगी जीवे मारणे. महात्मा येशू, सुकरात, यांच्या बाबतीत इतिहासात असेच आढळते शंकराचार्य, रामानुज, चैतन्य, बल्लभ, दयानंद यांच्यावर ज्या आपत्ति आल्या, त्या इतिहास वाचणाऱ्यांना अपरिचित नाहीत. परंतु हीन पुरुषांकडून या महात्म्यांवर अन्याय होऊनही त्यांचे नुकसान झाले नाही, कारण हे महात्मे मृत्यूच्या भीतीपासून मुक्त होते; त्यांच्या त्यागाने धडा घेणाऱ्यांना मात्र असे बलवत्तर प्रमाण मिळाले, की ज्यायोगे धर्ममार्गाने चालणारे त्यांचे सदैव आदरानेच स्मरण करू लागले. धर्म सोडला तरी एके दिवशी मृत्यूला सामोरे जावेच लागणार, मग धर्मापासून विचलित का व्हावे हाच त्यांच्या जीवनाचा श्रेष्ठ मंत्र असतो. त्यांनाच खरे धार्मिक म्हणतात. खरे महात्मे या पांचभौतिक शरीरात न राहता देखील जगताचे हितच आपल्या आदर्शाने करीत राहतात,व मृत्यूच्या पलीकडील आपल्या चिरंतन आत्म्याकडेच लक्ष देत असतात. यामुळे मृत्यूच्या भयाने ते आपल्या विचारापासून जराही परावृत्त होत नाहीत, गुरु तेगबहादुर आणि गुरु गोविंदसिंहाच्या दोन लहान मुलांची गोष्ट याचेच ज्वलंत उदाहरण होय.

(३९) दुष्ट लोकांच्या मनावर वाईट विचारांचा फार लौकर प्रभाव पडतो. पाण्याचा प्रवाह उताराच्याच बाजूला असतो. माशीचे लक्ष शरीराच्या जखमेवरच असते. दुष्ट स्वभावाच्या माणसाचे असेच असते. त्याला चांगल्या गोष्टींचा उपदेश कितीही सुंदर भाषेत केला तरी तो बाईटच लागतो. कधी कधी अशा स्वभावाचा मनुष्य समाधि, योग, भक्ति,वेदांताच्या गोष्टी शिकून 'सोसायटी'त बसून स्वतःला मोठा सत्संगी म्हणवून घेतो; कधी तो कोरडी विद्वत्ता दाखविण्यासाठी वेद, उपनिषदे, पुराणे इत्यादि ग्रंथातून उतारे देऊन स्वतःला सर्वज्ञ विद्वान् सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो; कधी संत-महात्म्यांच्या वेषातही वावरून प्रदर्शन करतो; कधी आपणाला तो लेखक, प्रवचनकाराच्याही रूपात दिसतो; परंतु असे

असूनही प्रसंग निर्माण झाल्यावर त्याचे खरे रूप दृष्टीस पडतेच बाह्य-वेष म्हणजे डोक्याचे मुंडन करणे, जटा राखणे, भगवी वस्त्रे घालणे,तिलक लावणे यानी वास्तविक दुष्टता लपत नाही. हे वेष दुष्कर्म करणारेही दुष्ट कर्मांच्या आचरणासाठीच घेतातही. सीताहरणप्रसंगी रावणाने देखील यतीचा वेष घेतला होता, कालनेमीने देखील मारुतीला फसविण्यासाठी मुनीचा वेष धारण केला होता, परंतु त्यामुळे सत्य गोष्ट लपून राहिली नाही. "उधरहि अंत न होइ निबाहु, कालनेमि जिमि रावण राहु" असे गोस्वामी तुलसीदासजींनी म्हटलेच आहे.

४०) दुष्ट लोक नेहमीच सत्पुरुषांशी अकारण वैर करतात. हा त्यांचा वैरभाव सर्वांशीच असतो, तरी त्यांचे मुख्य शत्रु सज्जनच असतात. ते सज्जनांची जिकडे तिकडे अपकीर्ति पसरविण्याचा प्रयत्न करीत असतात व त्यांना खाली आणू पाहतात, परंतु या उपायाने उलट त्यांची कीर्ति वाढतच जाते. आणि योग्य व्यक्तीमध्ये त्यांचे महत्त्व प्रकट होते. या विषयावर महात्मा कबीराने फार सुंदर वर्णिले आहे–"निंदक नियरे राखिये आँगन कुटी छवाय, बिन पानी बिन साबुन सहजहि करत सुभाय" धन्य ते महात्मे की जे वाइटातूनहि चांगलेच शिकतात.

४१) ज्याचे मन शांत नाही, विषयांपासून जो निवृत्त झालेला नाही, ज्याला सांसारिक मान-प्रतिष्ठा हवी आहे, तो कितीही पुस्तके वाचो, लेखकांमध्ये मान्यता मिळवो, व्याख्यान देणाऱ्यांमध्ये वाचस्पति बनो, बाह्य चिन्हांवरून लोक त्याला भलेही महात्मा म्हणोत, तथापि त्याला शांतता मिळत नाही.

४२) ज्यांच्यात श्रद्धा व विश्वास नाही, ज्यांचे चित्त नेहमी भटकत असते, आज कोणाजवळ एखादी गोष्ट विचारली व त्याच्या उलटच वागू लागले, फक्त मोठ्या मोठ्या गोष्टी करणे हाच ज्यांचा स्वभाव झाला आहे, एखादी गोष्ट कुठूनतरी समजली व त्याच्याच आधारावर शास्त्रार्थाला प्रवृत्त झाले, अमुक एक गोष्ट यांना माहीत आहे की नाही यावरच विद्वान् संताची परीक्षा करतात, आज एखाद्यांची पूजा तर उद्या वेगळाच प्रकार

केवळ नाव मिळविण्यासाठी परमार्थाचा आश्रय-अशा प्रकारचा ज्यांच स्वभाव आहे, त्यांना खरी शांति कधीच मिळू शकत नाही. गीतेमध्ये अशाच माणसांसाठीं लहिले आहे की जे अज्ञ, श्रद्धारहित, संशय धारण करणा आहेत त्यांचा विनाश होतो 'अज्ञश्च अश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति (गीता ४४।४०) विश्वासाचे महत्त्व कुलार्णवतंत्रात सांगितले आहे 'विश्वासाय नमस्तस्मै सर्वसिद्धिप्रदायिने । येन मृद्-दारु-दृषदः फलन्त्य विकलं फलम् ॥" म्हणजे ज्यामुळे मातीतून, लाकडातून आणि दगडातूनहि निश्चित फळ मिळू शकते, त्या संपूर्ण सिद्धि देणाऱ्या विश्वासाला नमस्का असो.

४३) कोणीतरी विचारले: सर्वात मोठे साधन कोणते, की ज्यावर आपण विश्वास पक्का करू ? उत्तर मिळाले ज्यामुळे आपले कल्याण होईल वाईट भावनांचे नियंत्रण होईल, ज्यामुळे आत्मसाक्षात्कार किंवा भगवत्साक्षात्कार होईल तेच साधन सर्वात श्रेष्ठ. साधनप्रणाली शैव, वैष्णव, शाक्त, कर्मयोगी, ज्ञानी इत्यादि भेदाने अनेक प्रकारची आहे, व ती खरे म्हणजे हाच उद्देश सिद्ध करते. सामान्यतः अडाणी लोक हे भेद पाहून भांडतात की आमचीच साधनप्रणाली सत्य व श्रेष्ठ आहे, पण वस्तुस्थिति अशी नाही. जो ज्याचा अधिकारी आहे,तेच साधन त्याला सर्व प्रकारे श्रेष्ठ आहे. खरी गुणांची परीक्षा न झाल्यामुळेच असे वाद निर्माण होतात.

४४) जी साधने भगवत्कृपेने अगर सद्गुरुकृपेने मिळतात, तीच मनुष्याला कल्याणकारी असतात. साधकाने पूर्ण श्रद्धेने त्या साधनाचे अवलंबन करणे आवश्यक आहे. त्यामध्ये कधीहि संशय आड येऊ देऊ नये. जर थोडाही संशय त्याच्या मनात निर्माण होईल तरी त्या साधनाचा त्याला काहीही लाभ होणार नाही, कारण संशय सर्व साधनांचा विनाश करणारा असतो.

४५) मनुष्य आपल्या चांगल्या वाईट कर्मांच्या मिश्रणाचे अनुषंगाने या जगात आलेला आहे, परंतु खऱ्या हेतूचे ज्ञान न झाल्यामुळे तो भटकत राहतो. त्यातून सुटण्याचा प्रयत्न तो करीत नाही असे नाही, परंतु त्यात तो जास्तच अडकतो. अनेक मतमतांतरांच्या गोंधळाकडे पाहिल्यावर त्यांचे

खरे स्वरूप काय आणि आपण ते कोणत्या कारणास्तव मानले पाहिजे या-विषयी तो निश्चय करू शकत नाही. पुष्कळसे लोक तर विचार केल्याशिवाय वायफळ एखाद्या मताचा आग्रह दाखविण्यात स्वत:ची प्रतिष्ठा समजतात, आणि आचारधर्माचे पालन न करता ढोंगीपणामुळे आत्मवंचना करून बसतात. काहीजण निंदास्तुति रूपधडे शिकवितात-आपली प्रशंसा व दुसऱ्या मताची निंदा हेच त्यांचे वास्तविक लक्ष्य असते. हे एवढ्या प्रमाणावर वाढले आहे की शास्त्रात देखील या गोष्टी समविष्ट केल्या गेल्या आहेत. जेव्हा विचार करण्याची वेळ येते तेव्हा प्रमाण म्हणून या गोष्टी सांगितल्या जातात. अशा परिस्थितीत यथार्थ मार्ग कोणता याचा निर्णय अशक्य होऊन जातो. असे वाटते की याच कारणामुळे 'भगवत्कृपेशिवाय उद्धार होऊ शकत नाही, कारण तीच एक गोष्ट या सर्व घोटाळ्याच्या पलीकडे आहे, असे संतांनी सांगितले आहे. भगवत्कृपा केव्हा प्राप्त होईल, या विषयी निश्चयाने काहीही सांगता येत नाही.

४६) हट्ट आणि आग्रह वास्तविक अत्यंत नुकसानकारक असतो, त्यामुळे हट्ट करणारा अनेक अडचणींत सापडतो. जेव्हा मनुष्य एखाद्या अयोग्य वस्तूविषयी आग्रह धरतो, त्याच वेळी विचारशक्ति त्याला सोडून जात असते. विवेक नसल्यामुळे पतन होते–"विवेक भ्रष्टानां भवति विनिपात: शतमुख:" (नीतिशतक १०), विवेकभ्रष्टांचा शेकडों प्रकारांनी अध:पात होतो. परंतु सत्य, श्रद्धा सदाचार याविषयी आग्रह धरला तर तर मनुष्याची उन्नति होते,कारण त्या स्थितीत विचारशक्ति शुद्ध करणाऱ्या याच गोष्टी आहेत.

४७) पावित्र्य अंगी बाणविणे अत्यंत आवश्यक आहे. पावित्र्य दोन प्रकारचे असते–एक मुख्य आणि दुसरे गौण,शुद्ध विचार, सदाचाराचे पालन, आणि हिंसा–द्वेष-भय इत्यादींचा त्याग हे मुख्य पावित्र्य, माती, पाणी इत्यादींच्या द्वाराने बाह्यत: पावित्र्य येते. ज्या वेळी अशुद्ध विचार मनात उद्भवतो, त्या वेळी त्याची झपाट्याने वाढ होते. पाण्यात एखादा दगड अगर ढेकूळ फेकल्यावर लाटा उत्पन्न होऊन सर्व जलाशय क्षुब्ध करून

टाकतात, त्याच प्रमाणे अशुद्ध विचार अनेक रूपे धारण करतो. त्यावेळी धैर्य सहनशक्ति लुप्त होतात, अगदी जलाशयाप्रमाणेच स्थैर्य नष्ट होऊन अंतःकरण क्षुब्ध होते. त्या आवेशाच्या प्रभावाखाली मनुष्य अनेक वाईट कृत्ये करतो. अनेक रोगांची कारणे देखील हींच, असतात. क्रूरपणा, कठोरपणा, निर्लज्जपणा इत्यादि पाशवी गुण मनुष्यात प्रवेश करतात, त्यानंतर निंदा, ईर्ष्या, क्रोध, काम उत्पन्न होऊन महानाशाची सामग्री सिद्ध होते आणि शेवटी मनुष्य नरकाकडे ओढला जातो. याकरिता मुख्यतः हे पावित्र्य साधकाने साधले पाहिजे. बाह्य पावित्र्य ढोंगी लोक देखील जगाला फसविण्यासाठी करीत असतात. पवित्र्याचा अर्थ इतरांकड़े घृणेने पाहणे असा नव्हे; उलट अपवित्र, पतित लोकांना धैर्य, सांत्वना इत्यादि शुभ गुणाच्या द्वारा शुद्ध करणे आणि पापाचरणापासून सोडविणे असा आहे. म्हणूनच म्हटले आहे– Hate the sin. but love the sinner, म्हणजे पापाचा तिरस्कार करा, पण पाप्यावर प्रेम करा. वस्तुस्थिती अशी आहे की खरे पवित्र्य तेच. याचा अर्थ असा मात्र करणे बरोबर नाही की बाह्य पावित्र्य अनुपयुक्त आणि व्यर्थ आहे. बाह्य पावित्र्याचे आचरण देखील मनाच्या शुद्धीचे कारण असते, तथापि विचारांच्या द्वारा आंतरिक शुद्धि झाल्याशिवाय त्यापासून विशेष लाभ होत नाही. बाह्य पावित्र्याचे आचरण देखील विचारपूर्वक असेल तरच लाभप्रद होते म्हणून याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

(४८) ज्याप्रमाणे सोने अग्नीमध्यें तापविल्यावर शुद्ध होऊन चमकू लागते, त्याचप्रमाणे अहिंसा, ब्रह्मचर्य, परोपकार, दान, सत्पुरुषांची सेवा, गुरूची सेवा, देवतापूजन, इत्यादि क्रियांमुळे शरीराचे दोष नष्ट होतात. यालाच कायिक तप म्हणतात सत्य, प्रिय व हितकारक भाषण, मंत्रजप, वेदाचा दैनिक स्वाध्याय, इत्यादि क्रियाकलापाला वाचिक तप म्हणतात. मन निर्मल, असूयादि दोषांपासून मुक्त, व शुद्ध विचार युक्त राखणे, मंत्रांचा मानसिक जप, ध्यानाचा अभ्यास इत्यादींना मानसिक तप म्हणतात. या रीतीने जो त्रिविध तपाचरण करतो तोच खऱ्या अर्थाने तपस्वी.

प्राचीन काली असे आचरण करण्यासाठी एक स्वतंत्र व्यवस्था होती, तिला वानप्रस्थ म्हणत.

(४९) जितकी म्हणून साधने, शास्त्र किंवा महात्मागण सांगतात, त्या सर्वांची सिद्धि ब्रह्मचर्यावर अवलंबून आहे. जो पुरूष कामुक आहे, तो कितीही उत्तम साधना करो, त्याला सिद्धि मिळू शकत नाही. जितक्या सूक्ष्म, दैवी आणि व्यावहारिक शक्ति आहेत, त्या सर्वप्रथम पूर्ण संयत वीर्यावस्थेतच आपला प्रभाव पाडतात. वीर्याचा लाभ ब्रह्मचर्यानेच होतो असे 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' या योगसूत्रात सांगितले आहे. ब्रह्मचर्याच्या जोरावर अशक्य कार्येदेखील पार पाडता येतात. हनुमान, भीष्म, शंकराचार्य, दयानंद इत्यादि पुण्यपुरुषांचे कार्य याला साक्ष आहे. वेदविद्या सरस्वतीदेखील, ब्रह्मचारिणी याच रूपात उपास्य मानली गेली आहे. याचमुळे विद्यार्थ्यांना ब्रह्मचारी राहण्याची आज्ञा धर्मशास्त्रात केली आहे. ब्रह्मचर्याखेरीज विद्याप्राप्ति अशक्य आहे. ब्रह्मचर्यालोप वेदविद्येचाहि लोप करवितो. विषयी, कामुक, अशांच्या जवळ वेदविद्या राहू शकत नाही. प्रकाश आणि अंधकार यांच्याप्रमाणे दोन्हीमध्ये विरोध आहे. आळस, प्रमाद, कुचेष्टा इत्यादि दुर्गुण ब्रह्मचर्याच्या अभावानेच उत्पन्न होतात. ब्रह्मचर्याच्याच विनाशाने धैर्याचाही नाश होत असतो. म्हणून कोणतेही गंभीर विचारात्मक कार्य कामुक मनुष्य करू शकत नाही. योग्य सुधारणेचा आरंभ ब्रह्मचर्यापासून होतो. ते सोडून केवळ पुस्तकांच्या अभ्यासाने बेकारी घालविण्याशिवाय आणखी कोणतीही आर्थिक उन्नति होऊ शकत नाही. शिक्षणाबरोबर असलेला ब्रह्मचर्याचा संबंध अग्नि आणि दाहक्रिया याप्रमाणे नित्य आहे. परमार्थाच्या योगभक्ति इत्यादि साधना देखील यावरच अवलंबून आहेत. कोणत्याही योग साधकाचे पतन तेव्हाच झाले, जेव्हा त्याने कामिनीकडे दृष्टिक्षेप केला. 'मरणं बिन्दुपातेन जीवनं बिन्दुधारणात्' वीर्यधारण हेच जीवन आणि वीर्यपात हेच मरण, या किंवा 'ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमुपाघ्नत' ब्रह्मचर्यरूपी तपाने देवतानी मृत्युला जिंकले, या वचनांचा आशय हाच आहे. सध्या कार्याची जी असफलता आपण पाहतो, तिचे मुख्य कारण ब्रह्मचर्याचा अभाव हेच आहे.

सद्विद्यांचा लोप व निर्लज्जतेचा विस्तार ब्रह्मचर्याच्या अभावानेच होतो. 'कामातुराणां न भयं न न लज्जा'. ब्रह्मचर्याशिवाय निर्भयताही येऊ शकत नाही. हे लक्षात ठेवावे की निर्भयता म्हणजे उच्छृंखलपणा नव्हे, व निर्भयता म्हणजे स्वातंत्र्यही नव्हे. पूर्ण स्वातंत्र्य जितेंद्रियालाच प्राप्त होते. ब्रह्मचर्यामुळेच अनेक प्रकारच्या आपत्तिसहन करण्याची शक्ति प्राप्त होते. ज्या वीर पुरुषांचा पराभव झाला आहे, तो ब्रह्मचर्य भ्रष्ट झाल्यानंतरच. वास्तवात ब्रह्मचर्य हे साधन सर्व साधनात शिरोमणिभूत आहे. याकरिता त्याचे पालन केले पाहिजे आणि तद्विरोधी भावनांचा त्याग करण्याविषयी अत्यंत सावधान असले पाहिजे.

(५०) कोणत्याही मनुष्याला उपदेश तेव्हाच द्यावा, जेव्हा परीक्षा केल्यावर त्याचा अधिकार सिद्ध होईल. जो उपदेशक असे करीत नाही, त्याचा उपदेश नापीक जमिनीत पेरलेल्या बी प्रमाणे निष्फल होतो. उपमन्यु, आरुणि, इत्यादि योग्य शिष्यांची योग्यता परीक्षा घेतल्यावरच प्रकट झाली होती.

(५१) जो उपदेशक पक्षपातामुळे मलिन अंतःकरणाचा असतो, किंवा जो उपजीविकेसाठी उपदेश करतो, त्याचा उपदेश वाळूच्या पुलाप्रमाणे दुर्बल असतो. तो ऐकणारा आणि ऐकविणारा या दोघांचेही हित होत नाही. सांप्रत नोकरलोक देखील उपदेश देण्याचे काम करतात. मोठमोठ्या सभादेखील भरतात. परंतु त्यांचा काही दृढ प्रभाव पडत नाही. याचे मूळ कारण वर जे सांगितले तेच आहे. आणि बोलणार तरी काय ? चरितार्थाचा प्रश्नच असा उत्पन्न झालेला आहे की आता तर कोणतेही धार्मिक आणि व्यावहारिक क्षेत्र यापासून सुटलेले राहिले नाही. एखाद्या विषयावर थोडे देखील काही बोलण्याची इच्छा व्हावी तर जीविकोच्छेदाचे पाप समोर उभे राहते.

(५२) ज्या शिक्षणाने दास्याची शृंखला मजबूत बनते, मनुष्याला वाईट गोष्टींची संवय लागते, अभिमान–अहंकार–घृणा–अहंमन्यता–स्वार्थ-परायणता ज्यामुळे वाढतात, ते खरे म्हणजे शिक्षणच नव्हे शक्यतो पर्यंत त्याचा त्याग केला पाहिजे, तेव्हाच देशाचे आणि समाजाचे कल्याण होईल.

योगरत्नमणिग्रंथन

प्रकृतीच्या नानाविध परिणामांच्या द्वारा मनुष्याच्या व्यवहारात अनेक प्रकारची गुंतागुंत निर्माण होते. त्यामुळे सत्याचा अनुभव न येता मनुष्य अज्ञानाच्या फेऱ्यातच गुंतत जातो. त्यामुळेच योगशास्त्रातल्या आचार्यांनी योगाभ्यासाच्या साधनाने मनुष्यव्यवहार शुद्ध करण्याचा मार्ग सांगितला. मंत्र, हट, लय आणि राज अशा प्रकारे योगाचे चार प्रकार मानले जातात. या चारही प्रकारांनी हृदयाची शुद्धि परमात्म्याचा साक्षात्कार, आणि अणिमादि अनेक सिद्धींची प्राप्ति योग्याला होते असे अनेक आचार्यांनी सांगितले आहे. सिद्धीपेक्षाही चित्ताची समता आणि विषयासंबंधी वैराग्यबुद्धि निर्माण होणे हेच योगाचे मुख्य लक्ष्य आहे. सिद्धि तर परमार्थाला बाधकच होतात. पात्रता असलेला योगीच सिद्धींचा योग्य उपयोग करू शकतो. म्हणून या विषयी योग्याला अत्यंत सावध राहिले पाहिजे. या सर्वात मंत्रयोग सुलभ आणि स्वाभाविक असल्यामुळे प्रथम त्याविषयीच ग्रंथन करू.

(१) मनन करण्याच्या द्वारा जो त्राण म्हणजे साधकाचे रक्षण करतो तो मंत्र मंत्राने सात्त्विक, शुद्ध भावांचा बोध होतो. मंत्राच्या अभ्यासाने मलिनत्व विशिष्ट जीवोपाधीमध्ये सात्त्विक भावाचा आविष्कार झाल्याने मलिनताजन्य दोषांचा नाश होतो. व जीवभाव निवृत्त होऊन ब्रह्माचे सानिध्य प्राप्त होते. म्हणून मंत्राचा आश्रय प्रथमच साधकाला घेणे आवश्यक आहे.

(२) प्रत्येक साधक-संप्रदायात अनेक विलक्षण शक्ति असलेल्या मंत्रांचा जप सांगितलेला असतो. वैष्णव, शैव, शाक्त या मतांमध्ये नाम आणि बीजमंत्र यांच्या जपाला फार महत्त्व दिलेले आहे. जपानेच खरे म्हणजे मंत्र सिद्ध होऊन त्याच्या अर्थाचा अनुभव येतो; परंतु जपाच्या

विभिन्न नियमांचे नीट ज्ञान नसेल तर मंत्रजप सफल होत नाही. प्रत्येक मंत्र स्वर-अर्थ-छंद-विनियोग यांचे ज्ञान करून घेऊन जपला तर सफलता मिळते, नाही तर कधी कधी विपरीत फल देखील मिळू शकते. जपाचे तीन प्रकार आहेत-वाचिक, उपांशु आणि मानस, ज्या जपात शब्द स्पष्ट उच्चारण करून ध्वनिसहित ऐकू येतो, त्याला वाचिक जप म्हणतात. ज्या जपात शब्द ऐकू येत नाही, परंतु वागिंद्रियाच्या क्रियेने फक्त ओठ हलतात, त्याला उपांशु जप म्हणतात. अर्थज्ञानपूर्वक मनातच साधक जेव्हा मंत्राचा जप करतो, तेव्हा त्याला मानस जप म्हणतात. वाचिकापेक्षा उपांशु व उपांशूपेक्षा मानस जप जास्त चांगला मानलेला आहे. 'तस्य वाचकः प्रणवः । तज्जपः तदर्थभावनम् ।'- प्रणव परमात्म्याचा वाचक आहे, त्याचा जप म्हणजे त्याच्या अर्थाची (मनांत) कल्पना केली पाहिजे. अशा प्रकारे महर्षि पतंजलीनी योगातील संकटे दूर करण्यासाठी व परमात्म्याची कृपा व्हावी म्हणून मंत्रश्रेष्ठ ओंकाराच्या जपाचे विधान केले आहे. 'ओम् इति एकक्षरं ब्रह्म व्याहरन् माम् अनुस्मरन्' गीतावचनांत (८।१३) देखील हेच तत्त्व समविष्ट केलेले आहे. जप सर्व यज्ञात श्रेष्ठ असल्यामुळे भगवंतानी 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' यज्ञांमध्ये जपयज्ञ मी आहे असे म्हटले आहे. नामजपात दहा नामापराध मानले आहेत, त्यांचे स्वरूप बहुतेक प्रसिद्धच आहे, व यांच्या पालना खेरीच भगवत्साक्षात्काराची सिद्धि शक्य नाही, म्हणून मंत्रांच्या रीतीचे ज्ञान मिळवून भजन करणेच साधकाला योग्य आहे.

३) जपाच्या द्वारा मंत्र चैतन्यरूप बनतो व कुंडलिनी शक्तिजागृत होते. मग मंत्रच देवतारूप धारण करतो. स्वप्नात देवतेचे दर्शन, आवेश आणि साक्षात्कार या तीन अवस्था प्राप्त झाल्यावर, म्हणजेच या तीन अवस्थांमध्ये देवतेचे स्वरूप पूर्णपणे प्रत्यक्षात अनुभवाला आल्यावर कुंडलिनी पूर्णपणे जागृत होते. याच अवस्थेत सिद्धि मिळवू इच्छिणाऱ्यांना सिद्धि व निष्काम साधकाना मोक्षाचा अधिकार प्राप्त होतो. वेगवेगळ्या मंत्रांच्या सिद्धि-कालात साधकाला अनेक दिव्य मूर्तीच्या स्वरूपाचे प्रत्यक्ष ज्ञान होते.

कुंडलिनी द्वाराच या प्रकाशमय रूपांची सृष्टि होते. 'स्वाध्यायादिष्टदेवता-संप्रयोगः' या योग सूत्रात हेच तत्त्व व्यासदेवानी भाष्यातून सांगितले आहे. जपकालात पुष्कळ विचित्र स्वप्ने पडतात, त्यांचा विचार मंत्रयोग-संहिता, मंत्रमहोदधि इत्यादि ग्रंथात केला आहे. त्यामुळे साधकाला जो समाधीचा लाभ घडतो, त्याला भावसमाधि म्हणतात. मंत्रयोगाचा आश्रय सर्वच योगांमध्ये असतो, कारण परमात्म्याच्या साक्षात्कारात मंत्र हेच मुख्य कारण असते.

४) मंत्र शब्दात्मक असल्यामुळे आणि शब्द सगळ्या व्यवहाराचे कारण असल्यामुळे आर्य शास्त्रामध्ये या विषयावर पुष्कळ विचार केला गेला आहे. शब्दाचा परम-कारण-रूप ब्रह्माशी अभेद संबंध आहे. बायबलमध्ये देखील म्हटले आहे की, सृष्टीच्या आरंभी फक्त शब्दच होता, तो परमात्म्याच्या बरोबर होता, किंबहुना तो स्वतःच परमात्मस्वरूप होता (In the beginning was the word, and word was with God and the word was God). पराशक्ति जेव्हा सृष्टि निर्माण करण्याच्या इच्छेने अहं-रूपाने ब्रह्माचा प्रकाशात्मक भाव, व विषयाच्या इदं-रूपाने विमर्शात्मक रूप धारण करून विषयी व विषय यांना व्यक्त करते, तेव्हा त्याचे कारण शब्दच मानला जातो. महर्षि व्यासानी वेदांत दर्शनाच्या 'शब्द इति चेन्न, अतः प्रभवात् प्रत्यक्षानुमाना-भ्याम्' (१-३-२८) या सूत्रात सृष्टीचे कारण म्हणून शब्दच सांगितला आहे. श्रुति आणि स्मृति या दोन्ही प्रमाणांनी शब्दच जगाचे कारण आहे असे भाष्यकारानी अनेक पुरावे देऊन सिद्ध केले आहे. ती एक अत्यंत सूक्ष्म अवस्था आहे, या आदि शब्दाला परा वाणी म्हणतात, तिला ब्रह्माची भाषा म्हणतात मूलाधारापासून तिची अभिव्यक्ति होते. ती योग्यानाच समजते. मंत्र व बीज याचा विकास तिच्याचमुळे होतो. जेव्हा विमर्श आणि प्रकाश यांची स्थूलावस्था येते, तेव्हा तिलाच नाद म्हणतात. नादात सर्व वर्ण अर्थप्रकाशनरूप सामर्थ्यासह राहतात. जशी जशी सृष्टि स्थूल रूप धारण करत जाते, तसे तसे शब्दाला देखील स्पष्ट रूप येत जाते. यथाक्रम पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या तीन वाणींची रूपे धारण करून सर्व

वैदिक व लौकिक व्यवहाराचे कारण म्हणून शब्दच असतो. परा वाणी सत्य आणि नित्य मानली गेलेली आहे. बाकीच्या वाणीरूपांमध्ये माया म्हणजेच अज्ञानाचा परिणाम संबद्ध झाल्यामुळे त्या त्या प्रमाणात तारतम्य येते. सत्याचा प्रकाश कमी असल्यामुळेच यामध्ये कमीपणा आलेला आहे असे मानून तींत विशेष भेद केले गेले आहेत. व्याकरण शास्त्रात वर्णांपासून भिन्न अशा स्फोटाला शब्द म्हटलेले आहे. नाद हे नाव वर्णाचेच आहे. 'नादाभिव्यङ्ग्यः शब्दः स्फोटः' नाद किंवा वर्ण या पासूनच स्फोटाची अभिव्यक्ति किंवा प्रकाश होतो, आणि तो नित्य असतो. उपवर्ष या आचार्यांच्या मताने वर्ण हाच शब्द, स्फोटवादु महर्षि पतंजलि, भर्तृहरि, कैयट इत्यादि प्रसिद्ध वैयाकरणानी मानलेला आहे. नागेश भट्टानी स्फोट मताचेच परमलघुमंजूषेत प्रतिपादन केले आहे. शब्द तत्त्व स्पष्ट करण्यासाठी ६३ किंवा ६४ वर्ण मानलेले आहेत. 'त्रिषष्टिश्चतुषष्टिर्वा वर्णाः शंभुमते मताः। प्राकृते संस्कृते चापि स्वयं प्रोक्ताः स्वयंभुवा ।। आत्मा बुद्धया समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया । मनः कायाग्नि माहन्ति स प्रेरयति मारुतम् ।। मारुतस्तूरसि चरन् मन्द्रं जनयति स्वरम् ।।'(पाणिनीय शिक्षा ३,६,७) म्हणजे प्राकृतात व संस्कृतात ६३ किंवा ६४ वर्ण खुद्द स्वयंभू भगवानांनी सांगितले आहेत. आत्मा बुद्धीच्या द्वारा अर्थ स्वीकारून मनात बोलण्याची इच्छा निर्माण करतो. मन कायाग्नीवर आघात करते; तो आघात वायूला प्रेरणा देतो; त्यामुळे वक्षःस्थलात गंभीर स्वराची उत्पत्ति होऊन (पश्यंती व मध्यमा यांच्या पुढील) वैखरी नामक अत्यंत स्थूल वाणी प्रकट होते. 'शब्दः खे पौरुषं नृषु', 'शब्दब्रह्माडऽनि वर्तते', 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म' इत्यादि गीता वचनामध्ये देखील शब्द तत्त्वाचे विवरण केलेले आहे. उदात्त, अनुदात्त आणि स्वरित या भेदांनी षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, आणि निषाद हे सात स्वर देखील शब्दाच्या उच्चारणात मानले जातात. योगशास्त्रात नाद, बिंदु आणि कला ही तीन नावे शब्दालाच अवस्थाभेदाने दिलेली आहेत. जसजसे अर्थामध्ये वैचित्र्य येत जाते, तसतसे शब्दही वेगळी रूपे धारण करीत जातो, शुद्ध सात्त्विक दैवी भावाच्या व्यंजक शब्दालाच मंत्र म्हणतात. दैवी भावाचे व्यंजक असे चार संप्रदाय मंत्रामुळेच झालेले आहेत,त्यांना वैदिक, पौराणिक,

तांत्रिक व शाबर म्हणतात. उत्तरोत्तरा पेक्षा पहिल्याला श्रेष्ठत्व आहे, म्हणजे शाबरापेक्षा तांत्रिक, तांत्रिकापेक्षा पौराणिक, पौरांणिकापेक्षा वैदिक मंत्र श्रेष्ठ मानले जातात. तांत्रिक एकूण ५१ वर्णसंख्या मानतात, बाकीचे १२–१३ वर्ण वेदातच उच्चारणभेदाने मानले जातात. वस्तुत: ५१ मातृकांमध्येच वाङमयाचा समावेश योग्य प्रकारे होऊन जातो. तंत्र ग्रंथामध्ये विशिष्ट भाव प्रकट करण्यासाठी बीजमंत्र देखील मानलेले आहेत. परमेश्वराच्या आठ मुख्य प्रकृतिप्रमाणेच बीजमंत्रही ओंकार-स्वरूप शब्द ब्रह्माच्या आठ प्रकृति या स्वरूपात प्राधान्याने मानले गेले आहेत, त्यांनाच मंत्रयोगसंहितेत पुढील प्रमाणे वर्णिले आहे-'गुरुबीजं शक्तिबीजं रमाबीजं ततो भवेत् । कामबीजं योगबीजं तेजोबीजमथाऽपरम् । शक्तिबीजं च रक्षा च प्रोक्ता चैषां प्रधानता ।' ऐं, ह्रीं, श्री, क्लीं, क्रीं,ट्रीं, स्त्रीं, ह्लीम् ही आठ बीजे ओंकाररूप शब्दब्रह्माच्या प्रधान शक्ति मानल्या जातात. प्लुतस्वरावशिष्ट ओंकार हाच नाद असे लिंगपुराणात म्हटले आहे. मंत्रशास्त्रात मंत्राचे तीन प्रकार केले आहेत. बीजमंत्र, मंत्र आणि मालामत्र. यापैकी मंत्र आणि मालामंत्र याचा अर्थ स्पष्टच आहे. बीज-मंत्राचा अर्थ जपानंतर समजतो, त्याचा अर्थ व्युत्पत्ति लावून समजू शकत नाही. क्रीं, ह्रीं, हुँ, फट् इत्यादि मंत्रापासून मंत्रशास्त्राच्या पद्धतीनुसार निरनिराळ्या सिद्ध साधक मिळवितो. ह्रस्व,दीर्घ, प्लुत इत्यादि स्वरांच्या उच्चारणाच्या ज्ञानाने आणि पूरक मंत्रांच्या साहाय्याने मंत्रसिद्धि प्राप्त होते. त्यामुळेच कुंडलिनीचे उत्थान होते आणि सुप्त असलेल्या नाना दैवी शक्ति जागृत होतात, तेव्हांच जीव अविद्येपासून मुक्त होऊन ब्रह्मानंद भोगू लागतो.

५) वैयाकरणांच्या मताप्रमाणे शब्द आणि अर्थ यांच्यात भेदाभेद मानलेला आहे परंतु मीमांसाशास्त्रात आणि तंत्रशास्त्रात अभेद मानला जातो, म्हणजेच देवता आणि मंत्र हे एकच देवतेचेच पूर्वरूप म्हणजे शब्द किंवा मंत्र,म्हणूनच तांत्रिक साधकांच्या विषयी तंत्रग्रंथात असे म्हटले आहे– 'यथा घटश्च कलश: कुम्भश्चैकार्थ वाचक: वाचक: । तथा देवश्च

मन्त्रश्च गुरुश्चैकार्थ उच्यते ।। यथा देवस्तथा मन्त्रों यथा मन्त्रस्तथा गुरुः । देवमन्त्रगुरूणां च पूजया सदृशं फलम् ।। (कुलार्णवतंत्र, १३ उ ६४, ६५) ज्याप्रमाणे घट,कलश आणि कुंभ या शब्दानी एकच वस्तु दाखविली जाते, त्याचप्रमाणे देवता, मंत्र आणि गुरु यामध्ये भेद नाही. जशा देवता तसे मंत्र, आणि गुरुदेखील तसेच. त्यांच्या पूजनाने सारखेच फल प्राप्त होते. यावरून देवतेचा अभेद आणि नित्यत्व समजते. वेदात देखील शब्दाला नित्य म्हटले आहे- ' यज्ञेन वाचः पदवीयमायन्तामन्विन्दन्नृषिषु प्रविष्टाम्' (ऋग्वेद १०–७१–३१) म्हणजे युगान्ती सुप्त असलेले वेद यज्ञाच्या द्वारा सृष्टचारंभी ऋषींनी पुनः प्राप्त केले. 'अत एव च नित्यत्वम्' (वेदान्तसूत्र १-३-२९) या वेदांत दर्शनाच्या सूत्रातही शब्दरूप वेदाची नित्यताच सांगितली आहे, व ही नित्यता ब्रह्माबरोबर अभिन्नता असल्यानेच शक्य आहे.

६) सात्त्विक भावांशिवाय राजस व तामस भाव व्यक्त करणारे ही काही मंत्र वेद, पुराणे व तंत्रग्रंथ यात आहेत, तथापि ते अधिकारी भेदाने सांगितले गेले आहेत. त्यांचे अंतिम लक्ष्य त्या मंत्रांच्या अर्थाच्या प्रतिपादनात नाही. श्येनयागाचे वर्णन, वेन राजाची गोष्ट, त्रिशीर्ष त्वष्टचाची कथा, मारण-मोहन-उच्चाटन-विद्वेषण इत्यादि तांत्रिक प्रयोगांचा उपयोग काही विशेष प्रसंगी किंवा लोकहिताच्या अपेक्षेने सांगितलेला आहे. आपेक्षिक रूपानेच ते ग्राह्य आहेत, वस्तुतः नव्हे, आणि त्या कर्मांच्या आचरणानंतर प्रायश्चित सांगितलेले असल्यामुळे निषिद्ध कोटीतच त्यांची गणना करावयास हवी. सात्त्विक कर्माच्या बाबतीत तर 'प्रत्यवायो न विद्यते' असेच सांगितले आहे.

(७) मंत्रामध्ये छंद, ऋषि, देवता. बीज, कीलक आणि शक्ति या सहा गोष्टी मुख्यत्वेकरून मानलेल्या आहेत, त्यापैकी वैदिक मंत्रामध्ये छंद ऋषि आणि देवता या तीनच गोष्टींचा उपयोग होतो. अवशिष्टासहित सहा अंगांचा उपयोग तांत्रिक मंत्रात होतो. शाबर मंत्रांच्या बाबतीत 'अनमिल आखर अर्थ न जापू', 'शाबर–मंत्र–जाल जिन सिरजा' इत्यादि पद्यांनी स्मरण केले जाते. पौराणिक मंत्र भावप्रधान असतात.

ॐ नमो भगवते वासुदेवाय' इत्यादि मंत्रांमध्ये क्रिया गौण असतात. इष्ट रूपाची भावना मनात सतत अनुस्यूत राहिली की सिद्धि मिळते. क्रिया मुख्यत: तांत्रिक मंत्रांमध्येच अपेक्षित असते. वैदिक मंत्रात भाव आणि क्रिया दोन्ही असतात.

छंदावरून मंत्राच्या उच्चारणाची पद्धति, ऋषीवरून मंत्राच्या तत्त्वाच्या आविष्कर्त्याचा परिचय आणि मंत्रावरून आणि ध्यानाच्या पद्धतीवरून समस्त इष्ट फल देणाऱ्या देवतेचे ज्ञान होते. मंत्राचे मूल तत्त्व संक्षिप्त रूपात बीजामध्ये साठविलेले असते. विरोधी शक्ति तत्त्वाचा विनाश करून साधनाला साधकापासून हटवीत असते, तिच्या विरोधासाठी कीलकाचा उपयोग होतो. मंत्रामध्ये चैतन्यशक्तीचा संचार शक्तीमुळे होतो. मंत्रयोग्याने ही रहस्ये लक्षात ठेवूनच मंत्रसाधनेत प्रवृत्त व्हावे. या खेरीज विशिष्ट भावांच्या अभिव्यक्तीसाठी अंतर्मातृकान्यास, बहिर्मातृकान्यास, षोढान्यास, प्रपंचन्यास, भुवनन्यास, देवन्यास, शक्तिन्यास श्रीकंठन्यास इत्यादि न्यास सांगितले आहेत. अंतर्योग-बहिर्योग-द्वारा देवतेचे पूजन, तर्पण, होम, पुरश्चरण, संस्कार, इत्यादि द्वारा मंत्र लवकर सिद्ध होतो. या उपायांनी मंत्र चेतन बनून देवतेचा साक्षात्कार होतो. मंत्र चेतन झाल्याशिवाय देवतेचे स्वरूप समजत नाही. तेव्हाच देवतेचे व्यक्त रूप साधकाच्या पुढे येते. परब्रह्म परमात्माच देवतेच्या रूपात आपल्या ज्ञानशक्तीद्वारा व्यक्त होत असतो. अनेक देवतांची भिन्न भिन्न रूपे जी आर्यधर्मात मानली गेली आहेत, त्यांचे ते रूपवैचित्र्य मंत्रांच्या द्वाराच ज्ञात होते. मंत्रांच्या द्वाराच त्यांचे अनेकत्व व्यक्त झालेले आहे. तथापि त्या सर्वांमध्ये प्रकट झालेले चेतन तत्त्व एकच आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' या मंत्रात हेच तत्त्व सांगितले आहे.

(८) शब्द-तत्त्व किंवा ज्याला शब्द-शक्ति म्हणतात, त्याचे ज्ञानाबरोबर किंवा ज्ञानशक्तीबरोबर साहचर्य असते. शब्दशक्तीशिवाय ज्ञान होऊ शकत नाही, म्हणजे शब्द हा ज्ञानाचा व्यंजक असतो. ज्याप्रमाणे शब्दाचा अर्थाशी संबंध असतो, त्याचप्रमाणे त्याचा ज्ञानाशीही

संबंध असतो. आनंदशक्ति आणि क्रियाशक्ति या देखील ज्ञानशक्तिद्वाराच आपले स्वरूप प्रकट करितात. जितकी म्हणून भौतिक, दैविक आणि आणि आध्यात्मिक रहस्ये आहेत, ती सर्व ज्ञानात्मकच आहेत. त्यांचे प्रकाशन शब्दात्मक ग्रंथांनी, मंत्रांनी, आख्यानांनी, इतिहासाच्या द्वारा ऋषींनी, आचार्यांनी, साधु-संत-महात्म्यांनी केले आहे. उपासक सरस्वती शक्तीच्या रूपात याच तत्त्वाचे ध्यान करीत असतो. सरस्वतीच्या ध्यानात वीणा व पुस्तक यांच्या द्वारा शब्दशक्ति, नीरक्षीर भिन्न करणारा हंस या वाहनाच्या द्वारा विवेकशक्ति किंवा ज्ञानशक्तीचे साहचर्य समजते. त्यामुळे ध्यानाच्या या रहस्यमय कल्पनेचा भाव चांगल्या तऱ्हेने व्यक्त होतो.

(९) मंत्राचा योग्य अभ्यास झाल्यानंतर शुद्ध सात्त्विक रूप असलेले तत्त्व साधकाच्या समोर प्रकट होते, त्यालाच राम, कृष्ण, शिव, शक्ति, नारायण इत्यादि नावे दिली जातात. त्यांच्या तात्त्विक स्वरूपाचा परिचय, आणि त्या स्वरूपाचा साक्षात्कर्ता असलेल्या साधकाच्या गुणांचे व स्वभावांचे ज्ञान, म्हणजे अमुक साधकाचा अधिकार कोणत्या भावाच्या साक्षात्काराला योग्य आहे, कोणत्या भावनेच्या देवतेबरोबर त्याचे ऐक्य आहे, कोणता भाव या साधकावर अनुगृहीत होऊ शकतो, इत्यादि तात्त्विक गोष्टींचा निर्णय तत्त्वज्ञ गुरूशिवाय कोणी करू शकत नाही. म्हणूनच साधनामार्गात जे स्थान परब्रह्माचे आहे, तेच गुरूचे असते. श्रुतीत सांगितले आहे - 'यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे यथा गुरौ' म्हणजे ज्या साधकाची देव आणि गुरु या ठिकाणी समान बुद्धीने भक्ति असते, त्यालाच उपनिषदाचा अर्थ प्रकाशित होतो. जे लोग आपल्याच मनाने साधना करितात, त्याना वस्तुतः फक्त श्रमाशिवाय आणखी काहीच मिळत नाही. म्हणूनच दीक्षा तत्त्वाचा उपदेश प्राप्त करण्याकरिता साधकाने साधनेचा आरंभ केला पाहिजे. जरी शास्त्रग्रंथांतून या गोष्टी पुरेशा प्रमाणात सांगितलेल्या आहेत, तरी अभ्यासकालाच्या गोष्टींचा निर्णय तर गुरुच करू शकतात. म्हणून परम श्रद्धेने आणि विश्वासाने गुरूची सेवा

करणे साधकाचे मुख्य कर्तव्य आहे. यात थोडी जरी त्रुटि राहिली तरी साधना निष्फळ होईल.

हठयोगाभ्यासनिरूपण

१०) योगाभ्यासाच्या साधनांच्या रहस्याची परिणति मनाला विक्षिप्त करणाऱ्या वृत्तींचा निरोध करून ब्रह्मानंदाचा प्रवाह अविच्छिन्न वाहत राहण्यात होते. हठयोगात आणि मंत्रयोगात कुंडलिनी शक्तीचे उत्थानच हे कार्य साधून देते. कुंडलिनीचे उत्थान एक अत्यंत कठिण कार्य साधून देते. कुंडलिनीचे उत्थान एक अत्यंत कठिण कार्य आहे. या कार्यात प्राणायाम हे साधन प्रमुख आहे. काही लोक कुंडलिनी शक्ति म्हणजे एक वायु अथवा एक प्रकारची नाडी मानतात, परंतु या विषयी स्वानुभव असा आहे–ज्याप्रमाणे रेडियम लावलेल्या घडयाळात अंधार आणि प्रकाश दोन्ही बरोबरच राहतात, त्याच प्रमाणे विजेच्या बारीक तारेप्रमाणे असलेल्या मूलाधार चक्रात वरच्या बाजूला तीन चार वेढयात थोडया पिवळ्या रंगाचा प्रकाश अंधाराबरोबर मिसळलेला दिसतो. तो अंधकार हठयोगाच्या क्रियांनी हटविला जातो; अंधकार हटला म्हणजे तो गोलाकार प्रकाश आपोआप सरळ वर जातो. ज्याप्रमाणे वळलेली तार ताठ केल्यावर सरळ होते, त्याचप्रमाणे याहीविषयी समजले पाहिजे. कुंडलिनीची ऊर्ध्व गति अगदी सापासारखी असते. वेगवेगळ्या चक्रांतून जी तिची गति असते, तीच अनेक सिद्धींना जन्म देते. सहस्रार चक्रात पोचल्यावर चिंतनाद्वारा पुनः तिला मूलाधार चक्रात आणतात, त्यावेळी विशेष परिश्रम लागत नाहीत. सर्व चक्रांतून फिरून झाल्यावर ती स्वतःहूनच आपल्या स्थानी पूर्व रूपात परत येते. एकदा अभ्यास झाला म्हणजे नंतर कठिण वाटत नाही. मूलाधार स्वाधिष्ठान आणि मणिपूर जेथपर्यंत तिची गति स्पष्टपणे समजत नाही; मणिपूरच्या नंतर मात्र साधकाला तिचे प्रत्यक्ष दर्शन होते. ज्यावेळी कुंडलिनी जागृत होते, त्यावेळी मेरुदंडाच्या मार्गात दाट प्रकाश पसरतो, व त्यामुळे अपूर्व आनंद होतो. बस् इतकेच उत्थानाचे रहस्य आहे. भस्त्रा-कुंभक, भुजंगासन, विपरीतकरण मुद्रा,महामुद्रा, मयूरासन,पश्चिमोत्तानासन,

मूलबंध, उड्डियानबंध, जालंधरबंध, आणि सूर्यवेध प्राणायाम ही या कार्याला सहायक व अत्यंत उपयोगी अशी साधने आहेत हठयोगाच्या या साधनांचा अभ्यास करते वेळी कुंडलिनी स्तोत्र,कुंडलिनी कवच,महाविद्या स्तोत्र आणि महाविद्या कवच यांचा पाठ, तसेच ग्रंथसाहबातील सुखमनी साहेबाचा पाठ आणि चिंतन हे देखील या कामी सहाय्यक होते. मंत्रशास्त्रात मंत्राची सिद्धि, देवतेचा साक्षात्कार, आणि मंत्र चैतन्य हेही कुंडलिनी मुळेच शक्य झाल्याचे मानले आहे. तंत्रशास्त्रात तिला या जगाचे अभिन्न असे निमित्त व उपादान कारण सांगितले आहे तिचे उत्थान होताच शरीरात असलेल्या विभिन्न चक्रांचे ज्ञान योग्याला अनायासच होते. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर,अनाहत,विशुद्ध,आणिआज्ञायांना षट्चक्रें म्हणतात, व सहस्रार चक्र त्यांच्याही वर असते. कुंडलिनीची जागृति भक्ति योग, भगवन्नामजप, ज्ञान योग इत्यादि द्वारा देखील होते, परंतु हठयोगाच्या या क्रियांनीच पूर्ण यश प्राप्त होते. बाकीची साधने या विषयी स्थायी कार्य करीत नाहीत. हठयोगाच्या पुढे दुबळी पडतात. त्यांची उग्रता पाहून दुर्बळ मनाची माणसे भयभीत होऊन त्यांची निंदाही करू लागतात, तथापि योग्य गुरुजवळ राहिजे म्हणजे ही साधने देखील सुखपूर्वक करता येतात. या साधनांनी शारीरिक, दैविक आणि आध्यात्मिक तीनही लाभ होतात. खरे म्हणजे साधनराज हठयोगच आहे. नेती धौतीकर्म इत्यादि षट्कर्मांनीं शरीर शुद्ध केल्यावर सिद्धासन किंवा वज्रासन घालून सुरुवातीस विसापासून आरंभ करीत ऐंशीपर्यंत प्राणायामाचा तीन महिने पर्यंत अभ्यास केला पाहिजे; क्रमाने वाढवीत वाढवीत ३२० पर्यंत केल्यावर योग सिद्ध होतो. या प्रकारे अभ्यासाने ऐश्वर्य इच्छिणाऱ्याला ऐश्वर्याचा,आणि मुमुक्षूला परम पदाच्या प्राप्तीचा दरवाजा उघडतो.

११) पंच महाभूतांच्या विकारांनी शरीर तयार होते. रस, रक्त, मांस भेद अस्थि, मज्जा आणि वीर्य याना सप्त धातू म्हणतात. वात, पित्त आणि कफ यांचा समभाव असला म्हणजे शरीर स्वस्थ राहते. प्राण, अपान, समान, उदान, व्यान हे पंच प्राण त्यात राहतात. नाग, देवदत्त, कृकल, कूर्म, आणि धनंजय यांना पाच उपप्राण म्हणतात. डोळे, नाक, कान त्वचा आणि जीभ ही पाच ज्ञानेंद्रिये आणि वाणी, हात, पाय व

उपस्थ यांना कर्मेन्द्रिये म्हणतात. या सर्वांचे संचालन मनाच्या साहाय्याने आत्म्याकडून होते. आपल्या बोटाच्या प्रमाणाने ९६ अंगुली असे हे शरीर आहे. इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्यांचे त्रिरावृत्त ब्रह्मसूत्र प्रत्येक प्राण्याने आपल्या शरीरात धारण केले आहे. योगशास्त्रात ७२००० नाड्या शरीरात असल्याचे मानले जाते; त्यापैकी १४ मुख्य, त्यातही ३ मुख्य, आणि शेवटी सुषुम्नानाडीच सर्वात मुख्य, व तिच्यातच योग प्रतिष्ठित असतो. इडा,पिंगला आणि सुषुम्ना यानीच त्रिरावृत्त झालेले असे यज्ञोपवीत त्रैवर्णिक धारण करीत असतात. त्याचे लक्ष्य म्हणजे सहस्त्राराची द्योतक शिखा; जोपर्यंत अंतर्भावाचे लक्ष्य साध्य होत नाही, तोपर्यन्त हे यज्ञोपवीत आणि शिखा धारण करतात. ज्यांना अंतर्ज्ञान होते, ते यज्ञोपवीत व शिखा टाकून देतात. म्हणूनच संन्यास प्रकरणात सांगितले आहे–'सोपवीतां शिखां त्यजेत्' (जानवे आणि शिखा यांचा त्याग करावा). सुषुम्नेच्याच अंतर्गत चित्रा, वज्रा, आणि ब्रह्मनाडी मानल्या जातात. ब्रह्मनाडीशीच षट्चक्रांचा संबंध असतो. यतींचा त्रिदंड तो हाच. या तीनही पैकी ब्रह्मनाडी मध्ये ब्रह्मतत्त्वाचा प्रकाश होतो, म्हणून ती मुख्य. म्हणूनच परमहंस यति एकच दंड धारण करतात. इडेची देवता चंद्र, पिंगलेची सूर्य, आणि सुषुम्नेची अग्नि. अग्नीचा वर्ण लाल असल्यामुळे गेरूच्या रंगाने रंगलेली वस्त्रे यति धारण करतात. गेरूच्या आतील षोडशाधारा दंडाची षोडश पर्वे, आणि आधारचक्र हा कमंडलु. वस्तुतः योगाची अशी चिन्हे धारण करणाराच खरा यति.असा ब्रह्मदंड ज्याला प्राप्त होतो, तो वेळूचा दंड धारण करील अगर करणारही नाही, कारण तो यति कृतकृत्य झालेला असतो.

१२) मूलाधारापासून ते सहस्त्रारापर्यन्त पसरलेला मेरुदंड शरीराच्या सर्व भागाना आधारभूत आहे. १) सर्वात खाली योगी आधारपद्माचे चिंतन करतो. हे आधारपद्म गुदेंद्रियाच्या थोडे वर आहे. या कमळात चार पाकळ्या कल्पिल्या आहेत, व त्याच्या प्रत्येक पानावर व, श, ष, स, हे वर्ण एकेक असे कल्पिले आहेत. त्याच्या देवता म्हणजे ब्रह्मा व डाकिनी. पृथिवीतत्त्वाच्या चतुष्कोणाकार 'लं' बीजयुक्त मंडलाचे चिंतन येथेच

होते. स्वयंभू लिंगाने वेष्टित अशी कुंडलिनी शक्ति येथेच राहते. तिच्या चिंतनाने योगी तत्त्वज्ञ आणि सर्व सिद्धीना पात्र बनतो. २) आधारपद्माच्या वर लिंगाच्या मुळाशी रक्तवर्णाचे स्वाधिष्ठान पद्म आहे. ब, भ, म, य, र, ल या ६ वर्णांनी अलंकृत अशा सहा पाकळ्या यात असतात. जल तत्त्वाचे वं बीज आणि विष्णु व शाकिनी या याच्या देवता. ३) मणिपुर हे तिसरे पद्म, व त्याचे स्थान नाभि. या नील वर्णांच्या कमळाला दहा पाने आहेत. ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ हे वर्ण यावर आहेत. याच्या देवता रुद्र व लाकिनी. अग्नीच्या त्रिकोणाकार रं बीजाने मंडलाचे चिंतन होते. ४) अनाहत नावाचे वक्षःस्थलात गुलाबी कमळ आहे. त्याच्या बारा पाकळ्यांवर क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, हे वर्ण आहेत. षट्कोण हिरव्या रंगाचा व यंबीजाने युक्त. त्यावर वायु तत्त्वाचे चिंतन करितात. ईशान आणि काकिनी या याच्या देवता. बाणलिंग येथेच असते. याच्या थोडे वर अष्टदल कमलात आपल्या इष्ट देवतेचे ध्यान करितात. ५) कंठामध्ये विशुद्ध चक्र धूम्र वर्णाचे असून त्यावर अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः या सोळा स्वरांनी ते विभूषित आहे. हंबीजयुक्त आकाश तत्त्वाचे चिंतन या ठिकाणी होते. सदाशिव व हाकिनी या येथील देवता. कलंकरहित पूर्ण चंद्राचे चिंतन येथे करितात, व येथेच जीव असल्याचे मानले जाते. ६) दोन भुवयांच्या मध्ये दोन पाकळ्यांचे कमळ आहे. त्यावर ह आणि क्ष हे दोन वर्ण आहेत. शाकिनी व अर्धनारीनटेश्वर या याच्या देवता. इतर नावांचे लिंग येथे असते. या ठिकाणीच मन असते असे मानले जाते, व याच ठिकाणी ॐकार बीजाचे चिंतन करितात. ७) सहस्रार कमल ब्रह्मांडात आहे. त्याला एक सहस्र पाकळ्या आहेत. पूर्ण वर्णमाला यात वीस वेळा आवृत्त झालेली आहे. ह,ळ,क्ष हे तीन वर्ण मध्ये आहेत. या कमलाच्या मध्यावर बारा पाकळ्यांच्या कमलात त्रिकोणाकार गुरुसिंहासन आहे. परम शिव व पराशक्ति यांचे गुरु रूपात येथे चिंतन करितात. याप्रमाणे थोडक्यात षट्चक्राची माहिती आहे. कुंडलिनी शक्तीच्या जागृतीने त्यांचा आरोप व लय यांचे चिंतन करावयास योगी समर्थ होतो.

१३) तीन नाड्यांचे वर्णन वेदातही यज्ञाच्या रूपाने आले आहे. 'सुषुम्णः सूर्यरश्मिश्चन्द्रमा गन्धर्वस्तस्य नक्षत्राणि अप्सरसो भेकुरयो नाम स न इदं ब्रह्मक्षत्त्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यः स्वाहा (यजुर्वेद १८–४०) ज्या यज्ञात सुषुम्ना अग्नि प्रज्वलित होतो, त्यापासूनच सूर्य, चन्द्रमा, नक्षत्रे इत्यादि प्रकाशित होऊन सर्व विश्वाचे रक्षण करितात. आध्यात्मिक रूपात यालाच अग्नितत्त्व असलेली सुषुम्ना म्हणतात.

राजयोग

१४) अंतःकरणाच्या वृत्ति सात्त्विक, राजस, आणि तामस अशा तीन प्रकारे विभागल्या जातात. त्यापैकी राजस व तामस या दोन वृत्तींचा सर्व प्रकारे निरोध करून सात्त्विक वृत्तीचा सुखात्मक व ज्ञानात्मक प्रवाह अनवच्छिन्न चालविणे हाच खरे म्हणजे संप्रज्ञात योग. या दोन वृत्तींचा निरोध विचारानेच करणे शक्य आहे. म्हणून आसन, प्राणायाम इत्यादींची या योगाला आवश्यकता नाही. यापासून योग्याला महान पराक्रम प्राप्त होतो,कारण 'यथाक्रतुः पुरुषो भवति' म्हणजे आपली जशी भावना असते तसे आपण बनतो. या अभ्यासाने कोणताहि विकार जेव्हा मनात रहात नाही, तेव्हा योग जमला असे समजावे. मनाच्या पवित्रतेविषयी योगी लोक सांगतात की, पूर्ण युवक आणि सुंदर नवयौवना युवती यांना एकांतात हावभावयुक्त गोपनीय भाषण करिताना पाहून देखील मनात कोणत्याहि प्रकारे क्षोभ किंवा दुर्भावना उत्पन्न झाली नाही तर आपल्याला योग सिद्ध झाला असे समजावे. वस्तुतः हाच योग सर्वश्रेष्ठ. राजयोग यालाच म्हणतात. सर्व प्रकारच्या वृत्तींचा निरोध म्हणजे असंप्रज्ञात योग. धारणा, ध्यान व समाधि या तीन साधनांनी योग सिद्ध होतो व त्यात असंप्रज्ञात समाधि ह योगाचे अंतरंग साधन आणि संप्रज्ञात समाधि हे बहिरंग साधन असते. यामुळेच सिद्धि प्राप्त होतात. त्या योग दर्शनाच्या विभूतिपादात सविस्तर वर्णिल्या आहेत. सर्व वृत्तींच्या निरोधानंतर समाधि सुखाचा अनुभव घेण्यासाठी एक वृत्ति आहे. त्यामुळेच समाधीत असतांना योग्याला ब्रह्मानंदाचा अनुभव येतो.

१५) वृत्ति क्लिष्ट व अक्लिष्ट अशी दोन प्रकारची असते. क्लेशयुक्त ती क्लिष्ट, व तद्भिन्न ती अक्लिष्ट. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश या पाचाना क्लेश म्हणतात. १) अविद्या म्हणजे विपरीत ज्ञान. तीमुळे सर्व क्लेश निर्माण होतात, म्हणून तिलाच क्लेशांचे क्षेत्र समजतात. २) प्रकृति-पुरुष भेद न जाणता दोन्ही अभिन्न समजण्याने अस्मिता निर्माण होते. ३) अनुकूल विषयांसंबंधी प्रीति म्हणजे राग. ४) प्रतिकूल विषयांसंबंधी द्वेष उत्पन्न होतो. ५) मृत्यूचे भय म्हणजे अभिनिवेश. या विरुद्ध निरोध आणि एकाग्रता या विषयांच्या वृत्ति अक्लिष्ट. शुद्ध ज्ञानात्मक अंतःकरणाचा परिणाम म्हणून सात्त्विक वृत्तीचा निरोध आणि एकाग्रता दृढ करितात. क्षिप्त, मूढ आणि विक्षिप्त वृत्ति तामस आणि राजस यांच्या मिश्रणाने उत्पन्न होतात. या वृत्ति असताना योग साध्य होत नाही. विक्षिप्त वृत्ति निरोधावस्थेकडे आणण्याकरिता योगाच्या अष्टांग साधनांचा उपदेश केला गेला आहे. विषयाच्या प्रकाशक अंतःकरणाचा ज्ञानात्मक परिणाम म्हणजे वृत्ति. प्रकृति स्वभावतः आपले कार्य करीत आहे, तिच्या या स्वभावाचा निरोध होऊ शकत नाही. 'प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ?' (गीता ३।३३) तथापि जीव अज्ञानमूलक अशा रागद्वेषाने परिपूर्ण व्यवहार करीत असतो, व ते क्लेशकारक बनतात. म्हणून 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' या सूत्रात त्यांचा निरोध सांगितला आहे व अभ्यासाचा सल्लाही याचसाठी दिला आहे.

१६) आपल्या इष्टरूप परमात्म्याचे चिंतन म्हणजे अभ्यास, किंवा ध्येयाच्या विरोधी ज्ञानाचा निरोध करून आपल्या इष्ट विषयात वृत्ति निरंतर प्रवाहित ठेवणे म्हणजे अभ्यास. अभ्यास दोन प्रकारचा असतो- लौकिक आणि परमार्थिक. लौकिक अभ्यासाने व्यावहारिक कार्ये सिद्धीला जातात. योगामध्ये केलेले सिद्धींचे वर्णनही असेच आहे. त्यामुळे फक्त ऐश्वर्य मिळते आणि ते क्षणिक असते. त्याविषयी मुमुक्षूने विराग धरावा. खरे फल परमात्म्यातच वृत्ति धारण केल्याने मिळते. त्यामुळे नित्य व स्थायी फल प्राप्त होते. त्यासाठीच अभ्यास करणे आवश्यक आहे. आहारातील संयमाने स्थूल अन्नमय शरीराचा संयम, प्राणायामाने प्राणाच्या

संयमाचा अभ्यास, ध्यानाच्या अभ्यासाने मनाचा निरोध व विवेकी विचाराने बुद्धीच्या एकाग्रतेचा अभ्यास साध्य झाल्यावर शरीर, प्राण, मन व बुद्धि शुद्ध होतात व त्यानंतर तत्त्वाचे ज्ञान योग्याला होते. 'तमक्रतुः पश्यति वीतशोको धातुप्रसादान्महिमानमात्मनः' –संकल्पादि दोषांपासून मुक्त होऊन शरीरधातु शुद्ध झाल्यावर शोकरहित होऊन साधकाला परमात्म्याचे दर्शन होते. या गोष्टी अभ्यासानेच साध्य होतात.

१७) लौकिक आणि पारलौकिक भोगांविषयी आवड नसणे म्हणजे वैराग्य. एखाद्या वस्तूविषयी घृणा किंवा तिरस्कार असल्यामुळे आवड नाहीशी होणे म्हणजे वैराग्य नव्हे. विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने राग उत्पन्न होतो. विषय नश्वर आहेत असा विचार मनात दृढ करणे, आणि विषयात मन आसक्त होऊ न देणे हेच खरे वैराग्य. केवळ बाह्य चिह्नावरून वैराग्याची कल्पना करणे चूक आहे. वैराग्याविषयी एका विद्वानाचे एक मार्मिक निरीक्षण असे आहे-'**Vairagya is distaste for the world and life, cessation of attraction to the object of the mind's attachment**' म्हणजे बाह्य जग आणि आपले जीवन याविषयी विरसतेचा अनुभव येणे, आणि विषयांवरील चित्ताची आसक्ती सुटणे हे वैराग्य.

अशा प्रकारे अभ्यास आणि वैराग्य यामुळे योगानुकूल वृत्तींचा प्रवाह बनतो व समस्त विघ्ने नष्ट होऊन योग्याला पूर्ण सिद्धि प्राप्त होते.

१८) लय, विक्षेप, कषाय आणि रसास्वाद या चार गोष्टी समाधीच्या विरोधी आहेत, म्हणून सावधानतेने त्या दूर करण्याचा प्रयत्न योग्याने केला पाहिजे. (१) साधनेमध्ये इष्ट स्वरूपाची वृत्ति किंवा आत्माकार वृत्ति नसणे, निद्रावृत्ति जागृत होऊन ब्रह्मानंदापासून निवृत्ति म्हणजे लय. (२) वृत्ति ध्येयाकार न होता इकडे तिकडे भरकटत राहणे म्हणजे विक्षेप. (३) बाह्य आणि आंतरिक विषयांसंबंधी राग-द्वेष-जन्य संस्कार हृदयात प्रकट होणे म्हणजे कषाय. (४) दुःखाभावातच सुख मानू लागणे, आणि

वास्तविक ब्रह्मानंदापासून विमुख होणे म्हणजे रसास्वाद. अभ्यास चालू असता राजस व तामस वृत्तींच्या निरोधाने देखील सुख होऊ लागते. म्हणून योग्याला या सर्वांपासून मुक्त राहिले पाहिजे.

१९) पाच तत्त्वांचे चिंतन, देवतासाक्षात्कार,मंत्रजप आणि समाधीचा अभ्यास यामुळे अणिमा,महिमा, लघिमा इत्यादि अष्ट सिद्धि प्राप्त होतात; परंतु अहंकाराचे बीज राहिल्यास त्यापासून अनर्थ होऊन योग्याचा अधःपातहि संभवतो. म्हणून त्यांचा उपयोग अधिकारी पुरुषच करू शकतात. विषयी आणि क्षुद्र मनुष्ये योगातील सिद्धींसाठी अधाशीपणा करितात. व्यावहारिक भोगांसाठी त्यांचा उपयोग करावा अशी समजूत ते बाळगतात व याच भावनेने साधु व महात्मे यांचेकडे जातात. परंतु त्यांची इच्छा सफल होत नाही. त्या अडाणी लोकांना हे मात्र समजत नाही की, सिद्धि योगासाठी असते, भोगापासून पराङ्मुख झाल्याशिवाय ती मिळत नसते. भोगाच्या गोष्टींचा सिद्धींशी संबंध काय, उलट योगाशी त्यांचा विरोध असतो. जो योगी विषयी पुरुषांच्या म्हणण्याप्रमाणे सिद्धींचा उपयोग करू लागतो, त्याला नुकसान सोसावे लागते. तसेच क्रोध आणि सूडाची भावना उत्पन्न होऊन त्याचे पतन होते. क्षुद्र जीवांची तृप्ति होत नाही ती नाहीच,कारण तृष्णारूप सागर त्यांच्या चारही बाजूनी उसळत असतो. सिद्धींच्या द्वारा त्याना लाभ झाला तर त्यांची तृषा आणखी वाढते, व त्यांच्या सवयीनाही वाईट वळण लागते. योग्याला वाटते की हे क्षुद्र जीव आपले भक्त बनले आहेत व परमार्थाकडे वाटचाल करीत आहेत. याच भ्रमात तो निग्रहानुग्रहांचा प्रयोग करू लागतो. त्यामुळे रागद्वेष उत्पन्न होऊन योगीही त्यांच्यासारखाच बनतो. म्हणून योग्याला याविषयी सावधान राहायला हवे.

लययोग

२०) लययोगाचे लक्षण हठयोगप्रदीपिकेमध्ये असे केले आहे– " अपुनर्वासनोत्थानात् लयो विषयविस्मृतिः" म्हणजे वासनांचे पुनरुत्थान न होणे आणि विषयांचे विस्मरण असणे याला लय म्हणतात. लयामध्ये

ध्येयाकाराचेही विस्मरण होते. तात्पर्य, लययोगात बाह्य आणि आभ्यंतर अशा सर्व विषयांचे विस्मरण होत असते. लययोगाचे सव्वाकोटी इतके प्रकार आहेत असे म्हणतात. हठयोगप्रदीपिका आणि योगतारावलि या ग्रंथात अशा प्रकारचे उल्लेख आढळतात. इडा व पिंगला या नाड्यांमधून या प्राणाचा प्रवाह असल्यास जीवाची प्रवृत्ति बहिर्मुख असते, पण तोच प्राण जेव्हा सुषुम्ना नाडीतून प्रवाहित होतो तेव्हा जीवाला लययोगाची सिद्धि प्राप्त होऊन परम पद मिळते. षण्मुखी मुद्रेच्या अभ्यासाने लययोगाची साधना करितात. लययोगाच्या चार अवस्था आहेत.–आरंभ,घट परिचय आणि निष्पत्ति प्राणायामाच्या अभ्यासाने हृदयचक्रात असलेल्या ब्रह्मग्रंथीचा भेद करणे ही आरंभावस्था. या अवस्थेत योग्याला अलंकारांच्या खळखळण्याचा विशिष्ट आवाज ऐकू येतो. प्राण व अपान यांच्या ऐक्याने विशुद्धि चक्रात असलेल्या विष्णुग्रंथीचा भेद करणे ही घटावस्था. या अवस्थेत योग्याला नगाऱ्याच्या आवाजासारखे ध्वनि ऐकू येतात. आज्ञाचक्रात असलेल्या रुद्रग्रंथीचा भेद करणे ही परिचयावस्था. या अवस्थेला योगी आला म्हणजे त्याला बासरीचा ध्वनि ऐकू येऊ लागतो. अंतिम अवस्था म्हणजे निष्पत्ति.

२१) शाक्त मताप्रमाणे सर्व सृष्टीचा विकास महाबिंदुपासून होतो. हा महाबिंदु शिव आणि शक्ति या तत्त्वांशी जोडलेला असतो. या महाबिंदूपासून श्वेत बिंदु,रक्त बिंदु आणि मिश्र बिंदु उत्पन्न होतात. श्वेत बिंदु शिवाचा वाचक असतो, तसेच रक्त बिंदु शक्तीचा वाचक. मिश्र बिंदु उभय-स्वरूपाचा असतो. श्वेत बिंदूपासून नाद उत्पन्न होतो, व नादापासून शब्दसृष्टि. रक्तबिंदूपासून अर्थसृष्टि उत्पन्न होते. जेव्हा योगी योगाभ्यासाने समस्त शब्दसृष्टि आणि अर्थसृष्टि यांचा स्वत: मध्ये लय करून महाबिंदूत लय पावतो तेव्हा त्याला लययोग साध्य होतो.

२२) अर्थसृष्टीच्या अंतर्गत असलेल्या सर्व भौतिक तत्त्वांचा लय शेवटी आत्मतत्त्वात होतो. आत्म्यात तत्त्वांचा लय होतो हे ईशोपनिषदाच्या 'यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवा नु पश्यति' या मंत्रात सांगितले आहे.

लं हे पृथ्वीचे बीज जल तत्त्वात लय पावते. या तत्त्वाचा लय करिता आला की योग्याला शरीरलाघवाची सिद्धि प्राप्त होते. जल तत्त्वाच्या वं बीजाचा लय अग्नि तत्त्वात होतो. या सिद्धीने योग्याला विषयांच्या संपर्कापासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखादि भावनांविषयी समत्वबुद्धि प्राप्त होते. रं हे अग्निबीज वायु तत्त्वात लय पावते. या तत्त्वाचा लय करिता आला की योग्याला आकाशगमनादि सिद्धि प्राप्त होतात. हं या आकाशतत्त्वाचे बीज अहंकारात लय पावते. अहंकाराचा लय महत्तत्त्वात, महत्‌चा प्रकृतीत, आणि प्रकृतीचा लय शेवटी आत्मतत्त्वात होतो.

२३) शब्दसृष्टीच्या अंतर्गत वर्णांच्या लयाचा क्रम आज्ञाचक्रापासून सुरू होतो. आज्ञाचक्रात प्रथम क्षं चा लं मध्ये, व लं चा हं मध्ये लय होतो. त्यानंतर मूलाधार चक्रात हं चा सं मध्ये, सं चा षं मध्ये, षं चा शं मध्ये, शं चा वं मध्ये लय होतो. स्वाधिष्ठान चक्रात वं चा लं मध्ये, लं चा रं मध्ये, रं चा यं मध्ये, यं चा भं मध्ये, व भं चा वं मध्ये लय होतो. मणिपूर चक्रात वं चा फं मध्ये, फं चा पं मध्ये, पं चा नं मध्ये, नं चा धं मध्ये, धं चा दं मध्ये, दं चा थं मध्ये, थं चा तं मध्ये, तं चा णं मध्ये, णं चा ढं मध्ये व ढं चा डं मध्ये लय होतो. अनाहत चक्रात डं चा ठं मध्ये, ठं चा टं मध्ये, टं चा अं मध्ये, अं चा झ मध्ये,झं चा जं मध्ये, जं चा छं मध्ये, छं चा चं मध्ये, चं चा ङं, मध्ये, ङं चा घं मध्ये, घं चा गं मध्ये गं चा खं मध्ये, व खं चा कं मध्ये लय होतो. कं चा अः मध्ये, अः चा अंमध्ये, अं चा औं मध्ये, औं चा ओं मध्ये, ओं चा ऐं मध्ये, ऐं चा एं मध्ये, एं चा ऌं मध्ये, ऌं चा ऌ मध्ये, ऌ चा ॠं मध्ये, ॠं चा ॠं मध्ये, ॠं चा ऊं मध्ये, ऊं चा उं मध्ये, उं चा ईं मध्ये, ईंचा इं मध्ये, इं चा आं मध्ये, आं अं मध्ये, अं चा कलेमध्ये, कलेचा अर्धचंद्रात, अर्धचंद्राचा निरोधिकेत, निरोधिकेचा नादात, नादाचा महानादात, महानादाचा आंजीत, आंजीचा व्यापिकेत,व्यापिकेचा सुमनात, सुमनाचा उन्मनीत, आणि शेवटी उन्मनीचा लय महाबिंदूत होतो. अशा प्रकारे सर्व वर्णांचा लय ज्या महाबिंदूपासून शब्दसृष्टि व अर्थसृष्टि यांचा विकास झालेला असतो त्या महाबिंदूतच होतो.

वर्णांचा लय झाल्यानंतर षट्चक्रेही नाहीशी होतात, कारण षट्चक्रे वर्णांनीच बनलेली असतात.

२४) महाबिंदूलाच महाशून्य म्हणतात. महाशून्यही तीन प्रकारचे असते. त्यांना शून्य अतिशून्य आणि महाशून्य म्हणतात. अनाहत चक्रात शून्याचे, विशुद्धि चक्रात अतिशून्याचे, आणि आज्ञाचक्रात महाशून्याचे ध्यान करितात. हठयोगाच्या साधनाने प्राणांचा निरोध साध्य होतो. प्राण निरुद्ध झाले म्हणजे नादांची अनुभूति येते, कुंडलिनी शक्तिदेखील नवनादस्वरूप असते. योगी जेव्हा कुंडलिनी शक्ति जागवितो,तेव्हा त्याला नऊ प्रकारच्या नादांची अनूभूति येते. त्यांना चिणी, चिंचिणी, घंटा, शंख, तंत्री, मृदंग, वेणु, भेरी, आणि मेघ अशी नावे आहेत. नादानुसंधानाचा अभ्यास करितांना साधकाने सूक्ष्मातिसूक्ष्म नादध्वनीचे अनुसंधान उजव्या कानात करावे. या सर्व नादध्वनीपैकी कोणत्या तरी एका ध्वनीत जेव्हा योग्याचे मन स्थिर होते, तेव्हा त्याच ध्वनीच्या साहाय्याने योग्याला लय साधतो. तेच लययोगाचे अंतिम लक्ष्य आहे. "यत्र कुत्रापि नादेन लगति प्रथमं मनः। तत्रैव सुस्थिरीभूय तेन सार्धं विलीयते ॥

उपासनाभक्तिरत्न मणिग्रंथन

योगसाधनाने अंतःकरण शुद्ध झाल्यानंतर मनुष्याला चिंतनाचा अधिकार प्राप्त होतो. योगाभ्यासाशिवाय एकाग्रता होऊ शकत नाही. म्हणून योगसाधनेनंतर उपासना आणि भक्ति या मार्गाने जाण्याचा अधिकार मिळतो. याचसाठी योगाच्या उपायांचे निरूपण केल्यानंतर उपासनेचा विषय आम्ही घेत आहोत. उपासनेने आनंदस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार होऊन साधक सर्व दुःखांपासून मुक्त होऊन आनंद पावतो, आणि त्याला जीवन्मुक्ताची स्थिति प्राप्त होते. उपासना सगुण आणि निर्गुण अशी दोन प्रकारची आहे. प्रथम निर्गुण उपासना वर्णन करू, कारण ज्ञानाचे साक्षात् प्रयोजन तेच आहे. सगुण उपासना परंपरेने संबद्ध असल्यामुळे निर्गुण उपासनेनंतरच तिचा क्रम येतो.

१) मनुष्य जसा विचार करतो,त्याप्रमाणे बनतो हा वेदातील सिद्धांत उपासनेचे मूळ आहे. हीच भावना समोर ठेवून उपासनेची रचना केलेली आहे. ज्याप्रमाणे जगात विद्येची उपासना करणारा विद्वान्,धनाची उपासना करणारा धनवान्, अज्ञानाची उपासना करणारा मूर्ख-दुष्ट-खल इत्यादि स्थिति प्राप्त करतो, त्याचप्रमाणे नामरूपात्मक जग दुःखमय आहे असे जाणून त्यापासून विरक्त झालेला पुरुष शांति मिळविण्यासाठी साऱ्या जगताचे अधिष्ठान असलेल्या सच्चिदानंद परमात्म्याचे ध्यान करून सर्व दुःखांपासून मुक्त होतो. परंतु परमात्म्याचे स्वरूप निराकार, व्यापक, अतींद्रिय आहे; मनुष्याला ते नीटपणे समजत नाही. म्हणून ते समजण्यासाठी वेगवेगळ्या पद्धति म्हणजे संप्रदाय निर्माण केलेले आहेत. ते सर्व वस्तुतः यथार्थ आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे अनुपयोगिता सांगणे योग्य होणार नाही. अहं रूपाने शरीरात ब्रह्माचेच चेतन रूप व्यक्त होते, म्हणून ब्रह्माला कोणत्याही प्रकारे स्वतःपेक्षा भिन्न व्यक्ति न कल्पिता, त्याचेच ब्रह्मभावनेने चिंतन करावे. त्यामुळे अद्वैत ज्ञान होऊन साधकाची

सर्व बंधने तुटून जातात. ओंकाराच्या साहाय्याने 'सोऽहम्'–मीच ब्रह्म किंवा शिव आहे–या भावनेच्या चिंतनाची आवृत्ति करितात. या ठिकाणी लक्षात ठेवावे की मीचा अर्थ शरीर, इंद्रिय, मन, बुद्धि इत्यादि नाही, त्या पलीकडे जे चेतन तत्त्व आहे त्यालाच मी शब्दाने उपास्य मानलेले आहे. या अभ्यासाने जीवभाव निघून जातो. ब्रह्मभाव स्थिर होतो. ज्याप्रमाणे विश्व तेजस, प्राज्ञ ही जीवाच्या अवस्थांची नावे आहेत, त्याचप्रमाणे विराट्, हिरण्यगर्भ, अंतर्यामी हे तीन भाव समष्टिरूप ईश्वरात आहेत. तसेच ओंकारातही अ, उ, म, हे तीन वर्ण जीव आणि ब्रह्म या दोनही भावांच्या अभिन्नत्वाचे बोधक आहेत. अकारमात्रेने जीवाचा विश्वभाव विराट रूपात उकाराने तैजसभाव हिरण्यगर्भात, आणि मकाराने प्राज्ञभाव ईश्वरामध्ये लय करतो अशी कल्पना करावी. ओंकाराची चौथी अर्धमात्रा अव्यवहार्य आहे, त्यामुळे लक्ष्य असलेल्या सच्चिदानंदाच्या निर्गुण व सगुण या दोनही रूपांचे चिंतन, आणि त्याच विराट् भावाचा हिरण्यगर्भात, हिरण्यगर्भाचा अंतर्यामीत,अंतर्यामीचा तुरीय ब्रह्मात क्रमाक्रमाने लय करून सोऽहम् भावाच्या दृढतेचा अभ्यास करितात या प्रकारे दृढ अभ्यासाने याच जीवनात ब्रह्मभाव अद्वैताचा साक्षात्कार आणि तन्मयता सिद्ध होते, व संपूर्ण कर्म भस्म होऊन मनुष्य जीवन्मुक्त होतो संक्षेपत: यालाच निर्गुण उपासना म्हणतात. द्वैत भावनेनेदेखील निराकार उपासना करितात. नानक, कबीर, दादू, दयानंद इत्यादि महात्म्यानी द्वैत भावनेतूनच निराकाराची उपासना मानली आहे. ज्याप्रमाणे साकारवादी स्वामी-सेवक भाव मानतात, त्याचप्रमाणे हे महात्मे देखील मानतात. ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मातही असे मानलेले आहे. मनाची ही उत्तम सात्त्विक भावना आहे. श्रद्धा-विश्वासाची वाढ, आणि दृढ अभ्यास करण्याविषयी उत्साह–या गोष्टी असतील तर सिद्धि अतिशय लौकर मिळते.

२) सगुण साकाराची उपासना अत्यंत सरळ आहे. भगवत्तत्त्वाच्या या भावनेच्या साक्षात्काराचे कारण मुख्यत्वेकरून परमेश्वरी कृपा असे सांगितले जाते. परंतु ही कृपा अखंड भजनाच्या द्वारा मिळू शकते नाम-जपाच्या साहाय्याने साधक आपल्याला अभीष्ट असलेल्या देवतेचे प्रत्यक्ष

दर्शन घेऊ शकतो. नाम आणि नामी यांच्यात भेद नाही, असे मनात ठसवून अनन्य भावाने नाम धारण करावे. आपले सर्वस्व श्रीभगवानाला अर्पण करावयास हवे; येथपर्यंत ही समर्पण भावना हवी की जीवनच त्याच्याकरिता जगतो आहो असे समजावे. अशी भक्ति दृढ झाली म्हणजे मनुष्य कितीही अधम दर्जाचा असला तरी त्याचा उद्धार सत्वर होतो. 'क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्ति निगच्छति कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति' –माझे स्मरण करणारा पापीदेखील सत्वर धर्मात्मा बनतो; मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की माझ्या भक्ताचा कधीच नाश होत नाही, त्याला लौकरच शांति मिळते.'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्' मृत्युग्रस्त जगात मीच त्याचा उद्धारकर्ता बनतो. 'भक्तास्तेऽतीव मे प्रियाः' असे भक्त मला अत्यंत प्रिय असतात. 'अनन्याश्चिन्तयन्तो माम्' इत्यादि गीतेतील वचनांमध्ये याच तत्त्वाचे स्मरण करून दिलेले आहे. हे भक्त श्रीनारायणाला अत्यंत आवडतात, हा विचार व्यक्त करण्यासाठी भक्ति नऊ प्रकारची मानली आहे– १) श्रीभगवंताचे गुण अत्यंत श्रद्धेने ऐकणे, २) त्याच्या दिव्य चरित्राचे आणि त्याच्या नावाचे उच्चारण करणे, ३) मनामध्ये भगवंताच्या रूपाचे स्मरण करणे, ४) त्याच्या चरणांची सेवा करणे, ५) विविध उपचारानी त्याची पूजा करणे, ६) अनेक स्तोत्रानी आणि कवितानी त्याची स्तुति करणे, ७) त्याच्या दास्यभावात आणि सेवेतच प्रसन्न राहणे, ८) सख्यभावना ठेवणे, आणि ९) आत्मनिवेदन म्हणजे आपले सर्वस्व त्याला अर्पण करणे. या प्रकारच्या आचरणाने प्रेम व्यक्त होते. निर्गुण उपासना कठिण आहे. कारण नामरूपाचा अभिमान सुटणे हेच अत्यंत कठिण आहे. नामरूपाच्या अभिमानातून निवृत्त झाल्याशिवाय निर्गुण उपासना होऊ शकत नाही. सगुण उपासनेत हे काठिण्य काढून टाकले आहे. म्हणजेच ब्रह्म नामरूपविशिष्ट बनून भक्ताला अनुकूल अशा क्रिया करते. म्हणून अत्यंत प्रेमास्पद असे हे व्यवहार भक्तिमार्गात मान्यता पावले आहेत. यालाच बैडाली धृति म्हणतात. मांजरी आपल्या छोट्या पिल्लांचे रक्षण स्वतःच करते. ती पिल्ले आपल्या आईवरच सर्व व्यवहार सोडून देतात. निर्गुण उपासनेची गोष्ट अशी नाही. त्या ठिकाणी वानरी

धृति असते. वानरीला तिचे पिल्लू स्वत: पकडून ठेवते. मांजरी आपल्या पिल्लांना एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी तोंडात धरून जाताना जशी चिंता करीत असलेली दिसते, तशी चिंता वानरीला करावी लागत नाही. ती आपल्या पिल्लांची तितकी रखवाली करीत नाही. यामुळे सगुण, उपासना सरळ आहे.गीतेत देखील 'क्लेशोधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्' म्हणजे अव्यक्त निराकाराच्या ठिकाणी मनाची एकाग्रता करणाऱ्याला अधिक त्रास होतो, असे सांगितले आहे. तथापि प्राप्तव्य ब्रह्म एकच असल्यामुळे मुळाशी कोणताच फरक नाही, केवळ साधनांचाच भेद आहे. शिव,शक्ति, गणेश,सूर्य इत्यादि सगुण ब्रह्माचीच अभिव्यक्ति आहे. म्हणून हे सर्व उपासक सगुण उपासनाच करणारे ठरतात. त्यांचे फलही एकच राहणार.

३) अनंतशक्तिमान् परमात्मा आपल्या नाना प्रकारच्या सामर्थ्यासह प्रत्येक पदार्थात भरून राहिला आहे. प्रत्येक पदार्थ स्थूल आणि सूक्ष्म रूपात असतानाही ब्रह्माच्या चैतन्यशक्तीशिवाय त्यांना स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही. स्थूल जगात ज्या अनेक प्रकारच्या बारकाया असलेली कारागिरी पाहून आपणाला आश्चर्य वाटते– की हे रचनावैचित्र्य कसे झाले, कोणी आणि का केले––ते सर्व मनुष्याच्या बुद्धीच्या पलीकडील विषय आहेत. त्यापेक्षा कितीतरी जास्त सूक्ष्म आतील जगाचे रहस्य आहे. परंतु त्याचे ज्ञान, योग किंवा उपासना यांच्यावाचून होऊ शकत नाही. ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे तीनही देव त्या जगात मूर्तिमंत स्वरूपात राहतात. अनेक देवता, ऋषि, सिद्ध, साध्य किंनर, गंधर्व, पितर, भूत, पिशाच इत्यादि सर्व त्याच सूक्ष्म जगात राहून आपापल्या अधिकारानुसार या स्थूल जगावर शासन करतात. यापैकी पुष्कळसे क्रूर स्वभावाचे देव रुद्राबरोबर राहणारे आहेत. ब्रह्माबरोबर सौम्य स्वभावाचे आणि विष्णू-बरोबर सौम्यतर स्वभावाचे देव राहतात. वस्तुत: या तीन देवांचेच सूक्ष्म जगावर पूर्ण प्रभुत्व आहे. स्थूल जगात जी कोणती शुभाशुभ घटना घडते, तिचे कारण हेच सूक्ष्म जग असते. म्हणूनच विष्णुदेवतेच्या मंत्रातील आणि रुद्राध्यातील मंत्रानी अनेकविध ऐश्वर्याची प्राप्ति आणि कष्टांचे निवारण

यासाठी विष्णु आणि रुद्र यांची प्रार्थना करण्याचा आदेश वेदामध्ये दिलेला आहे. त्याचप्रमाणे देवताच्या मूर्ति आणि स्वरूप याविषयी निर्णय देखील पुष्कळशा मंत्रानी सांगितला आहे. अमुक कार्य करणारी देवता अमुक प्रकारच्या पूजासामग्रीने संतुष्ट होते, तिचे स्वरूप असे आहे, वेदांतदर्शन आणि मीमांसादर्शन यामध्ये देवताधिकरणात देवतातत्त्वाचा निर्णय केला आहे. याच तत्त्वाच्या आधाराने मूर्तिपूजारूप उपासना सुरू झाली. गीतेत देखील ब्रह्माची उपासना, देवतांची उपासना, यक्षराक्षसांची उपासना, आणि भूतप्रेतांची उपासना असे उपासनेत चार क्रम मानले आहेत. वस्तुतः या चारही अवस्थातून एका ब्रह्माचीच भक्ति होते. तथापि फलाच्या कामनेने अंतःकरण दूषित झालेले उपासक असे समजत नाहीत. त्यांची अशी समजूत असते की, या अमुक अमुक देवता किंवा यक्ष किंवा भूताने आपले कार्य केले आणि त्यांना फल देण्याचे स्वातंत्र्य आहे, परंतु असे नाही. 'फलमतः उपपत्तेः' (३।२।३८) या वेदांतसूत्रात असे मानले गेले आहे की, एक व्यापक परब्रह्मच फल देऊ शकते. 'ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्' (४।१।५) या वेदांतसूत्रात प्रतिमा इत्यादीत उत्तम फलप्राप्तीसाठी ब्रह्मदृष्टीचे विधान केले आहे. म्हणून ब्रह्मभाव असलेली उपासनाच श्रेष्ठ. उरलेल्या तीनही उपासना न्यून कोटीच्या आहेत. या कारणाने गीतेत सांगितले आहे– 'यजन्त्यविधिपूर्वकम्' म्हणजे ब्रह्माला सोडून अविधिपूर्वक विभिन्न देवतांची पूजा ते साधकगण करीत असतात. पुराणात आणि तंत्र ग्रंथात हा विषय अत्यंत विस्तृतपणे आणि परिष्कृत रूपात सांगितला आहे. देवतांचे स्वरूप आणि देवमूर्तींचा ध्येयक्रम स्पष्ट स्वरूपात तेथे सापडतो. ज्याप्रमाणे एखाद्या सुंदर पुरुषाला किंवा स्त्रीला पाहून सौम्य भाव निर्माण होतो, पहिलवानाला पाहून वीरभाव,आणि साधु-महात्म्यांना पाहून शांतिभाव निर्माण होऊन परमात्म्याचे स्मरण होते, त्याचप्रमाणे या मूर्तीमुळे अनेक दैवी भावांचा उद्‌गम होतो. मानवी जीवनात आवश्यक समजूनच हे क्रम अविष्कृत केलेले आहेत. त्यांच्या द्वारा कोणत्याही प्रकारे पाखंड, दंभ, किंवा स्वार्थसिद्धि करण्याचा उद्देश नाही. जर आज कोणी करीत असेल,तर ती व्यक्ति किंवा तो समाज त्याला जबाबदार आहे.त्यामुळे हा सिद्धांत दूषित होऊ शकत नाही. या मूर्तिकल्पनांच्या विचारावरून

पूर्वीच्या आचार्यांचे अपूर्व बुद्धिचातुर्य समजून येते. उग्र स्वरूपाच्या व्यक्तीसाठी हनुमान, भैरव, दुर्गा, काली इत्यादि मूर्तींची रचना केली गेली आहे. सौम्यभावाच्या व्यक्तीसाठी नारायण, शंकर, सरस्वती, लक्ष्मी या द्वारा वर्णन केले आहे. वस्तुस्थिति अशी आहे की सूक्ष्म जगाचा स्थूल जगाशी संबंध स्थापित करणारी ही एक आश्चर्यकारक रचना आहे. या तत्त्वाचा विचार न करता पुष्कळसे लोक या ब्रह्मविज्ञानाच्या विरोधात गेलेले आहेत, व त्यामुळे या मागील सत्य लुप्त होत आहे.

४) प्रधान देवतांची संख्या ३३ मानली जाते; ११ रुद्र, १२ आदित्य, ८ वसु, इन्द्र आणि प्रजापति या क्रमाने त्यांची गणना केली गेली आहे. त्यांच्यातही गौण प्रधानभाव आहे. ज्या प्रधान देवता आहेत, त्यांचा समावेश विभूतियोगात गीतेच्या दहाव्या अध्यायात भगवंताने केलेला आहे. त्याचा लक्षपूर्वक विचार केल्यास असे रहस्य दिसते की ऋषींनी विभिन्न देवी-देवतांच्या बरोबर अनुकूलता अनुभवून कुलधर्माच्या अंतर्गत कुलदेव आणि कुलदेवी असा संबंध स्थापन करून संतान रूपात प्रवृत्त झालेल्या प्रजेसाठी उपासनायोग्य म्हणून सांगितले की, अमुक कुलात शिव, विष्णु, दुर्गा, स्कंद इत्यादि कुलदेवतांचे आणि भिन्न-भिन्न देवांचे पूजन करणे इष्ट होईल. हा निर्णय वस्तुतः तत्त्वज्ञानामुळेच झालेला आहे. या प्रकारे पूजा केल्याने कुळधर्माची योगक्षमप्रणाली सुचारु रूपाने चालेल अशा कल्पनेनेही ते निश्चित केले आहे. असे न केल्यास कुलधर्माचा विनाश सांगितला आहे, आणि तसे झाले तर पतन होते. याच्यात अंतर्गत पितृकर्म श्राद्धही सांगितले आहे. वेद आणि पुराणातून हा उपदेश अनेकदा ताकीद देऊन आला आहे. 'देवान् भावयताऽनेन ते देवा भावयन्तु नः' या गीतावचनाचा (३।११) अभिप्रायही हाच आहे.

५) अनेक प्रकारची उपासनाप्रणाली वैदिक धर्मामध्ये चालू आहे. याचे मुख्य कारण हेही आहे की सृष्टि बहुविध आहे. एकच प्रकार सगळ्यांना मानवत नाही. वस्तुतः सर्वांना एकाच काठीने हाकणे केव्हाही उचित होणार नाही. सृष्टि पंचतत्त्वात्मक आहे, म्हणून त्या तत्त्वांना

अनुसरून एकाच ब्रह्माला पाच प्रकारे उपास्य करून वर्णिले आहे. विष्णु, सूर्य, शक्ति, शिव, आणि गणेश या देवतांचा निर्णय, तसेच त्यांच्या स्वरूपाची निश्चिति तत्त्वातील क्रमानेच झालेली आहे. आकाशाचा नील वर्ण आहे, म्हणून विष्णूची मूर्ति श्याम वर्णाची असते. वायु तत्त्वाचा वर्ण हिरवा आहे ,म्हणून सूर्य रूपात केल्या जाणाऱ्या प्राणाच्या उपासनेत हिरवा रंग वायूचा मानला आहे. स्वरोदय शास्त्रात याचा निर्णय सापडतो. दुर्गा किंवा शक्तीची मूर्ति अग्नितत्त्वाची असते, यासाठी तिला प्रायः लाल रंगवितात. हनुमान आणि भैरव देखील याच अंतर्गत येतात. जल तत्त्वानुसार शिवाची मूर्ति असते, म्हणून तिला शुभ्र वर्णाची मानतात आणि जलप्रधान रूपातच तिची पूजा होते. गणेश मूर्ति पार्थिव असते म्हणून तिला स्थूल आकार देतात; ती लाल आणि पिवळ्या अशा दोन रंगात बनवितात. याप्रमाणे या पाच देवांबरोबर साधकांचे ऐक्य जाणून उपासना केली जाते, तेव्हाच यथार्थ फल मिळते. वस्तुतः चिंतनाच्या सुलभतेसाठीच हा क्रम निश्चित केला गेला आहे. यावरून कोणी पाच ईश्वर वेगवेगळे समजू नयेत, म्हणून पुनःपुनः ईश्वराच्या एकत्वाचे स्मरण शास्त्रामध्ये देण्यात आले आहे. खरे म्हणजे ही गोष्ट अतिशय रहस्यमय आहे. राम, कृष्ण, शिव, विष्णु, शक्ति, सूर्य, गणेश इत्यादि नावांनी ज्या रहस्यमय अर्थांचा बोध होतो, त्यांना अनुसरून अनेक मंत्र, स्तोत्रे, कवच, आख्याने, चरित्रे, आणि विस्तृत पुराण ग्रंथ यांची निर्मिति झाली आहे. निष्पक्षपणे महर्षि व्यासानी स्वतंत्र रूपाने ह्या देवतांच्या नावांनी पुराणांची रचना करून नावाच्या अर्थाला धरून आध्यात्मिक, दैविक, भौतिक घटनांच्या द्वारा प्रत्येक उपासनेचा निर्णय करून ठेविला आहे. सात्त्विक, राजस, तामस आणि मिश्र भावानी प्रत्येक उपास्य भावनेची व्याख्या केली गेली आहे. उदाहरणार्थ रामोपासनेत रामनामाचे महत्त्व मानले जाते. राम शब्दाचा अर्थ रमविणारा, सुंदर, अभिराम, सौम्य इत्यादि भावना व्यक्त करतो. याच अर्थाला मुख्य मानून गोस्वामी तुलसीदासानी रामचरित्र वर्णिले. प्रत्येक उपासनेत चार प्रकारांनी इष्टस्वरूप सांगितले आहे. : १) सात्त्विक, राजस, आणि तामस हे तीनही भाव गीतेच्या अठराव्या

अध्यायातील २०, २१, २२ या श्लोकातून घेतले आहेत. व्यापक, निराकार अगोचर, पूर्ण, सर्वसामर्थ्ययुक्त, वेदांतप्रतिपाद्य इष्टाचे स्वरूप तात्त्विक असल्याने प्रमुख ठरते, त्यालाच सात्त्विक भाव म्हणतात. 'विनु पग चले, सुने बिनु काना' इत्यादि चौपायामधून हेच सांगितले आहे. २) साधनानी मिळालेले सगुण साकार, तसेच साधनाच्या अंतर्भूत नाम किंवा मंत्राच्या प्रतिपादनाचा दुसरा क्रम लागतो. यात मानस क्रियांचे प्राधान्य असल्याने याला राजसभाव म्हणणे शक्य आहे. 'जय सच्चिदानंद गुणधामा, प्रेम ते प्रकट होहि हम जाना' इत्यादि. तथापि सात्त्विक सुखात्मक वृत्ति या प्रकारात प्रधान असते. ३) अवतारातून व्यक्त झालेले चरित्र, अत्यंत स्थूलपणे सर्वांना दिसणाऱ्या अयोध्या, मथुरा इत्यादि स्थानात प्रकट होऊन अनेक लीला करणे हा ही सात्त्विक व्यवहारच आहे,तथापि स्थूल असल्यामळे या भावाला तामस म्हणतात. ४) दुसऱ्या भावानी मिश्रित झालेले आपल्या इष्टाचे प्राधान्य आणि दुसऱ्या भावाची गौणता-उदाहरणार्थ, राजसिंहासन मिळाल्यावर शिव वगैरे देवतांच्या द्वारा पूर्ण ब्रह्माच्या रूपात श्रीरामचंद्राच्या स्तुतीचे वर्णन आणि शिव-शक्ति-भावांच्या गौणपणाने रामोपासनेतील उपयोग यांचे स्मरण वारंवार ग्रंथकाराने रामभक्ताना करून दिले आहे. या प्रकारे निवृत्ति-प्रवृत्ति मिळून सर्वच विहित,व्यवहाराचे एकीकरण करून टाकले आहे. असेच कृष्ण, शिव, विष्णु, शक्ति इत्यादि देवतांचे वर्णन करणाऱ्या पुराण ग्रंथांची व्यवस्था आहे. अशा रीतीने सर्वांचे स्वातंत्र्य सिद्ध होते. पुष्कळ लोक पुराणांची सात्त्विक, राजस, तामस आणि मिश्र अशी विभागणी करतात, परंतु हा विचार एकदेशीय आहे. हे चारही भाव प्रत्येक पुराणात आहेत. जो देव ज्या पुराणात मुख्य असतो, त्या ठिकाणी दुसऱ्याचे गौण रूपाने वर्णन होते, अशी पुराणांची पद्धति आहे.

६) ज्याप्रमाणे बीज आणण्यासाठी पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह अशा दोन प्रकारच्या तारांचो जोडी लावतात, त्याचप्रमाणे उपासनेत दोन भावनांच्या मिश्रणाखेरीज तिची सिद्धता होऊ शकत नाही. तीत एक प्रधान आणि दुसरी गौण असते. म्हणून प्राधान्याने एका देवाच्या पुराणात

दुसऱ्या देवाचे चरित्र गौण रूपाने सांगितले जाते. गोस्वामी तुलसीदासांनी याच साठी रामाच्या भक्तांना शिवाची उपासना करण्यास सांगितले आहे. अशीच अवस्था भागवत, शिवपुराण इत्यादि ग्रंथातही मानली गेली आहे. साधनेतही मुख्य भावाबरोबर पूरक रूपात आपल्या इष्ट रूपाच्या ध्येयाहून भिन्न भावनेचा मंत्र उपासना, सिद्धि, यांची उपाययोजना अत्यंत हितकर म्हणून गुरुजन सांगतात. म्हणूनच शैव भावात विष्णु, राम कृष्ण इत्यादि भावांनाही गौण रूपात मानून शैवानी त्यांचा स्वीकार केला आहे यावरून असे समजते की, पुराण साहित्यही परस्पर ऐक्य स्थापन करून एकाच ईश्वराचे भिन्न-भिन्न दृष्टिकोणातून वर्णन करते.

७) परब्रह्म परमात्म्याचा पराशक्तीबरोबर संयोग होताच ब्रह्माला सच्चिदानंद किंवा सगुण म्हणू लागतात. पराशक्ति आणि ब्रह्म तत्वतः एकच आहेत. याच संयोगाने ब्रह्म विष्णु, आणि महेश या तीन देवांचे स्वरूप व्यक्त होते, ते पुराणात विस्ताराने वर्णिले आहे. ब्रह्मा कर्मात्मक, वेदभागाचा प्रकाशक, सृष्टीचा कर्ता, प्रवृत्त्यात्मक, सरस्वतीयोग असलेला मानला गेला, तथापि हा योग म्हणजे निवृत्ति प्रतिपादन करणारी ब्रह्म-विद्या हे उमास्वरूप पार्वतीचे कार्य आहे. सप्तशतीच्या उत्तम चरितात सांगितले आहे की पार्वतीच्या शरीरकोशातून अबिका बाहेर आली, 'शरीरकोशाद् यत् तस्याः पार्वत्या निःसृताऽम्बिका' (५।८७), तिलाच महासरस्वती म्हणतात. म्हणून प्रवृत्त्यात्मक ब्रह्मसरस्वतीयोग हा निवृत्त्यात्मक शिवपार्वतीयोगाचेच रूपांतर आहे. रागमूलक असल्यामुळे ब्रह्माचे लाल वर्णाचे, आणि तसे नसल्यामुळे शिवाचे रूप स्वच्छ, शुभ्र मानले आहे. ब्रह्माच्या हातात दंड-कमंडलु-वेद-माला असणे, चतुर्मुखत्व, संयम, ज्ञान, शुद्ध विचार, तप, व्यवहाराचे सर्व प्रकारे ज्ञान यांची आता संगति लागते. ज्ञानाचे महत्त्व आत्माराम बनण्यात आहे, त्याचा पूर्ण परिचय शिवरूपातील योग्याच्या वेशावरून होतो. प्रवृत्तिपराङ्मुखत्व हेच त्या रूपाचे महत्त्व, आणि ध्याननिष्ठा हीच चरम लक्ष्य आहे. म्हणूनच पुराणामध्ये शिवविवाह हास्यरूपाने वर्णन केला आहे. प्ररूढ प्रवृत्ति हाच ब्रह्माचा विषय आहे, म्हणून उपासना किंवा ज्ञान यामध्ये ब्रह्माला स्थान नाही,

फक्त कर्मातच ब्रह्मा पूजनीय मानला आहे. निष्काम कर्मानेच उपासना आणि ज्ञान यात अधिकार प्राप्त होतो.ही अवस्था विष्णूची आहे. विष्णूच्या मूर्तीत ऐश्वर्य आणि निवृत्ति या भावांचे व्यवस्थापन केले आहे. त्यामध्ये पराशक्तीने लक्ष्मीरूपाने सहकार्य केले, म्हणून त्याला लक्ष्मीनारायणयोग म्हणतात. या रूपामध्ये त्यांचे ऐक्य असल्यामुळे प्रवृत्ति-निवृत्तीचा विरोध वाढून, तीनही रूपात त्यांचे मुख्यत्व सांगितले आहे याच कारणाने वैष्णवाचार्य ज्ञानकर्मसमुच्चय मानतात, आणि दोन्हीत परस्पर विरोध नाही असे सांगतात. याच कल्पनेचे निदर्शन दक्षयज्ञात केले आहे. उमेच्या देहत्यागाच्या द्वारा शिवाच्या अपमानामुळे केवळ दक्षयज्ञाचा विध्वंस वर्णिला आहे, शिवस्वरूपात कर्म आणि विद्या (=ज्ञान) यांचा त्याग सूचित होत असल्यामळे दोन्ही परस्पर विरोधी असल्याचा अभिप्राय व्यक्त होतो. विष्णुयोगामुळे यज्ञाची सांगता झाली असे सांगितले आहे. उमेच्या देहत्यागाने हे स्पष्टपणे समजते की यज्ञविद्या ब्रह्मविद्येशिवाय स्थिर होऊ शकत नाही मुख्याचा तिरस्कार हा गौणाचाही तिरस्कार असतो म्हणूनच समुच्चयाची आवश्यकता निर्माण झाली. कारणाशिवाय कार्य राहू शकत नाही, म्हणून म्हटले आहे की 'यद् विद्यया उपनिषदा तद् बलवत्तरं भवति' म्हणजे उपनिषद्-विद्येने युक्त झाल्यास कर्मविद्या बलवत्तर होते. हा विषय गूढ आहे. त्यासंबंधी जे सांगितले आहे की 'चक्षुष्मन्तोऽनुपश्यन्ति' म्हणजे ज्ञानदृष्टि असणाऱ्यानांच हे समजू शकते, ते यथार्थच आहे; तथापि या तीनही मूर्ति ईश्वर कोटीतच आहेत, त्यांना जीव कोटीतील मानणे ठीक नाही.

८) पुराणांमध्ये या तीन मूर्तीत अज्ञानाचा देखील संबंध सांगितला आहे, तथापि अशा प्रसंगी पराशक्तीच्या अपेक्षेनेच ते मानले पाहिजे, उदाहरणार्थ ब्रह्मामध्ये पूर्ण ईश्वरत्वाच्या अभिमानाचा अभाव, कृष्णावतारात मोहिनीरूप प्रसंगी शिवाचा मोह, आणि जालंधर उपाख्यानात विष्णूमध्ये कामुकतेचा दोष दाखविला आहे. या कथांचा अभिप्राय त्यांना भिन्न-भिन्न ईश्वर मानण्याचाच आहे. वस्तुतः या तीनही रूपांना समान मानले तर समन्वित रूपात दोष नाही. म्हणून कर्म, ज्ञान, उपासना,

या तीनही समन्वित रूपातच पूर्ण फलदायक आणि यथार्थ आहेत असे सिद्ध होते. किंवा कोणाही एकाचे मुख्यत्व आचरण कालापुरते आहे, पारमार्थिक नाही. म्हणून आपआपल्या स्थानी तिघांचेही मोठेपण योग्य आहे. अशा प्रकारे गौण-मुख्य-भावाची देखील संगति लागते, कारण व्यवहारकालात गौण-मुख्य-भाव असणे अनिवार्य आहे.

९) ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांच्याबरोबर आपल्या वेगळ्या शक्तींचा संबंध कन्या अथवा भगिनी या रूपात सांगितला आहे. ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र हे देखील शक्तींचीच रूपांतरे आहेत. आपआपला संबंध आल्यानंतर 'पुरुषत्वं प्रपेदिरे' या वचनानुसार पुरुषरूपात त्यांचा व्यवहार झाला. ब्रह्माची भोग्य शक्ति गायत्री,सावित्री सांगितली आहे. सरस्वतीचा संबंध ब्रह्माबरोबर कन्या रूपात आहे. सरस्वती ब्रह्माची भोग्य शक्ति नाही. ज्ञानशक्ति शिवाची भोग्य आहे. म्हणून सरस्वतीची भोगबुद्धीने कामना केल्यामुळे शिवाकडूनच ब्रह्माचा शिरश्छेद झाल्याचे वर्णन आहे. शिवत्व मिळाल्याशिवाय विद्याशक्तीचा भोग शिरच्छेदा समानच आहे; कारण पशुभावात विद्येचा उपभोग अंधतम नरकच प्राप्त करून देतो. शिवाबरोबर लक्ष्मीचा संबंध रक्षणात्मक भावाने व ऐश्वर्याबरोबर भगिनी रूपाने वेदात सांगितला आहे. 'एष ते रुद्र भागः सह स्वस्राऽम्बिकया तं जुषस्व स्वाहा एष ते रुद्र भाग आखुस्ते पशुः' (यजुर्वेद ३।५९) म्हणजे हे रुद्रा, हा तुझा वाटा, आपल्या अंबिका भगिनीबरोबर त्याचा स्वीकार कर. हा तुझा वाटा आणि उंदीर तुझा पशु', या संबंधी शरत्कालाच्या आपत्तींची शांति व्हावी यासाठी विधान सांगितले आहे. परंतु भाष्यकारांनी या मंत्रामध्ये क्रूर देवतेचा संबंध आणला आहे, तो वास्तविकरीत्या बरोबर वाटत नाही; किंवा अलक्ष्मीच्या नाशास ठी लक्ष्मी क्रूर असल्याचे समजून भाष्यकारांनी तसे सांगितले असल्यास संगति लागते. शतपथ श्रुतीत देखील केवळ 'अम्बिका ह वै न माऽस्य स्वसा' असे म्हटले आहे. स्वसा म्हणजे भगिनीच. ही शक्ति रुद्राला भोग्य नाही. हेही प्रसिद्ध आहे की शिवाचे रूप अशिव असतांना देखील सर्व ऐश्वर्य देणारे आहे. 'अमङ्गल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं, तथापि स्मर्तृणां वरद परमं मङ्गलमसि

(शिवमहिम्नःस्तोत्र-२४) म्हणजे 'हे वरदा, तुझा सर्व व्यवहार अमंगल आहे, परंतु स्मरण करणाऱ्यांना तू परम मंगलरूपच आहेस' लक्ष्मी-योगाशिवाय हे शक्य नाही. 'आखुस्ते पशुः' या मंत्रभागावरून असे समजते की गणेशमूर्तीची कल्पनादेखील लक्ष्मीयोगानेच केली आहे. गणेशमूर्ति विघ्नांचा नाश करणारी, सर्व ऐश्वर्यदात्री आणि मूषक वाहन असलेली आहे. पार्वती आणि शिव यांचा गणेश हा भोग्य पुत्र नाही. उमेने आपल्या शरीराच्या मळिन अंशापासून गणेश निर्माण केला. उमेच्या अपेक्षेने ऐश्वर्य कमी असणे समजू शकते, कारण ब्रह्मविद्याच सर्व विद्यांपेक्षा श्रेष्ठ आहे शिवाकडून विपरीत घडल्यावर त्याचाही शिरश्छेद घडल्याचे सांगितले आहे, आणि लक्ष्मीचा अत्यंत आवडता असलेल्या हत्तीचे मस्तक देऊन त्याला पुनः जिवंत केले गेले. लक्ष्मीच्या ध्यानात हत्तीचा संबंध मानलेला आहे 'कान्त्या काञ्चनसंनिभां हिमगिरिप्रख्यैः चतुर्भिर्गजैर्हस्तोत्क्षिप्तहिरण्मय मृतघटैरासिच्यमानां श्रियम्'. गणेशपूजन मांगलिक म्हणून प्रत्येक वैदिकाच्या घरात सर्वप्रथम याच कल्पनेने केले जाते. शिवपार्वती संबंधात पार्वती श्रेष्ठ आहे, लक्ष्मी गौण. म्हणूनच लक्ष्मीचे रूपांतर करून सीतेच्या द्वारा गोस्वामी तुलसीदासांनी गिरिजापूजन वर्णिले. शिवाबरोबर लक्ष्मीचाही संबंध आहे. लक्ष्मीचा विष्णूबरोबर नित्य संबंध आहे ती शांति, ज्ञान इत्यादि शुभ गुणांनी आपले स्वरूप प्रकाशित करते. षट्कर्मदीपिका या ग्रंथात शांतिकर्मासाठी विष्णु मंत्रांचा उपयोग केला आहे. यावरून असे वाटते की उपर्युक्त वैदिक मंत्रात रुद्राबरोबर लक्ष्मीचाच संबंध आहे, म्हणूनच शांतिकर्मात त्याचा विनियोग केला गेला. लक्ष्मी शिवाची भोग्य नसल्यामुळे शिवाला वैष्णव म्हणतात, ब्रह्माप्रमाणे शिवाकडून विपरीत झाले नाही,कारण त्याच्या बरोबर उमेचा संबंध होता. उमेचेच दुसरे रूप काली शक्ति. तिच्यामुळे रुद्र संहार करतो. तिचा विष्णूबरोबर भगिनीसंबंध आहे, व तिचा अवतार नंदाच्या घरी यशोदेच्या गर्भातून झाला होता. भागवत पुराणात ती कृष्णाची धाकटी बहिण म्हणून प्रसिद्ध आहे. तिच्यामुळेच विष्णु असुरांचा संहार करतात. 'कालोऽस्मि लोकक्षयकृद् प्रवृद्धः' (गीता ११।३२) या

गीतावचनाने विष्णूच्या कालस्वरूपाचे समर्थन होते. शिवाचे विष्णू-बरोबर व विष्णूचे शिवाबरोबर वैपरीत नसल्यानेच दोघांचा अभेद आणि दोघेही उपास्य मानले गेले आहेत. जेव्हा सती रामचंद्राची परीक्षा करण्यासाठी गेली, तेव्हा सतीला सीतेच्या रूपात पाहूनही रामचंद्राकडून चूक झाली नाही, उलट तिला ओळखून जगज्जननीच्या रूपातच त्यांनी तिला नमस्कार केला. म्हणून श्रीरामालाही शैव परम शिवभक्त मानतात. देवीभागवतात सरस्वतीचाही संबंध विष्णूबरोबर सांगितला आहे. सरस्वती आणि लक्ष्मी यामध्ये विरोध असल्याचे सांगतांना तो सांगितला आहे, व त्याच संबंधामुळे विष्णु मुमुक्षूना ज्ञान देऊन मुक्त करतात. 'ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते' (गीता १०।१०) या गीतावचनाने त्याची संगति लागते. शिवाचा देखील उमेबरोबर ब्रह्मविद्यायोग, कालीबरोबर संहारप्रवृत्तियोग, व षोडशीबरोबर आनंदयोगाने पूर्णब्रह्मत्व मानले आहे. कल्पभेदाने शिवाकडूनही विष्णूप्रमाणेच उत्पत्ति, स्थिति व संहार या तीनही भावांच्या उपासनेच्या श्रेष्ठतेच्या अभिप्रायाने पुराणात सांगितला आहे.

१०) पुराणांमध्ये या शक्ति आणि त्यांचे पुरुषभाव या विषयी कधीकधी विरोध देखील दाखविला आहे, पण तो खरा नाही. शक्यतेच्या कल्पनेने किंवा शक्ति तत्त्वाचा मोठेपणा दाखविण्यासाठी तसे लिहिले आहे. नाही तर योगभंग झाल्यावर पालन, सृष्टि व संहार हे जे तीन भाव जगाच्या मुळाशी आहेत व जे या त्रिविध योगानीच चालले आहेत, ते नष्ट होतील आणि कोणतेही कार्य सिद्ध होणार नाही, उदाहरणार्थ, हयग्रीवाचे रूप धारण केल्यावर लक्ष्मीने विष्णूला शाप दिला. सावित्रीला मुख्य स्थानावर बसल्यावर गायत्रीने ब्रह्माला धात्रीवृक्ष हो असा शाप (कार्तिक माहात्म्यात) दिला. श्रीरामचंद्राची परीक्षा केल्यावर शिवाने सतीचा त्याग केला, आणि सतीने पररूप धारण करून शिवाचा पराभव केला, असे शिवपुराण व महाभागवत यात सांगितले आहे. ही सर्व आख्याने शक्तीचा मोठेपणा दाखवितात. अद्भुत- रामायणात सीतेने महाकालीचे रूप धारण केले हीही एक अद्भुत गोष्ट

सांगितली आहे, तसेच श्रीरामाच्या परीक्षेत सतीने सीतेचे रूप घेणे ही एक अशीच अद्भुत गोष्ट आहे. सतीकडून विपरीत आचरण झाल्यावर शिवसती संबंध संपला, आणि शिवाने सतीचा त्याग केला परंतु सती-शिवाय शिव आपले कार्य करू शकत नव्हते. देवांच्या विनंतीवरून पुनः उमायोग झाला तेव्हा शिवाला आनंद झाला. जोपर्यंत उमा शिवाला पुनः मिळत नाही, तोपर्यंत शिवाचे रूप म्हणजे शव. स्वतःचे काम करण्यास पूर्णपणे असमर्थ. म्हणूनच तारा, काली, इत्यादि मूर्तीत शवरूपात शिवाची मूर्ति बनवितात. परंतु सती म्हणजे ब्रह्मविद्या, तिच्यावरही भ्रम आणि अज्ञान यांचे आवरण येते. त्यामुळे तिला रामाची ओळख न पटता संभ्रम होतो. ही गोष्ट केनोपनिषदात सांगितलेल्या हेमवती उमेच्या सिद्धांताला विरुद्ध जाते, कारण सती हे नाव पतिव्रतेचे आहे. याच प्रकारे ब्रह्मविद्या परब्रह्मापासून कधीच वेगळी होत नाही. परंतु अशी गोष्ट लिहिल्यामुळे पूर्ण विरोध दिसतो, कारण ज्ञान व अज्ञान यात परस्पर विरोध असतो. भ्रम अज्ञानानेच होतो. श्रीराम आणि शिव यांच्यात गाढ प्रेम असल्याच्या अभिप्रायानेच तसे लिहिले असावे असे वाटते. पुराणकारांनी तसे लिहिले आहे, तथापि वस्तुतः तसे नाही. हेही शक्यतेच्या स्वरूपातच असावे. अशीच कल्पना ह्यग्रीव रूपात लक्ष्मी आणि नारायण यांच्या संबंधी समजली पाहिजे.

११) ब्रह्म आणि शक्ति यांना वास्तवात काही आकार नाही. तथापि मंत्र आणि ज्ञानशक्ति यांच्यायोगे भिन्न-भिन्न अर्थ प्रकट करण्यासाठी साधकाच्या भावनेनुसार पुरुष किंवा स्त्री या रूपात, तसेच अन्य अभीष्ट रूपात, परम तत्त्व शक्तिविशिष्ट असे प्रकट होते. कितीतरी लोकांचे या विषयी असे मत आहे की, मनुष्याचा तसा विचारच फक्त निर्माण होतो, परमात्मा अभिव्यक्त होत नाही. परंतु गोष्ट अशी नाही. ज्या प्रमाणे कुंभार साधने आणि आपली कल्पना यांच्याच आधाराने भांडी बनवू शकत नाही, त्याची कल्पना प्रकट होण्यासाठी मातीच्या आधाराची आवश्यकता असते, त्याच्या कल्पनेप्रमाणे घटादि वस्तु मातीशिवाय बनू शकत नाहीत, त्याच

प्रमाणे साधनेतही आहे मंत्र आणि चिंतन यामुळे जो मूर्ति आकार येते ती सच्चिदानंदरूपच असते, केवळ कल्पना नसते. ज्या मूर्तीमुळे दया, श्रद्धा, बुद्धि, कीर्ति, श्री इत्यादि स्त्री-भावात्मक शुभ गुण अभिव्यक्त होतात, तिची स्त्रीरूपात उपासना करितात. धर्म, बल, ज्ञान, पराक्रम, मोक्ष, इत्यादि पुरुषभावसूचक तत्त्वांचे चिंतन पुरुषसूचक मूर्तीनी करितात. असेच त्यांच्या वाहनासंबंधीही आहे. गरुड हे वाहन धर्माची गति सर्वात जास्त आहे असे सूचविते. त्याचा संबंध विष्णूशी आहे. धर्मस्य त्वरिता गतिः'. त्यामुळे विष्णु भक्ताचे दुःखनिवारण शीघ्र करतो, आणि पालन कार्यातही तो अत्यंत दक्ष असतो. हाच स्वभाव शिवाच्या बाबतीत वृषभाचे रूप धारण करतो. 'धर्मो वै चतुष्पाद् वृषः'. त्यावरून पालनभाव घेतलेला आहे. शक्तिक्रमात तोच सिंहाचे रूप घेऊन महाबली झाला. 'दक्षिणे पुरतःसिंहं समग्रं धर्ममीश्वरम्'. शौर्याच्या बरोबर तोच श्वान रूपाने संतोष, स्वामिभक्ति, जागृति, इत्यादि शुभ गुण व्यक्त करतो, गणेशाबरोबर मूषकरूपात विघ्ने कुरतडण्याचे काम करतो, हनुमंताबरोबर वानररूपात स्वामिभक्ति, तीव्रता, स्वकार्यप्रवीणता, इत्यादि भावना व्यक्त करतो. अशा प्रकारे उपासना मार्गात हे तत्त्व निश्चित केले आहे. बुद्धिमानानी याकडे विशेष लक्ष द्यावे. या गुणांच्या चिंतनाने साधकात गुण प्रकट होतात, ते अनेक प्रकारचे ऐश्वर्य मिळवून देतात, व त्यागाने त्यांच्याच आधारावर परम पुरुषार्थ मिळतो.

अवशिष्ट-रत्नमणि-ग्रथन

पहिल्या प्रकरणात बरेच विवाद्य विषय सांगितले गेले. ते ज्ञानी आणि भक्त म्हटल्या जाणाऱ्या विचारकांच्या विचारसरणीत मानले जातात. त्यात जे मतभेद आहेत ते देखील अधिकारभेदाने आहेत आणि तेही अवांतर भेदच आहेत, मुख्य सिध्दांतात कोणताही भेद नाही. विचार केल्यास समन्वयाच्या मार्गाने एकता सहज निर्माण होऊ शकते. याचसाठी पुढील प्रकरण आम्ही लिहीत आहोत.

१) ज्ञानाचे योग्य फल विवेक, वैराग्य, नम्रता, सदाचार, विश्वप्रेम, अभिमानाचा त्याग आणि सर्वांचे हित करण्यात आहे. केव्हाही स्वत:ला मोठे आणि इतराना तुच्छ समजणे हे ज्ञानाचे लक्षण नव्हे, उलट असा विचार ज्ञानाच्या विरोधीच असतो. त्याचप्रमाणे भक्तिमार्ग किंवा उपासना यासंबंधीही असेच आहे. परमात्म्याची अनेक रूपे उपास्य म्हणून निश्चित केली आहेत, त्यामध्ये न्यूनाधिक भावाची कल्पना करणे, माझा देव सर्वांपेक्षा मोठा, दुसऱ्याचा देव छोटा, म्हणजे दंभ प्रकट करून कर्ममार्गाचा विनाश करणे आहे. म्हणून या त्रिदोषांपासून आपले रक्षण केले पाहिजे. चतुर साधकांनी या विषयी खूपच सावधगिरीने वागणे जरूर आहे. या सत्याच्या विरोधात एकही शब्द केव्हाहि मुखातून निघू नये.

२) ज्ञानमार्गाच्या साधकानी निरभिमान आणि जिज्ञासु असले पाहिजे. असे कधीही समजू नये की मला आता पुरेपूर ज्ञान झाले किंवा मी सर्वज्ञ झालो. कोणत्याहि गोष्टीचा द्वेष करू नये. चांगल्या वाईट सर्व गोष्टींचे समबुद्धीने निरीक्षण करावे. निरपेक्ष बुद्धीने प्रत्येक पदार्थांची परीक्षा करावी. या प्रकारे जे ज्ञान मिळेल, तेच वस्तुतः खरे ज्ञान.

३) खरे म्हणजे परब्रह्म हे ज्ञानरूपच आहे. अंत:करणाच्या सात्त्विक वृत्तीतून ते फक्त प्रकट होते. ज्ञान हा जडाचा धर्म किंवा जडाचाच एक

भाग असे नाही. जसजसा सात्त्विक वृत्तींचा विकास होत जातो, तसतसे ज्ञान वाढत जाते. अनन्य भक्ति, निष्काम कर्मयोग, ध्यानाभ्यास यामुळे वृत्ति उच्च अवस्थेला पोचतात. ही तीनही ज्ञानाची खरी साधने होत. 'अहं ब्रह्माऽस्मि', 'तत्त्वमसि' आदि महावाक्ये याच ज्ञानाची सर्वोच्च प्रमाणे मानली गेली आहेत. ती ही वृत्तिज्ञानेच आहेत, शुद्ध ज्ञान परब्रह्मच आहे. त्याचे प्रकटीकरण करण्यामुळे वृत्तीला देखील गौण प्रकारे ज्ञान म्हणतात.

४) भक्तिमार्गानुगामी भक्ताने सर्व जगाकडे प्रेमबुद्धीने पाहावे. द्वेषाने किंवा हीनत्वाच्या भावनेने कोणत्याही प्राण्याकडे पाहू नये. आनंदात्मक गुणांचे वर्णन, उपदेश, स्वाध्याय आणि आनंदी संतांशी सहवास करावा. आनंदरूप भगवंताच्या अवतारांची चरित्रे ऐकण्यात मग्न असले पाहिजे, व या तत्त्वांचा आविष्कार करणाऱ्या सतांच्या वचनांचे वाचन, मनन आणि प्रवचन केले पाहिजे. या योगे सात्त्विक सुखात्मक वृत्तींचा विकास होतो. हे केल्याने भक्त आनंदरूप ब्रह्माबरोबर अभिन्नच होऊन जातो, त्यालाच भक्ति, प्रेम, परानुराग असे म्हणतात. तो सात्त्विक सुखात्मक वृत्तींचा अंतिम परिणाम असतो. वस्तुतः प्रेमाचे यथार्थ रूप म्हणजे ब्रह्मच. सात्त्विक सुखात्मक वृत्तींमध्ये त्याचाच आभास प्रतीत होत असतो. God is love and love is God या वाक्यामध्ये हेच तत्त्व सांगितले आहे. हे प्रेम प्राप्त करण्यासाठी वैधी आणि रागात्मक अशा दोन भक्ति मानलेल्या आहेत. नवविधा भक्ति-देखील याचसाठी सांगितलेली आहे. जोपर्यंत सात्त्विक सुखात्मक वृत्तींचा पूर्ण विकास होत नाही, तोपर्यंत साधक भक्ताला पूर्ण सिद्धि मिळत नाही. जेव्हा सर्व विश्व आनंदरूप भासू लागेल, त्याचवेळी त्याला पूर्णता प्राप्त झाली असे समजावे. थोडक्यात म्हणजे भेदबुद्धीचा त्याग, गर्व-कपट-विषयेच्छा-आसक्ति इत्यादि दुर्गुणांचा सर्वथा त्याग, निरभिमानिता, सहिष्णुता, अमानित्व, दैवी भावाचा आश्रय इत्यादि लक्षणे भक्त असल्याचे दाखवितात.

५) आनंदरूपाने भासित होणाऱ्या सर्व वस्तूंमध्ये नाना प्रकारांनी परमात्माच सुखाचे रूप धारण करून राहिला आहे, तरी हे परमात्म्याचेच रूप आहे असे अज्ञानी जीवाला मात्र वाटत नाही. याचे कारण विषयांमध्ये आसक्ति असल्यामुळे बुद्धीवर पडलेले आवरण. म्हणून आनंदाचे अशुद्ध रूप विषयाच्या संबंधाने प्रतीत होत असते त्यातच तो गुरफटून गेलेला असतो व त्याचीच भक्ति करीत असतो; इतकेच नव्हे तर भोग आणि मोक्ष एकच असेच तो या कल्पनेने सिद्ध करीत असतो. भक्तीच्या नावावर वंचना-छल-दंभही पुष्कळ केला जातो. तथापि उपर्युक्त भक्तीच्या सिद्धांताशी याचा काहीहि संबंध नाही.

६) अशा प्रकारे अवस्थाभेदाने ज्ञान आणि भक्ति यांचे तात्त्विक स्वरूप आहे. ज्ञानरूपाने देखील ब्रह्मच प्राप्त होते. भक्तिही तेथेच नेते. सिद्धांतात कोणताही भेद नसल्यामुळें वास्तविक भेद नाहीच. खरे म्हणजे या दोनही सिद्धांतांचे मूळ शुद्ध सत्त्व गुण आहे. 'तत्र सत्त्व निर्मलत्वात् प्रकाशकमनामयम्। सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चाऽनघ॥'(गीता१४।६) सत्त्वगुण निर्मल असल्यामुळ प्रकाशस्वरूप आणि दुःखरहित असतो, तोच सुख आणि ज्ञान या दोन रूपानी पुरुषाला बांधून ठेवतो. ज्ञान आणि सुख हेच लक्ष्य समजून ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग प्रवृत्त झालेले आहेत. ज्ञानमार्गात देखील भक्तीला मान्यता आहेच. गीतेमध्यें ज्ञानाच्या साधनांमध्ये भक्ति सांगितलेली आहे. 'मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी' (गीता १३।१०) म्हणजे माझ्यावर असलेली अनन्यनिष्ठ अव्यभिचारिणी भक्ति देखील ज्ञानाचे साधन आहे. भक्तिमार्गातही ज्ञानाचा स्वीकार केला आहे. नारदाने आपल्या भक्तिसूत्रात सांगितले आहे की पूर्ण विरहासक्तीमध्ये देखील ईश्वराचे ज्ञान असू शकते. ' तत्राऽपि माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः' (नारदसूत्र २२) म्हणजे पूर्ण प्रेमावस्थेत देखील ज्ञानाचे विस्मरण हा अपवादच आहे. अशा प्रकारे दोनही मार्गांमध्ये संगति लागते.

७) ज्ञान आणि भक्तीच्या आचार्यांनी परमात्मा अवतार घेतो असेही मानले आहे. हा अवतार वेळोवेळी सज्जनांचे रक्षण, धर्माची स्थापना,

आणि दुष्टांचा विनाश यासाठी होत असतो. या विषयी त्यामध्ये थोडा मतभेदही आहे, तो वाचकांच्या मनोरंजनासाठी व ज्ञानवृद्धीसाठी संवाद-रूपाने लिहितो. तत्त्वनिर्णयाच्या भावनेने व निरपेक्ष बुद्धीने वाचक त्याचे मनन करून स्वत:चा भक्तिभाव दृढ करतील अशी आशा आहे.

भक्त–ब्रह्म उपरिनिर्दिष्ट तीन कारणानी आपल्या वैष्णवी शक्तीचा आश्रय करून मायेने प्रकट होते किंवा अविद्याक्षेत्रात त्याचा अवतार होतो. 'प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया' (४।६) या गीतावचनाने प्रकृतीचा कर्मकारकाने द्वितीयांत रूपाने व मायेचा करणकारकाने तृतीयांत रूपाने निर्देश करून सच्चिदानंदस्वरूपिणी शक्ति आणि माया यातील भेद सांगण्याने असा अर्थ होतो की,भगवंताचा अवतार सच्चिदानंदात्मक असतो, अविद्यात्मक नव्हे. अविद्यात्मक जगत् त्याच्या अभिव्यक्तीचे फक्त स्थान आहे. शब्दशक्तीने सच्चिदानंस्वरूप ब्रह्माची मूर्ति तयार होते ज्या मंत्रानी आणि स्तुतिवचनानी हे शरीर बनते ते परावाणीचा विषय असल्यामुळे ऋतंभरा प्रज्ञेने ऋषींना त्यांचा साक्षात्कार झालेला असतो. म्हणूनच ते नित्य आणि सत्य असतात. हे रहस्य याच भगवद्योगाने प्राप्त होते. साधनविहीन लोकांना ते दिसत नाही. गीतेच्या अकराव्या अध्यायात विश्वरूपदर्शन वर्णिले आहे, ते देखील असेच आहे.'दिव्यं ददामि ते चक्षु:' (गीता ११।८) या वाक्यावरून असे वाटते की ते चर्मचक्षूनी पाहिले जाऊ शकणार नाही; भगवंताची कृपाच ते दाखवू शकते. अद्वैत सिद्धांतामध्ये हा विषय नाही. निराकार ब्रह्मापेक्षा अवतार छोटा मानला गेला आहे, परंतु अनुभव असा नाही, आणि पुष्कळशा साधकांचा त्याला विरोधही आहे. असेही म्हणता येत नाही की, सच्चिदस्वरूपिणी अभिव्यक्ति होऊच शकत नाही; कारण जेव्हा देवतेचा साक्षात्कार होतो, तेव्हा ज्या मूर्तीचा साक्षात्कार होतो ती अविद्यात्मक नसून निश्चयाने सच्चिदानंदरूपच असते. मंत्रामुळे तिला भावनानुकूल रूप मिळाले असेल, परंतु त्यामुळे तिला अविद्यास्वरूप मानणे बरोबर नाही. साच्यात घातल्यावर सोन्याला साच्याचे रूप आलेले दिसते, परंतु त्याला साचाच मानणे चूक होईल.

ज्ञानी–अवतार रूपाची अभिव्यक्ति हे मायेचेच कार्य आहे, चेतनाचे नव्हे; कारण आकृति मायेमध्ये असते, चेतनात केवळ पराशक्ति अभिव्यक्त होते.

भक्त–पराशक्ति आणि ब्रह्म यात भेद नसल्यामुळे पराशक्तीच अभिव्यक्त होते, ब्रह्म नव्हे, हे म्हणणे एकदेशीय आहे.

ज्ञानी–मायेमध्ये भासमान होणारे तत्त्व निश्चित सच्चिदानंदच आहे, परंतु तिचे शरीर मायिक आहे. साधकाची भावना शुद्ध सत्त्वात्मक असते, ती त्याच्या अंतःकरणातून निर्माण झालेली असते, व तीच मूर्तीचे रूप धारण करते. वस्तुतः सच्चिदानंद तत्त्वाला आकार असू शकत नाही. 'मायया संभवामि' या गीतावचनाचा अभिप्राय सच्चिदानंद तत्त्वाची मूर्ति बनते असा नाही; मायया शब्दावरून हे स्पष्टपणे समजते की आपला अवतार मायेमुळेच आहे, स्वाभाविक नाही. चेतनाला आकृति नसतानाही आपल्या मायेने ते प्रकृति–तत्त्व व्यक्त करते. ही अभिव्यक्ति प्रकृतीची असते. लाक्षणिकपणे ब्रह्मावरोबर प्रकृति असल्यामुळे ब्रह्मच प्रकट होते असे म्हटले जाते. जसे मायिक पदार्थ प्रतीतिमात्र असतात, तसेच ब्रह्मही शरीर धारण करीत असल्याप्रमाणे प्रतीत होते; परंतु वस्तुतः प्रकृतीचा शुद्ध सत्त्वांश, ज्याला विद्या म्हणतात, त्यापासूनच अवतार होत असतो. ब्रह्म निर्गुण निराकार आहे, त्याला आकारयुक्त मानणे योग्य नाही.

भक्त–ब्रह्माला निर्गुण निराकार मानणेच योग्य नाही. उपनिषदांमध्ये छांदोग्याच्या आठव्या अध्यायात,तसेच बृहदारण्यकाच्या पाचव्या अध्यायात ब्रह्मविद्येचे पर्यवसान होते, व ते सगुण ब्रह्माचे आहे. उपक्रमोपसंहार-न्यायाने आरंभी देखील सगुण ब्रह्माचेच वर्णन केले आहे असे मानणे योग्य होईल. 'अनावृत्तिः शब्दात् अनावृत्तिः शब्दात्' या वेदांतसूत्रामध्ये महर्षि व्यासानी वेदांत विचाराचे पर्यवसान सगुण ब्रह्मातच केलेले आहे. असे जर न मानले तर सर्व उपनिषदांचा अभिप्राय गौण मानावा लागेल, व ते

बरोबर होणार नाही. केवळ ब्रह्माची प्रकृतिरहित अवस्था सांगणारी निर्गुण विद्या फारच थोडी आहे. अर्थात ब्रह्म प्रकृतीच्या गुणांनी रहित असल्यामुळे निर्गुण आहे, वस्तुतः ते तसे नाही. उलट ते अनंत कल्याण गुणयुक्त आहे. सर्वसामर्थ्ययुक्त असल्यामुळे त्यापासून अवतार देखील होऊ शकतो.

ज्ञानी–ज्याला आपण गुण म्हणता, ते आपले केवळ पारिभाषिक शब्द आहेत. वस्तुतः स्वरूपाहून निराळा असा गुण म्हणून वेगळा पदार्थ अस्तित्वातच नाही. जर गुण-गुणी भाव मानला तर त्यांचा एक वेगळा संबंध मानावा लागेल. हा संबंध म्हणजे संयोग किंवा समवाय. संयोग मानला तर ज्या ठिकाणी संयोग असेल त्या ठिकाणी सगुण, इतर ठिकाणी निर्गुण असे आपोआपच ठरेल. समवाय देखील स्वरूपाहून वेगळा नसल्यामुळे सिद्ध होत नाही. संबंध एकदेशीय असल्यामुळे तो दोन भिन्न पदार्थांतच असू शकतो. सगुण ब्रह्म आणि गुण यांचा संबंध असिद्ध आहे जर सत्, चित्, आनंद हेच ब्रह्माचे स्वरूप असेल, तर काही अडचण नाही. सत्, चित् याना गुण म्हणण्यामध्ये केवळ नावापुरते सगुण होते. ब्रह्मामध्ये गुण राहतो असे मानण्याने आधार-आधेय येतो व त्यामुळे ब्रह्म गुणापासून निराळे आहे असे सिद्ध होते. या योगे निर्गुणच सिद्ध होते. गुण देखील जर ब्रह्मच असतील तर अडचण राहणार नाही. ब्रह्मामध्ये सुंदरता गुण असतो असे नव्हे तर सुंदरता म्हणजे ब्रह्मच उपनिषदांमध्ये उत्तम पक्ष सांगून मध्यम अधिकाऱ्याच्या अपेक्षेने शेवटी सगुणवादाचा स्वीकार केला आहे. हीच पद्धति व्याससूत्रामध्ये देखील आहे खरी गोष्ट तशी नाही. निर्गुण विद्या थोडी असल्यामुळे सगुण पक्षामध्ये वेदांताच्या अभिप्रायाची संगति लावायला पाहिजे आणि वेदांत–विद्येचे पर्यवसान उपासना किंवा भक्ति यामध्ये केले पाहिजे असे म्हणणेही बरोबर नाही. उपासनेपेक्षाही कर्मविद्या जास्त आहे, म्हणून कर्मविद्येमध्येच उपासनेचा अभिप्राय मानावा लागेल. मग कर्ममीमांसा हेच एक शास्त्र शिल्लक राहील; म्हणजे उपनिषदे व ब्रह्ममीमांसा याना वेगळे शास्त्रत्व देणे उपयोगाचे नाही. ब्रह्म सर्वसामर्थ्ययुक्त आहे याचा अर्थ असा नाही की ब्रह्म नियमाविरुद्ध कार्य करते. या संदर्भात नियम हाच आहे की आकार

जडालाच असतो, चेतनाला नाही. चेतनाला आकारयुक्त मानल्यास अव्यवस्था निर्माण होईल. अव्यवस्था झाल्यास कल्पना निरंकुशपणे धावेल. आणि सर्वसामर्थ्याच्या विषयात अनित्यत्वाच्या विनाशाच्या कल्पनेला देखील थांबविता येणार नाही. म्हणून अवतारांच्या शरीरात कर्माचाही संबंध सांगितला आहे. उदाहरणार्थ, वालिवधाचा सूड कृष्णावतारात जरा नामक व्याधाने घेतलेला आहे. परंतु ही शरीरे शुद्ध सत्त्वाची बनलेली असल्यामुळे जीवांच्या अविद्यात्मक मलिन सत्त्वानी बनलेल्या शरीराहून वेगळ्या प्रकारची असतात. म्हणून सच्चिदानंद तत्त्वाचाच अवतार मानणे विसंगत आहे. भक्तीच्या आचार्यांनी भक्तांची श्रद्धा वाढविण्यासाठी तसे म्हटले आहे, वास्तवात तसा प्रकार नाही.

भक्त—आपले हे सर्व विचार गौण पक्षाच्या आधारानेच चालले आहेत. गौण-मुख्य असा मुद्दा आल्यावर मुख्यच घेतले पाहिजे असा शास्त्राचा निर्णय आहे. 'संभवाम्यात्ममायया' (गीता ४।६) यावाक्यात 'संभव मि' शब्द प्रथम-पुरुषी असल्यामुळे ब्रह्माचाच या संदर्भात स्वीकार करणे ठीक आहे. अवतार-शरीरात कर्माचा जो संबंध येतो तो वास्तविक नव्हे.

या प्रमाणे वादी प्रतिवादी मध्ये वादविवाद चालू असतो तो ज़ास्त न वाढविता निर्णय वाचकांवरच सोपवून येथेच थांबू.

८) सगुण परमात्म्याचे उपासक असलेल्या माननीय संतांमध्ये पुष्कळ प्रकार आहेत. परंतु सामान्यतः पाच प्रकारांमध्ये त्यांची विभागणी केली जाते. त्याना वैष्णव, शैव, गाणेश, सौर आणि शाक्त म्हणतात. क्रमाने त्यांची काही लक्षणे येथे सांगतो.

जो दीनांचे हित करतो, ब्रह्मचर्याने राहून संतांची सेवा करणे हेच ज्याचे मुख्य कर्तव्य आहे, परोपकार मुख्य अंग असलेल्या भक्तियोगाचे जो अनुष्ठान करतो, दंभापासून अनेक कोस दूर राहतो, हरिचर्चेमध्येच ज्याला अधिक आवड आहे, शिव आणि विष्णु यामध्ये जो भेद मानत नाही, जो सकाम कर्मांना विषवत् समजतो,कोणत्याहि वस्तूविषयी ज्याची

दृष्टि द्वेषयुक्त नसते, पाखंड आणि भेदबुद्धि त्याज्य आहे असे जो समजतो, यदृच्छेने मिळालेल्या लाभावर जो संतुष्ट असतो, अनिकेतवासी असतो, परमलीनता भावाचा अवलंब ज्याने केलेला असतो, त्यालाच खरा वैष्णव म्हणतात. तोच महात्मा भगवान् विष्णूच्या उपासनेचा उत्तम अधिकारी होय.

९) पूर्णपणे तत्त्वाची जाण असलेला, योगाभ्यास करणारा, विरक्त, स्वतःत संतुष्ट असलेला, समाधीच्या नशेत दंग असलेला, मादक द्रव्यांच्या सहाय्याने ज्याला नशेची अपेक्षा नसते, काम-क्रोध-देहाभिमान याना ज्ञान-रूपी अग्नीमध्ये भस्म करून त्यानेच ज्याच्या सर्वांगावर भस्म लेपन झालेले असते, जो मधुरभाषी असून सर्व विश्व शिवरूप मानतो, भक्तिरूपी गंगेत जो सदैव न्हालेला असतो, ब्रह्मविद्यारूपी उमेची जो आराधना करतो, सर्व वस्तूंमध्ये भगवान् शिवाचेच दर्शन ज्याला होत असते, तोच खरा शैव.

१०) जो बुद्धिसागर आहे तोच पुरुष सर्व विघ्नांपासून मुक्त होऊ शकतो. ज्याचे उदर खूप मोठे आहे, ज्याच्यामध्ये सर्व प्रकारचे विचार समाविष्ट होतात, सद्विचार-ज्ञान-सदाचार यानी ज्याचे मस्तक हत्तीएवढे उंच आहे, ज्याला निश्चयरूपी एक दात आहे, जो सर्वांना सन्मार्ग दाखविणारा नेता आहे, जे दुष्ट आणि राक्षसी प्रकृतीचे पुरुष नेहमी उत्तम कार्य बिघडविण्यातच हित समजतात त्यांना निस्तेज करून जो जगाचे कल्याण करतो, अशा पुरुषाचे प्रथम नामोच्चारण करण्याने अवश्य विघ्नांचा नाश होऊन समस्त सिद्धि प्राप्त होतात, कारण या गोष्टी श्रीगणेशाच्या भक्तीने त्याला मिळालेल्या असतात.

११) जो ज्ञानरूपी प्रकाश पसरविण्यात किंचितही असा पक्षपात करीत नाही की हा ब्राह्मण आहे, याला अधिक द्यावा, आणि हा चांडाल-पतित-बहिष्कृत आहे, याला अंधारात ठेवायला हवा, जो सर्वांच्या नेत्रांना ज्योति देऊन आपआपला मार्ग पाहण्याला समर्थ बनवितो, त्यालाच सूर्य म्हणतात, कारण अशी समता प्रदर्शित करूनही ज्याच्यावर कोणत्याहि

दोषाचा परिणाम होत नाही. आपल्या विचाररूपी किरणांनी समस्त जगताचे पोषण करतो म्हणून त्याला पूषा म्हणतात. साऱ्या प्रजेचा स्वामी असलेल्या प्रजापतीचा तो प्रतिनिधि आहे. म्हणून त्याला प्राजापत्य म्हणतात. सर्वांना कर्तव्याच्या मार्गावर सद्बुद्धीची प्रेरणा करणारा असतो म्हणून त्याला सविता म्हणतात. जो हे गुण स्वत:मध्ये धारण करतो त्यालाच स्वास्थ्य लाभून पूर्ण आरोग्य प्राप्त होते. जगातील रोग्यांना अगदी योग्य तो औषधोपचार करू शकतो, म्हणून त्यालाच सौर भक्त म्हणतात.

१२) जी परा शक्ति सर्व जगाला चैतन्य देऊन स्वरूप प्रदर्शित करण्यायोग्य बनविते, सत्-चित्-आनंद हे जिचे स्वरूप आहे, ब्रह्मा-विष्णु-महेश देखील जिची आशा करतात, जी दयामय आहे, आपल्या सर्व अपत्त्यांवर जिची अपार कृपा होत असते, जिच्या साहाय्यावाचून ब्रह्मदेखील शवाप्रमाणे आहे, तिची भक्ति मातृऋणातून मुक्त होण्यासाठी सर्व जगाने करणे अवश्य आहे, अशी जगन्मातेची भक्ति जो करीत नाही,तो वस्तुत: फार मोठा दुर्भागी आहे, कारण ऐश्वर्य-भुक्ति-मुक्ति-ज्ञान-नि:श्रेयस इत्यादि फळे देणारी तीच आहे.

जो सर्व विषयापासून विरक्त, जितेंद्रिय, आप्तकाम, दीनांचा मित्र, कृपेची मूर्ति, बुद्धिबलात बृहस्पतीला देखील चकित करण्याचे सामर्थ्य ज्याच्याजवळ आहे, काम-क्रोध-मोह इत्यादि पशूंचा जो बळी देतो, अहिंसा इत्यादि फुलांनी जो श्रृंगार करतो, घृणा-लज्जा इत्यादि आठ पाशांपासून जो मुक्त आहे, श्री गुरूच्या चरणापासून निघालेल्या अमृताचे जो पान करतो, सुषुम्नेत असलेल्या कुंडलिनी शक्तीबरोबर जो रममाण होतो, वैदिक धर्म आणि वर्णाश्रम यांच्या विरोधी असलेल्याना गप्प करण्याचे सामर्थ्य ज्याच्याजवळ आहे,भगवद्भक्तांवर ज्याचे प्रेम आहे आणि त्यांची सेवा आणि रक्षण करणे हाच ज्याचा मुख्य उद्देश असतो, पाखंड आणि दंभ यांना आपल्या निपुण विचारशक्तीने निराश करून जो सद्धर्म आणि सदाचार पसरवितो, निषिद्ध कामनांचे मारण, लोभ-मोहांचे उच्चाटन, काम-क्रोधांचे विद्वेषण, आपत्तींचे स्तंभन, इंद्रियांचे वशीकरण आणि दैवी

गुणांचे मोहन अशा षट्कर्मांचे अनुष्ठान करण्यात जो सिद्धहस्त आहे, तोच खरा जगन्मातेचा उपासक, वीर पुरुष आणि शाक्त म्हणविण्यास पात्र आहे. तोच पुरुष अशा घोर कलियुगातही पतित दीन हीन लोकांना शुभ संदेश ऐकविण्यात कृतकार्य होऊ शकतो आणि मातेच्या समस्त कृपेला पात्र असा भक्त तोच असतो. " शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे । सर्वस्याऽर्तिहरे देवि नारायणि नमोऽस्तु ते ।।" (सप्तशती ११।१२)

१३) ज्या प्रमाणे सर्व नद्या वाहत वाहत समुद्राचे ठायी विश्रांति पावतात, त्याचप्रमाणे सर्व आश्रमातील लोक गृहस्थाच्या आश्रमातच सुख पावतात. गृहस्थ सर्वांचा पोषक आणि आधार आहे. जसा संन्यासाश्रम निवृत्तीमध्ये प्रधान मानला जातो, तसाच गृहस्थाश्रम प्रवृत्तीमध्ये सर्वांत मोठा आहे. 'तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही' या मनूच्या वचनाचा हाच अभिप्राय आहे. प्रवृत्ति योग्य मार्गावर ठेवण्यासाठी इतर तीन आश्रमांनी नेहमी गृहस्थाच्या हिताचे चिंतन केले पाहिजे.

नित्य नियमाने देव, अतिथि, ब्रह्म, पितृ आणि भूत हे पंच महायज्ञ करणारा, स्वाध्यायनिरत, ऋतुकालात स्वदारनिरत, अधिकारी जनांस दान देणारा, वेदमार्गांचा अनूसरणारा असा जो ईश्वराचा भक्त असतो, त्यालाच सद्गृहस्थ म्हणतात.

१४) जो कामिनी आणि कांचन यापासून विरक्त आहे, पूर्णपणे अहिंसेचे आचरण करतो, अभेदरूपाने जो ब्रह्माचे चिंतन करतो, वैराग्य-शील-क्षमा-दया- आर्जव इत्यादि गुणांनी संपन्न, गोड बोलणारा, जगाला सन्मार्गाचा उपदेश देणारा, नामरूपात आसक्ति नसलेला असा जो महात्मा असतो, त्यालाच संन्यासी म्हणतात.

१५) मनुष्याची कोणतीही साधना व योग-भक्ति-ज्ञान इत्यादि तेव्हाच सफल होतात की जेव्हा त्याला परमात्म्याची कृपा प्राप्त होते. म्हणून इतर सर्व गोष्टी सोडून तीच मिळविली पाहिजे. सदाचार हीच सर्वश्रेष्ठ वस्तू

आहे. त्याशिवाय बाहेरच्या आडंबराने कोणतेही फल मिळू शकत नाही. आपल्याला इतरानी केलेले अपकार विसरून जाणे हाच खरा महात्मेपणा जीवमात्रावर दया आणि सर्वांची नारायण-बुद्धीने सेवा हेच या जीवनातील सर्वात मोठे कर्तव्य आहे. कलह-ईर्ष्या-द्वेष यांचा त्याग हाच उत्तम त्याग लढाई-झगडा करण्याने नुकसानी खेरीज काहीच मिळत नाही.

ही विचाररूपी माळ ओढणाऱ्यांनी या शिखररूप सिद्धांतांचे उल्लंघन करू नये जे ही माला विचारपूर्वक धारण करून तिची सतत आवृत्ति करीत राहतील, त्यांच्य वर अंतर्यामी परमात्मा अवश्य कृपादृष्टि करील हे निश्चित.

ज्ञानयोगरत्नमणिग्रथन

उपासना ही एक मानसिक क्रिया आहे. तिच्या द्वारा मन पवित्र होते, तेव्हा विवेकशक्तीचा विकास होऊन साधक तत्त्वज्ञानाचा अधिकारी बनतो. उपासनेच्या नंतर तत्त्वज्ञान किंवा विचार संभवतो. म्हणून आता तत्त्वज्ञानाचा क्रम लागतो. या अवस्थेत अनेक मतभेद आहेत. तथापि या विषयी जसा स्वानुभव मिळाला, आणि शास्त्रांचे स्वरूप निष्पक्षपणे जसे समजले, तसेच या ठिकाणी स्वीकारले आहे. या अवस्थेत मतभेद असणे अनिवार्य आहे, परंतु त्याकडे लक्ष न देता विचारकानी त्यावर मनःपूर्वक चिंतन करावे. ही विचारपद्धति वाचकांचे निश्चित मनोरंजन करील अशी आम्हास पूर्ण आशा आहे.

१) जगाची उत्पत्ति, स्थिति, आणि लय या तीनही अवस्था परब्रह्माच्या पराशक्तीमुळेच होतात. पराशक्ति सच्चिदानंदरूप आहे. तिच्या इच्छेने उत्पत्ति, स्थिति, आणि लय या शक्ति आपापली कामे करतात. या तीनही शक्ति आणि इच्छाशक्ति पराशक्तीतूनच प्रकट होतात. इच्छाशक्तीलाच शिवसूत्रात 'इच्छाशक्ति उमा कुमारी' असे म्हटले आहे. तिलाच Will म्हणतात. सत्-शक्ति, चित्-शक्ति किंवा आनंद-शक्ति हीच अनेक रूपानी काम करीत आहे. आनंद शक्तिच मुमुक्षु,भक्त आणि ज्ञानी पुरुषांचा स्वीकार करते, तिलाच राधा, सीता, ललिता, षोडशी इत्यादि नावे उपासना मार्गात दिली गेली आहेत. जी कोणतीही वस्तु जगात बुद्धीला गम्य होते, ती सर्व शक्तिरूप आहे. शक्तीहून निराळे, अशक्त, असत्, मिथ्या आणि निरर्थक आहे. तिचे पूर्णत्वाने ज्ञान पुरुषबुद्धीला होणे शक्य नाही.

म्हणून असे म्हटले आहे की, या पराशक्तीच्या अतुल प्रभावाचे वर्णन ब्रह्मा, विष्णु, आणि महेश हे देखील करू शकत नाहीत. 'यस्याः

प्रभावमतुलं भगवाननन्तो ब्रह्मा हरश्च न हि वक्तुमलं बलं च'; कारण हे सगुण देव तिच्या आधीन आहेत. अनंत कल्याणगुणात्मक शक्ति ध्येयरूप आहे. या अवस्थेत शक्ति आणि शक्तिमान् असा भेद नाही. ज्याला आपण व्यवहारात पुरुष किंवा स्त्री म्हणतो, ती सर्व शक्तीची रूपांतरे आहेत. या विषयी आचार्यांचा असा निर्णय आहे की, ज्याला शैव शिव म्हणतात वैष्णव विष्णु म्हणतात,आणि वेदांती ब्रह्म म्हणतात, ते पराशक्तीचे प्रेरक अधिष्ठानात्मक रूपांतर आहे. म्हणून या सर्व मतांचे ऐक्य सिद्ध होऊन अभेद निष्पन्न होतो.

२) सर्व शक्तींचे अधिष्ठान म्हणजे सत्-शक्ति तीच आधारभूत आहे. आणि तिनेच सर्व जग स्थिर करून ठेवले आहे. जितकी म्हणून नियमित व्यवस्थात्मक कामे होतात, त्यांना कार्य-शक्ति तिच्यामुळेच मिळते. तिच्याच आश्रयाने अविद्याशक्ति राहते व स्थूल जगाला पांचभौतिक रूप देते. तीच स्थूल, सूक्ष्म,आणि कारण शरीरांच्या द्वारा आकाश,वायु,अग्नि, जल, आणि पृथ्वी अशी पंच महाभूते निर्माण करून व समष्टि-व्यष्टि-रूप दृश्यमान जगाची निर्मिती करून सर्व शक्ति आपापल्या कार्यक्षेत्रात व्याप्त करते. सच्छक्तीच्या द्वाराच ज्ञानशक्ति आणि आनंदशक्ति देखील व्यक्त होतात. म्हणून तिलाच आधारशक्तिरूप योगमाया,काली,किंवा स्थिरमाया म्हणतात. या तत्त्वांचा साक्षात्कारच साधकाला प्रथम अपेक्षित असतो. त्याखेरीज पुढील प्रगति शक्य नाही. सच्छक्तीच्या आत भासमान होणाऱ्या तत्त्वालाच काल म्हणतात. म्हणून स्थूल जगातील सर्व पदार्थ कालाच्या आधीन आहेत. मृत्युदेखील याचेच दुसरे रूप आहे, व तोच नियमन करीत असल्यामुळे त्याला यम म्हणतात. चिच्छक्तीच्या बरोबर ज्ञानात्मक शास्त्रे आणि सामान्यपणे सर्व जगत् ती व्यवहार-रूपात प्रकाशित करते. तिचा अविद्या-शक्तीशीं विरोध आहे. तिच्यामुळेच ब्रह्म व्यक्त होऊन अनेक प्रकारच्या लीला करते. तिच्यामुळेच अवतार होतात. जीव देखील चैतन्य शक्तीचेच दुसरे रूप आहे, पण ते अविद्या शक्तीच्या आधारावर व्यक्त होते. जीवाला आनंदशक्तीची अभिलाषा असते, परंतु अविद्येची स्थूलता आनंदाच्या सूक्ष्म रूपाला स्वतःत व्यक्त होऊ देत नाही. म्हणून विषयांच्या

द्वारा जे सुख मिळते किंवा जो आनंद मिळतो तो तिच्यात संलग्न राहतो, व अविद्येमध्ये मिश्रित रूपात असल्यामुळे जीवाला तो अशुद्ध रूपात स्वीकारावा लागतो. त्यामुळे जीव बंधन, क्लेश, जन्म, मरण, नरक, स्वर्ग, उत्कृष्ट-निकृष्ट योनि यातच फिरत राहतो, व त्याला आनंद सत्य रूपात मिळत नाही. याचे कारण अविद्येची आवरणशक्ति, की जिच्यामुळे खरा आनंद झाकलेला असतो. अविद्येला दूर करणारी ज्ञान-शक्ति किंवा विद्या हीच आहे. तिच्यामुळेच अविद्येची निवृत्ति आणि परमानंदाची प्राप्ति होते. ज्याप्रमाणे रज्जूवर कल्पिलेला सर्प व स्वप्नातील वस्तु रज्जूच्या ज्ञानाने आणि जागृतावस्थेतील विवेकाने निवृत्त होतात, त्याचप्रमाणे अविद्याशक्तिही विद्येने दूर होते. अशा प्रकारे दृष्टांतानी अद्वैत वेदांती स्पष्टीकरण करतात. ब्रह्मामध्ये ही विरोधी जुळे राहत नाहीत. विद्या आणि अविद्या या दोनही शक्तींना आपल्या अस्तित्वाला आधार म्हणजे ब्रह्मच. अशा रीतीने जीव अज्ञानातून सुटतो आणि यथार्थ आनंदाला पात्र बनतो. ब्रह्म आणि जीव यात स्वरूपत: भेद नसतोच.

३) जेव्हा ज्ञानाच्या शुद्ध अवस्थेचा जीवाला परिचय होतो, तेव्हा समस्त वासना आणि कर्मसमुदाय भस्म होऊन जातात. 'ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात् कुरुतेऽर्जुन' (गीता ४।३७) म्हणजे अर्जुना, ज्ञानरूपी अग्नि समस्त कर्मे भस्म करून टाकतो. अज्ञानाच्या ज्ञानाचा बोध झाल्या-वर शुद्ध ज्ञान प्राप्त होते व जीव कृतकृत्य आणि आनंदित होतो, इत्यादि संकेतांच्या द्वारा ही गोष्ट सांगितली जाते. अज्ञात अशी प्रकृतिच द्वैताची प्रतिपादक आहे–" द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्ष परिषस्व जाते। तयोरन्य: पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्योऽभिचाकशीति ।।" (ऋग्वेद १.१६४-२०) म्हणजे संसाररूपी वृक्षावर दोन पक्षी बसलेले आहेत, एक त्याच्या गोड फळाचा आस्वाद घेत आहे तर दुसरा फक्त साक्षीरूपाने त्याच्याकडे पहात आहे. दोनही पक्षी एकमेकांशी मिळून मिसळून मिश्र भावनेने या जगात आपआपला व्यवहार करीत आहेत. या कल्पनेवर जीव, ईश्वर आणि सृष्टि यांचे ज्ञान करून दिलेले आहे. यालाच द्वैत म्हणतात हे द्वैत स्थूल

व सूक्ष्म असे दोन प्रकारचे आहे, स्थूल द्वैताची निवृत्ति विद्येने होते, सूक्ष्म द्वैत आनंदशक्तीत आहे व ते अविद्यारहित असल्यामुळे शुद्ध आहे.

४) अविद्याशक्तीपासून मुक्त झाल्यावर जीव आनंदशक्तीच्या परिसरात निराबाधपणे पोहोचतो व तिच्या दिव्य लीलांना पात्र बनतो. वस्तुतः हा खेळ नित्य चालूच असतो, पण त्याचा लाभ फक्त भगवंताच्या साहाय्यानेच शक्य होतो. इथली शरीरे आनंदात्मक असतात. श्रीकृष्ण, राम, सदाशिव, पराशक्ति इत्यादि उपास्य देवता याच भावनेच्या मूल रूपाची अभिव्यक्ति करितात. ही दिव्य लीला शुद्ध आनंदमय असते. हा आनंद व्यक्त करणारी राधा व षोडशी अशा दोन शक्ति वैष्णव आणि शैव संप्रदायात मानलेल्या आहेत. त्यांनाच स्वरूपा शक्ति व ल्हादिनी शक्ति म्हणतात. त्यांच्या लीलांचे वर्णन श्रीमद्भागवत इत्यादि पुराणातून आणि काही तंत्र ग्रंथातून दिव्य लीला म्हणून केले आहे. जीव अविद्येतून सुटल्यावर आनंदमय शरीर घेऊन या लीला क्षेत्रात स्वच्छंदपणे फिरतो, परंतु अधिकार भावापासून दूरच राहतो, म्हणजे स्वतः ब्रह्म होत नाही. ज्या ज्ञानरूप उपाधीमुळे या लीलेत त्याचा प्रवेश होतो. त्यातच चैतन्यरूप आनंदाचा अनुभव घेणारा पृथक्पणे वसत असल्यामुळे तेथेच द्वैत असते. ते अज्ञानस्वरूप नसते, क्लेश इत्यादि निर्माण करणाऱ्या स्थूल द्वैताहून वेगळे असते, किंबहुना स्वरूपात्मकच असल्यामुळे त्यालाच अद्वैतही म्हणतात. जसे एकाच साखरेची अनेक खेळणी बनवावी. त्यांना घोडा, हत्ती इत्यादि नावें व आकृत्या वेगवेगळ्या असल्या तरी त्यांच्या स्वादात फरक पडत नाही, तसेच अद्वैताचे आहे. ही सृष्टि जल-तरंग किंवा मृत्तिका-घट याप्रमाणे अविरोधी आहे असाच उपासक आचार्यांचा विश्वास आहे. मायावादी अद्वैत सिद्धांतात अविद्यानिवृत्तीनंतर स्वान्मानुभव झाल्यावर कोणत्याहि विषयाची चर्चा होत नाही, कारण त्यानंतरच्या गोष्टी या भौतिक जगात कोणत्याहि प्रकारे व्यक्त करताच येत नाहीत. 'यतो वाचो निवर्तन्तेऽप्राप्य मनसा सह' ही श्रुति याच अवस्थेचे वर्णन करते. सांगण्यासारखे साधनही कोणतेच शिल्लक राहिलेले नसते.

केवळ बाधितानुवृत्तीने जीवन्मुक्ताचे लौकिक व्यवहार चालू राहतात, तथापि ते फक्त दिसण्यापुरतेच असतात. शरीराचा निर्वाह यापेक्षा त्यांचा दुसरा कोणताही उपयोग नसतो. यालाच 'प्रारब्ध' म्हणतात. पुराणामध्ये या प्रकारे आनंदोल्लासाचे जे वर्णन आढळते, ते शाखा-चंद्र न्यायानेच येते, ते संकेत मात्र म्हणूनच समजावे, इत्यादि सांगतात. ही लीला कधीतरी थांबेल अशी कल्पना करता येत नाही, कारण श्रमजन्य क्लेश तिच्यात नसतो. जेथे तो असतो, तेथे उपरति होते. म्हणून उपासकांचा येथेच थांबण्याचा विचार नसतो. आधुनिक संत व भक्त यांनी या भावाचे पदे, भजने यांच्या द्वारा वाणीने उत्तम वर्णन केले आहे. जरी अद्वैतवादी आचार्यांनी असे वर्णन केले नाही, तरी उपासकांच्या या लीलावर्णनाला विरोधही केलेला नाही. शंकराचार्याच्या भक्तिप्रतिपादक स्तोत्रातून उलट त्याचे समर्थनच होते. सौंदर्यलहरी, षट्पदी इत्यादि स्तोत्रे यांचे प्रमाण आहे. प्राचीन साधक आचार्यांचं असेही एक मत गर्भित रूपात आहे की, हा सिद्धांत प्रकट न करणे व ज्ञानच फक्त प्रकट करणे योग्य आहे. असे वाटते की याच हेतूने आचार्यांनी हे गुप्त राखून ज्ञान प्रकटपणे सांगितले, कारण पूर्ण अधिकारी, जितेंद्रिय, आप्तकाम पुरुषच या वर्णनाला अधिकारी असतात, नाहीतर त्यामुळे हानिदेखील होऊ शकते.

५) अनुभवाच्या आधाराने शक्तीची दोन रूपे मानली आहेत– कार्यरूप आणि कारणरूप. दिव्य लीला आनंदशक्तीचे कार्य होत. असेच सच्छक्ति आणि चिच्छक्ति यांच्याही विषयी आहे. त्या जेव्हा कारणरूपात राहतात तेव्हा त्यांनाच ब्रह्म म्हणतात,कारण परा शक्ति आणि ब्रह्म यात भेद नाही. त्याच अवस्थेला निराकार व मन-वाणी याना अगोचर असे म्हटले आहे. आनंदशक्तीच्या उद्रेकातून लीलाभाव व्यक्त होतो. उद्रेक कार्यात्मक असतो, म्हणून निराकार अवस्थेत लीला नसते. कार्य आणि कारण एकच असल्यामुळे तिचा पूर्ण अभाव आहे असेही नाही. कार्य आणि कारण यात भेद आविर्भावाच्याच कारणाने आहे. या विषयी भगवंताची इच्छा हीच मुख्य असते, कारण आविर्भाव व तिरोभाव त्याच्याच इच्छेने होतात. लीला करणे किंवा त्यापासून थांबणे हे केवळ

भगवंताच्या इच्छेवर अवलंबून आहे. या विषयासंबंधाने वेदांत्यांचे असे म्हणणे आहे की, ब्रह्माच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे परिणाम (म्हणजे बदल) संभवत नाही. परिणाम होतो तो अविद्ये किंवा मायेचाच, जसे रज्जू मध्ये सापाचा बदल. रज्जूच्या आश्रयाने राहिलेल्या अविद्येचा तो परिणाम आहे. रज्जु विकाररुप परिणामापासून सर्वथा मुक्त आहे, कारण अवस्थांतरांची प्राप्ति म्हणजे परिणाम, तो रज्जूमध्ये नाही. उपनिषदांतून सुवर्ण, मृत्तिका इत्यादि जे दृष्टांत दिले गेले आहेत, त्यांचा अभिप्रोय केवल ब्रह्म उपादान आणि निमित्त कारण देखील आहे हे सांगण्याचा आहे. ब्रह्माचा परिणाम म्हणजे जगत् असे त्यांना म्हणावयाचे नाही, कारण चैतन्यस्वरूप ब्रह्माच्या परिणामाला कोणताही दृष्टांत नाही. या विषयात असे सांगितले जाते की, रज्जुसर्पाच्या कल्पनेमध्ये कोणता तरी दोष कारणीभूत असतो, म्हणून तो मायिक परिणाम झाला; परंतु ब्रह्माच्या लीलात्मक परिणामामध्ये कारणीभूत असा कोणताही दोष नसतो, म्हणून लीलारूप अविकृत परिणाम होऊ शकतो. रज्जुसर्प इत्यादि दृष्टांत वेदात. नाहीत 'प्रवर्तनालक्षणा दोषाः' या न्यायसूत्रावरून समजते को, प्रवृत्तीमध्ये दोषच कारणीभूत असतो, तथापि आनंद वगैरेचेही परिणाम असतात याला कोणतेही प्रमाण नाही. 'आनंदादयः प्रधानस्य' (३।३।११) या व्याससूत्रात अविकृत रूपातच आनंद इत्यादि सांगितले आहेत, त्याला परिणाम म्हणणे बरोबर वाटत नाही. रज्जुसर्पाचा दृष्टांतदेखील वैदिक आहे असे म्हणणे बरोबर नाही; कारण दृष्टांत शास्त्रांच्या अपेक्षेने नव्हे तर वादी-प्रतिवादी यांना अभिमत असेल तरच येऊ शकतो, त्या बाबतीत शास्त्राला अपेक्षा नाही परंतु स्वप्नाचा दृष्टांत बृहदारण्यक उपनिषदामध्ये दिलेला आहे. 'संध्ये सृष्टिराह हि' (३।२।१) या व्याससूत्रात हेच सांगितले आहे. प्रतिभाषिक रूपात रज्जु-सर्प आणि स्वप्न दोनही सारखेच आहेत, म्हणून जग हे मायेचा परिणाम व ब्रह्माचा विवर्त आहे. ब्रह्माच्या अविकृत परिणामत्वाचे समर्थन 'तदात्मानं स्वयमकुत' इत्यादि वचनानी झालेच आहे, तथापि या विषयी दृष्टांत सिद्ध नाही.

६) सत्, ज्ञान, आनंद या तीनही स्वरूपाच्या शक्तीचे आपआपले स्वतंत्र क्षेत्र आहे. त्यामध्ये त्या मुख्य रूपाने आपआपले काम करीत असतात.

त्यांच्यात आपआपसात सहकार्य असते. त्या तीनही शक्ति एकत्र आल्याशिवाय कोणतेच कार्य होऊ शकत नाही. कार्य होत असतांना एक प्रधान व अन्य शक्ति गौण असतात. आनंदाच्या क्षेत्रात सत् आणि ज्ञान गौण असते, तसेच सताच्या क्षेत्रात आनंद व ज्ञान गौण असतात, आणि ज्ञानाच्या क्षेत्रातून सत् व आनंद यांना गौणच असते, वेदांताच्या ग्रंथातून माया मिथ्या आहे असे सांगितले जाते, ते अविद्येच्या विषयापुरते आहे,सच्चिदानंद रूप शक्तीच्या विषयात नाही, कारण ती निराबाध आहे.

७) जेव्हा ब्रह्म शक्तिरूपात असते, तेव्हा त्याला सगुण म्हणतात. ते स्पष्ट रूपाने या स्थूल जगात अभिव्यक्त होते. ते सद्रूपातून जडरूपात आणि कर्ममार्गातील प्रतिपादनाचा विषय बनते. चिद्रूपातून चेतन जीव आणि ज्ञानमार्ग यांचा विस्तार होतो. तसेच आनंद रूपातून दिव्य भोग असलेल्या लोकांचा आणि उपासना किंवा भक्तिमार्गाचा विस्तार होतो. या तीनही अवस्थांचे वर्णन भक्तिमार्गाचे आचार्य आणि वेदांताचे आचार्य देखील करीत असतात. वेदांतात पंचदशी ग्रंथाच्या पंधरा प्रकरणांचे पांच-पाचाच्या गटानी सत्, चित् व आनंद यांच्या प्रतिपादनातच पर्यवसान झाले आहे. फरक इतकाच की भक्तिमार्गी त्याचे सूक्ष्म आकार मानतात, तर वेदांती सच्चिदानंदाला निराकार मानतात.

८) कर्म, ज्ञान आणि भक्ति या साधनांच्या द्वारा अधिकार प्राप्त झाल्यावर, गौण असो की प्रधान, मिळवावयाचे ते ब्रह्मच. म्हणून सिद्धांतामध्ये त्यांच्यात विरोध नाही. तीनही साधनांचे अनुयायी शुद्धत्वाने त्यांचे आचरण करून एकच उद्दिष्ट प्राप्त करतात यांच अभिप्रायाने श्रीमद्भगवद गीतेत उपदेश केलेला आहे. सांप्रदायिक आचार्यानी एकेका अधिकाऱ्याच्या अपेक्षेने उपदेश केलेला आहे. समन्वयाच्या दृष्टिकोणातून त्यांच्यात संगति लागते. आपल्यापेक्षा भिन्न मतांचे खंडन त्या त्या विशेष अधिकाऱ्यांची श्रद्धा वाढविण्यासाठी आहे, वास्तविक रूपात नाही. अशा प्रकारे आर्य धर्मातील विरोध काढून टाकता येतो हीच व्यवस्था द्वैत-अद्वैताच्या विषयात देखील आहे. किंबहुना, जगातील सर्व मतांमध्ये सत्यांशाने एकत्वच आहे. फक्त देश-कालाच्या अवस्थातून भेद दिसतो

९) अविद्येच्या स्थितीतून नित्य चेतन स्वरूप असलेला जीव निर्माण होऊनही मृत्यूच्या पाशात अडकल्यावर स्वतःचे सुखदुःख जन्म-मरण मानू लागतो. हे धर्म खरे म्हणजे व्यष्टिरूप अविद्येचे आहेत, परंतु जीव ते स्वतःमध्ये मानतो. 'अहं ब्रह्मास्मि, 'तत्त्वमसि' इत्यादि महा-वाक्यांच्या उपदेशाने शुद्ध चेतनस्वरूप साक्षीभूत आत्म्याचे ज्ञान जेव्हा त्याला होते, तेव्हा त्याची अविद्या निवृत्त होते. हे कार्य योग आणि उपासना यानी होऊ शकत नाही. योग आणि उपासना यांनी हृदय शुद्ध बनते व ज्ञानप्राप्तीची योग्यता प्राप्त होते. जो ज्याचा आश्रित असतो, तो त्याचा निवर्तक होऊ शकत नाही. चंद्र रात्रीवर अवलंबून असतो, तो रात्रीचा विनाश करू शकत नाही. रात्रीचा विनाश सूर्यच करू शकतो. त्याचप्रमाणे कर्म आणि उपासना अविद्या घालवू शकत नाहीत. त्यामुळे फक्त मल, विक्षेप इत्यादि दोष दूर होतात, अविद्येचे आवरण अभेद ज्ञानानेच बाजूला होते. म्हणूनच म्हटले आहे, 'ऋते ज्ञानान्न मुक्तिः' म्हणजे ज्ञाना शिवाय मोक्ष नाही.

१०) ज्याप्रमाणे अग्नीचे दाहकत्व व प्रकाशरूपत्व हे गुण लाकडातच व्यक्त होतात, पाण्यात फक्त दाहकत्वालाच अवसर मिळतो, प्रकाशाला मिळत नाही, त्याचप्रमाणे आनंदरूप अंशाची अभिव्यक्ति जीवाचे ठिकाणी होत नाही, अविद्येतील मलिन झालेला सत्त्वांश आणि तिचे कार्य हे त्यासाठी कारणीभूत होत. अविद्यारूप मायेचे दोन अंश आहेत–समष्टि (Universal) आणि व्यष्टि (Individual) त्यानाच वैश्विक आणि वैयक्तिक म्हणतात. मलिन सत्त्व असणाऱ्या अविद्येमध्ये जी शक्ति प्रकट होते तिला जीव म्हणतात, तसेच समष्टीमध्ये जी चैतन्यशक्ति व्यक्त होते तिला ईश्वर म्हणतात. जसा ईश्वर एक आहे, तसाच जीवही एकच आहे, परंतु त्याच्या उपाधि अनेक असल्यामुळे तो अनेकरूप आहे असे म्हणतात. ईश्वराला एकच उपाधि असते, ती म्हणजे विद्या. व्यष्टि अविद्येमुळेच कारण, सूक्ष्म आणि स्थूल ही तीन शरीरे धारण करते. या तीन शरीरांशी संबंध आल्यावर जीवाला प्राज्ञ, तैजस आणि विश्व म्हणतात. समष्टीमध्ये परमात्म्याची जी चैतन्यशक्ति व्यक्त होते तिला

अंतर्यामी, हिरण्यगर्भ आणि विराट् म्हणतात,ईश्वर आणि जीव ही दोनहि चैतन्यशक्तीचीच दुसरी नावे आहेत. मायेच्या द्विविध परिणामामुळे हे भेद झाले आहेत. या दोनही कल्पना परा शक्तीचा फक्त एक भाग आहेत. 'विष्टभ्याऽहमिदं कृत्स्वमेकांशेन स्थितो जगत्' (गीता १०।४२) 'पादो हि सर्वा भूतानी' इत्यादि वचनांमधून हेच सांगितले आहे. मायाभावाचे शोधन झाल्यानंतर मग शुद्ध चैतन्याचा परिचय होतो त्यालाच अद्वैत म्हणतात. 'अहं ब्रह्माऽस्मि' इत्यादि वाक्यानी हीच गोष्ट सांगितली आहे, निरपेक्ष भाव म्हणजेच शुद्ध ब्रह्म, तुरीय त्यालाच माण्डूक्योपनिषदात शिव म्हटले आहे. वस्तुतः हे ब्रह्मच मायेमध्ये अधिष्ठित होऊन अनेक प्रकारची लीला करीत असते. पण ते स्वतः मायेच्या गुणानी सर्वथा रहित असते, तेच या जगाचे निमित्त कारण (कर्त्ता) आणि उपादान कारणही सामग्री आहे. प्रकृति जगाचे कारण आहे, पण ब्रह्माच्या आधीन राहून, स्वतंत्रपणे नव्हे. म्हणून ब्रह्मालाच उपादान (मूल) कारण देखील म्हणतात. या विषयावर (स्वतंत्र-प्रकृति-वादी) सांख्य आणि ब्रह्मवादी वेदांती यामध्ये अशा प्रकारे संवाद होतो.

सांख्य–ब्रह्म चेतन असल्यामुळे निमित्त आणि उपादान कारण होऊ शकत नाही.

वेदांती–प्रकृति देखील जड असल्यामुळे स्वतःहून कारण असणे शक्य नाही.

सांख्य–प्रकृतीला चेतनयुक्त रूपात जगाचे कारण मानणे शक्य आहे. चेतनयुक्त स्थितीत प्रकृतीकडून जगद्रचना होऊ शकते.

वेदांती–चेतनालाही प्रकृतियुक्त मानले तर जगद्रचनेचे कारण मानता येते.

सांख्य–जडाशिवाय चेतनाकडून स्वतंत्रपणे कार्य घडलेले पाहण्यात नाही. जडाच्या साहाय्यानेच चेतनाचे कर्तृत्व दिसते, आणि कार्य करण्याची योग्यता चेतनात जडाच्या सहाय्यानेच येते; म्हणून प्रकृतीलाच कारण मानणे उचित आहे.

वेदांती–चेतनाच्या मनात जर क्रिया करण्याचे नसेल, तर चेतनाचा संयोग असूनहि कार्य होऊ शकत नाही, उदाहरणार्थ–ड्रायव्हर गाडीवर बसलेलाही असेल पण त्याची जर गाडी चालविण्याची इच्छा नसेल तर गाडी चालू शकणार नाही. ब्रह्माच्या चेतनशक्तीनेच जगात क्रिया घडते आणि ती त्याच्या इच्छेनेच होत आहे. अग्नीचा दाहगुण व प्रकाशगुण लाकडातच आपले सामर्थ्य प्रकट करतो; ते दोनही गुण अग्नीचेच असतात, लाकडाचे नव्हेत. त्याचप्रमाणे जगात जो नियामक रूपाने व्यवहार चालू आहे तो ब्रह्माचाच आहे, प्रकृतीचा असू शकत नाही. म्हणून प्रकृतीकडे निमित्त कारणरूप कर्तृत्व देणे योग्य नाही.

सांख्य–परंतु ब्रह्म तर उपादान कारण कोणत्याही प्रकारे होऊ शकत नाही, कारण जड जगताचे उपादान कारण जडच असणार. ते अनुभवाच्या विरुद्धही आहे, कारण जडाचे उपादान कारण म्हणून चेतन व्यवहारात प्रसिद्ध नाही. जड उपादानातूनच जड कार्य उत्पन्न होते. नाही तर ब्रह्म विकारयुक्त होईल.

वेदांती- प्रकृतीलाही आपण नित्य मानत असतानाच परिणामी मानतोच. जो विकारयुक्त असतो, तो नित्य असू शकत नाही. या नियमाप्रमाणे हा दोष आपल्याकडेही येतो. आमच्या मताप्रमाणे माया सत्य नाही, मायेची जी सत्ता ती ब्रह्माचीच सत्ता आहे; म्हणुन द्वैताचा बाध 'सर्वं खल्विदं ब्रह्म', 'वासुदेवः सर्वम्' इत्यादि प्रमाणांची समानाधिकरणाने संगति लावून अभिन्न निमित्तोपादान कारण ब्रह्मच सिद्ध होते. म्हणजे प्रकृति मूलतः ब्रह्मापासून वेगळी नसल्यामुळे अभिन्न निमित्तोपादान कारण ब्रह्मच आहे. खुद्द ब्रह्मात परिणाम न झाला तरी प्रकृतीमध्ये परिणाम होऊ शकतो, उदाहरणार्थ–दोरीचा साप होणे, स्वप्नात निर-निराळ्या वस्तु दिसणे, गारुड्याच्या खेळातील पदार्थ इत्यादि. अंधारात

---

* सूर्यकिरणानी वाळवंटातील निर्माण होणाऱ्या जलाभासाबद्दल आपण ही सर्व वाळूच आहे असे म्हणू शकतो. त्याचप्रमाणे जगाबद्दलही सर्वत्र ब्रह्मच आहे असे म्हणणे शक्य आहे. अधिष्ठानाचे ज्ञान झाल्यावर असे होणारच.

दोरी ओळखू न आल्यामुळे (साप वाटतो), निद्रादोष किंवा नजरबंदी यामुळे अधिष्ठानरूप दोरीत काहीही फरक न होता (साप वगैरे) प्रातीतिक वस्तूंची निर्मिति होते. जगही असेच निर्माण झालेले आहे. ब्रह्माचे ज्ञान झाले म्हणजे जग खोटे आहे हे समजते. कोळ्याच्या रूपाने * आपल्याला उदाहरणही मिळते.

सांख्य-मग तर जगाचे कारण म्हणून प्रकृति सृष्टीच्या आरंभी देखील असणार. म्हणजे द्वैत सिद्ध झाले.

वेदांती-आम्ही प्रथमच सांगितले की प्रकृति सत्य नाही. जर ब्रह्मा पेक्षा वेगळ्या रीतीने सत्ता असती तर द्वैत सिद्ध झाले असते. परंतु ब्रह्माच्या सत्तेने प्रकृतीला सत्ता मिळालेली आहे, म्हणून द्वैत नाही.

सांख्य-तरी देखील कोणत्या तरी स्वरूपात प्रकृति अस्तित्वात असल्यामुळे द्वैत सिद्ध होतेच.

वेदांती-या रीतीने द्वैत सिद्ध होत असेल तर वाळवंटात मृगतृष्णेने तहान जावयास हवी, आणि खेळ चालू असताना जादूगाराच्या वस्तु देखील सत्य ठराव्या.

सांख्य-मग प्रकृतिवादात काहीच तथ्य नाही का ?

वेदांती-असे नाही. प्रकृतिवाद आम्हीही मानतो, पण निरपेक्षपणे प्रकृतीची कारणता जमत नाही. 'मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् (गीता९।१०) म्हणजे माझ्या साक्षीनेच प्रकृति चराचर जग उत्पन्न करते, या गीतावचनाला आपला सिद्धांत विरुद्ध जातो, आणि आताच सांगितलेल्या युक्तिवादाने देखील तो बरोबर वाटत 'नाही. म्हणून ब्रह्मवादच मानणे अवश्य आहे.

---

* ज्याप्रमाणे कोळ्याला जाळे निर्माण करण्यात आपल्या शरीराशिवाय दुसऱ्या वेगळ्या कारणाची आवश्यकता नसते,पण कुंभाराला आपल्यापेक्षा भिन्न अशा घटाच्या निर्माण कार्यात मातीची आवश्यकता असते. कुंभार घटाच्या बाबतीत फक्त निमित्त असतो, परंतु कोळी निमित्त व उपादान दोनही असतो.

सांख्य–प्रकृतीला ईश्वराच्या आधीन मानून भिन्न समजण्यात काय दोष आहे ? ज्याप्रमाणे राजा आणि प्रजा भिन्न राहून त्यांच्यात संबंध असतो. त्याप्रमाणे मानले तर प्रकृतिवाद दुसऱ्या प्रकारे सिद्ध होईल.

वेदांती–उपनिषदात प्रकृतीला परमात्म्याची शक्ति म्हटलेले आहे. (श्वेताताश्वर६।८)

"पराऽस्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च" म्हणजे परमात्म्याची परा शक्ति स्वभावतःच ज्ञानबलक्रियायुक्त आहे. शक्ति आणि शक्तिमान यांच्यात भेद नसतो. "मायां तु प्रकृतिं विद्यात् मायिनं तु महेश्वरम्" प्रकृति ही परमात्म्याची मायाशक्ति आहे. महेश्वर हाच प्रधान असलेल्या मायेचा स्वामी आहे.'शक्तिशक्तिमतोरभेदः' शक्ति व शक्तिमान् यात अभेद असतो. इत्यादि प्रमाणभूत वचनांना तुम्ही म्हणता तशा प्रकारचा प्रकृतिवाद विरुद्ध जाईल. प्रमाणभूत शास्त्रवचनाच्या विरोधी असणे ही देखील एक प्रकारे हानिच आहे. जे प्रकृतिकार्य नाम-रूपानी कारणाहून पृथक्पणे प्रतीत होते, त्यालाच मिथ्या म्हणतात. वस्तुतः तेही ब्रह्मच आहे. जर प्रकृतीला पृथक् मानले तर ब्रह्म आणि प्रकृति यात भेद होऊन परिच्छिन्नत्व,अल्पत्व,आणि विनाशित्व प्राप्त होईल. भेदात या गोष्टी आवश्यक आहेत,जसे घट व पट अभेद मानला तर काहीच दोष राहत नाही. म्हणून अद्वैत ब्रह्मवाद सिद्ध होतो. थोडक्यात ब्रह्म-वादाचा हा निष्कर्ष आहे. या सिद्धांतात भेद किंवा द्वैत काल्पनिक आहे.

११) विवेक, वैराग्य, षट्संपत्ति आणि मुमुक्षुता या चार साधनांनी युक्त होऊन श्रवण, मनन, निदिध्यासन सिद्ध केले म्हणजे 'अहं ब्रह्माऽस्मि' इत्यादि महावाक्यांच्या द्वारा अद्वैताचा साक्षात्कार होतो. ही साधने ज्ञान-मार्गाने जाणाऱ्या साधकांना अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले आहे. १) परमात्माच फक्त सत्य आहे, त्यापेक्षा निराळे ते सर्व असत्य आहे, हा जो निर्णय त्याला विवेक म्हणतात. २) भोगबुद्धीचा सर्वथा त्याग म्हणजे वैराग्य. ३) षट्संपत्तीमध्ये पहिला शाम म्हणजे मनाचा निग्रह, दुसरा दम म्हणजे बाह्य इंद्रियांचा निग्रह, तिसरी उपरति म्हणजे भोगापासून

परावृत्त होणे, चौथी तितिक्षा म्हणजे द्वंद्व सहन करणे, पाचवी श्रद्धा म्हणजे गुरु व वेदांत वाक्ये यावर विश्वास,आणि सहावे समाधान म्हणजे मनातील विक्षेपांचा नाश. ४) मुमुक्षुता म्हणजे मोक्ष मिळविण्याची इच्छा. अध्यात्म शास्त्रांचा अभिप्राय एकाच ब्रह्माच्या सिद्धीचा आहे. श्रवण म्हणजे हा सिद्धांत गुरू कडून ऐकणे,मनन म्हणजे श्रवण केलेल्या अर्थाची तर्कद्वार निश्चिति, आणि श्रवण व मनन यांनी समजलेल्या सिद्धांतावर मन स्थिर करणे म्हणजे निदिध्यासन. "आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः" (बृहदारण्यक २।४।५) या श्रुतीने हा अर्थ सांगितला आहे. 'शान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः' इत्यादि श्रुतीमध्ये साधनचतुष्टय सांगितले आहे. त्यानंतर ज्ञानयोग्याला अद्वैताचा साक्षात्कार होतो. ही ज्ञानाची बहिरंग साधने होत. महावाक्यांना अंतरंग साधने म्हणतात. ज्ञान झाल्यावर संचित व क्रियमाण कर्मे नष्ट होतात. फक्त प्रारब्ध कर्म शिल्लक रांहते. ते भोगद्वारा समाप्त झाले म्हणजे ज्ञानी पुरुष शरीर गेल्यानंतर मुक्त होतो. त्यालाच विदेह कैवल्य म्हणतात.

१२) पुष्कळसे आचार्य वेदांताबरोबरच वैराग्य, भक्ति आणि कर्म यांचाही प्रधानत्वाने संबंध प्रतिपादन करतात. ते म्हणतात 'सर्वःस्वार्थं समीहते' म्हणजे सगळचा जगाला आपला मतलब हवा असतो; म्हणून जोपर्यंत जगात स्वार्थ राहील तोपर्यंत जग तुम्हाला साथ देईल. ज्या दिवशी स्वार्थ राहणार नाही त्या दिवशी तुम्हाला कोणीही साथ देणार नाही. यासाठी जगाच्या मिथ्यात्वाचे भान ठेवून व्यवहार करणाऱ्याला पश्चात्ताप होत नाही. याच कारणाने तत्त्वज्ञानाबरोबरच मुख्यत्वाने वैराग्य आणि भक्ति यांचाही उपदेश महात्म्यानी केलेला आहे. हेतु हा की हे रहस्य मनुष्याच्या स्मरणात निरंतर रहावे. 'वयसि गते कः कामविकारः शुष्के नीरे कः कासारः, क्षीणे वित्ते कः परिवारः, ज्ञाने तत्त्वे कःसंसारः' म्हणजे वय निघून गेल्यावर कामविकाराचा काय उपयोग ? पाणी आटून गेल्यावर तळे कसे राहणार ? धन संपूर्ण गेल्यावर परिवार उपयोगी पडेल नाही, त्याच प्रमाणे ब्रह्मज्ञान झाल्यावर जगही शिल्लक राहत नाही.

(स्वामी शंकराचार्य)

राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामी जी महाराज द्वारा रचित एवं श्री पीताम्बरा पीठ संस्कृत परिषद् दतिया द्वारा प्रकाशित ग्रन्थ

क्र.	नाम पुस्तक	लेखक /टीकाकार	माध्यम	मूल्य
१.	श्री बगलामुखी रहस्यम्	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज पीताम्बरा-पीठ	संस्कृत	१८-००
२.	पञ्चोपनिषद् (प्रकाश भाष्य)	,, ,, ,,	,,	४-५०
३.	प्रश्नोपनिषद् (प्रकाश भाष्य)	,, ,, ,,	,,	१-००
४.	आनन्दलहरी शङ्कराचार्य	श्री रामकवि डिण्डिम भाष्य एवं गोपाल सुन्दरी टीका	,,	७-००
५.	नारदीय शिक्षा नारदमुनि विरचित	भट्ट शोभाकर विरचित शिक्षा विवरणोपेता टीकासहित	,,	१-५०
६.	श्री महात्रिपुरसुन्दरी पूजा पद्धति	राष्ट्रगुरु पूज्यपाद १००८ श्री स्वामीजी महाराज	,,	५-००
७.	कामकला विलास	पुण्यानन्दनाथ	,,	५-००
८.	महाविद्याचतुष्टयम् (तारा-धूमावती, भुवनेश्वरी-मातङ्गी)	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	,,	८-००
९.	रेणुका-तंत्रम्	,, ,, ,,	,,	६-००
१०.	शरभ-तंत्रम्	,, ,, ,,	,,	५-००
११.	श्रीविद्यारत्नसूत्रम् गौडपादाचार्य कृत	श्री शंकराण्यमुनिकृत दीपिका सहितं	,,	३-००

क्र.	नाम पुस्तक	लेखक/टीकाकार	माध्यम	मूल्य
१२.	पञ्चस्तवी	श्री शंकराण्यमुनिकृत दीपिका सहितं	संस्कृत	०–५०
१३.	तांत्रिक–पञ्चांग	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	,,	७–००
१४.	घेरण्ड संहिता–घेरण्ड मुनि	,, ,, ,,	संस्कृत-हिन्दी	५–००
१५.	प्रत्यभिज्ञाहृदयम् शाक्त दर्शन		हिन्दी	२–००
१६.	ईश्वर गीता कूर्मपुराणान्तर्गत	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	हिन्दी	६–००
१७.	वैदिक–उपदेश	,, ,, ,,	,,	५–००
१८.	वैदिक–उपदेश	अनु. श्री जी. एन. पिंगले	अंग्रेजी	१५–००
१९.	अथर्ववेदाङ्ग ज्योतिष	अनु. पं. छोटेलाल शर्मा आचार्य पं. ओं. नारायण द्विवेदी	हिन्दी	१–००
२०.	पुरश्चरण पद्धति	स्व. योगीन्द्रकृष्ण दौर्गादत्ति शास्त्री	,,	२–५०
२१.	लेख–संग्रह	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	,,	१२–००
२२.	वेदान्त प्रबोध सत्यबोधाश्रम प्रणीत	अनु. डा. शिवशरण शर्मा	संस्कृत-हिन्दी	२–००
२३.	सिद्धान्त रहस्य	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	हिन्दी	३–००
२४.	सिद्धान्त रहस्य	अनु. श्री शिवदत्त शर्मा चतुर्वेदी	संस्कृत	५–००
२५.	सिद्धान्त रहस्य	अनु. सी. डी. पाण्डे	अंग्रेजी	६–००
	सिद्धान्त रहस्य	अनु. डा. अयाचित	मराठी	५–००
२६.	सौंदर्य लहरी पद्यानुवाद	अनु. स्व. फौजदार बलवीरसिंह	पद्य हिन्दी	१–००
२७.	परश्चरण	श्री सूर्यप्रकाश गोस्वामी	पद्य	१–००
२८.	त्रिपुरा महिम्न स्तोत्र	स्व. योगीन्द्र कृष्णदौर्गादत्ति शास्त्री	संस्कृत-हिन्दी	३–००
२९.	चिद्–विलास (श्री विद्या रहस्य)	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	,,	१–५०

क्र.	नाम पुस्तक	लेखक /टीकाकार	माध्यम	मूल्य
३०.	चिद्–विलास	अनु. डा. योगेश मिश्र	अंग्रेजी	३–००
			सजिल्द	७–००
३१.	सप्तविंशति रहस्यम्	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज	संस्कृत	७–००
३२.	वातुलनाथ सूत्र अनन्तशक्तिपादकृत	पं. कृष्णानन्द बुधौलिया	संस्कृत-हिन्दी	२–००
३३.	शिवसूत्रं–भक्तिसूत्रञ्च	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी महाराज ऋज्वर्थ बोधिनी कृति	संस्कृत	१–००
३४.	शिवसूत्रं स्पंदकारिका	किशोरीलाल चउदा	संस्कृत-हिन्दी	१–५०
३५.	मातृका चक्र विवेक	ले. सिद्धश्री स्वतन्त्रानन्दनाथ भाष्य–शिवानन्द अनु. कृष्णानन्द बुधौलिया	संस्कृत-हिन्दी	१५–००
३६.	स्वरोदय विज्ञान	संकलनकर्ता मास्टर मोतीलाल	हिन्दी	३–००
३७.	योग विज्ञान प्रथम भाग	अज्ञात	,,	१६–००
३८.	योग विज्ञान द्वितीय भाग	अज्ञात	हिन्दी	४–००
३९.	योग–दर्शन महर्षि पातञ्जलि प्रणीत	अनन्तपण्डितकृत वृति	संस्कृत	२–५०
४०.	योग दर्शन महर्षि पातञ्जलि प्रणीत	अनु. डा. योगेश मिश्र	अंग्रेजी	४–००
४१.	छिन्नमस्ता नित्यार्चन	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी	हिन्दी	६–००
४२.	ताराकर्पूरराजस्तोत्र	,, ,, ,,	हिन्दी-पद्य	१–५०
४३.	केनोपनिषद्	अनु. डा. योगेश मिश्र, जयपुर	हिन्दी	२–००
४४.	ईशावास्योपनिषद्	,, ,, ,,	,,	३–५०
४५.	माण्डूक्योपनिषद्	टीकाकार–पं. कृष्णानन्द बुधौलिया	,,	१–७५
४६.	कठोपनिषद्	टीकाकार–बदनसिंह	,,	५–५०
४७.	मुण्डकोपनिषद्	,, ,,	,,	६–००

क्र.	नाम पुस्तक	लेखक /टीकाकार	माध्यम	मूल्य
४८.	पराप्रवेशिका महामाहेश्वराचार्य क्षेमराज विरचित	टीकाकार–पं. कृष्णानन्द बुधौलिया	हिन्दी पद्या-नुवाद एवं टीका	०–७५
४९.	शाक्त सौरभ	ले. श्री बदनसिंह	हिन्दी	७–००
५०.	शाक्त सौरभ (ज्ञान खण्ड)	,, ,,	,,	१२–००
५१.	ललिता सहस्रनाम	भास्कर राय विरचित सौभाग्यभास्कर अनु. कृष्णानन्द बुधौलिया	संस्कृत	३२–००
५२.	भैरव–विज्ञान	पं. कृष्णानन्द बुधौलिया	हिन्दी	९–००
५३.	प्रश्नोपनिषद्	हिन्दी अनुवाद अनुवादक–कृष्णानन्द बुधौलिया		५–००
५४.	बट्टवृचोपनिषद्	अप्पय दीक्षित कृत संस्कृत भाष्य एवं कृष्णानन्द कृत हिन्दी टीका	संस्कृत-हिन्दी	१–००
५५.	दर्शन शास्त्र संग्रह	राष्ट्रगुरु १००८ श्री स्वामीजी	हिन्दी	५–००
५६.	तीर्थभारतम्	डॉ. श्री. भा. वर्णेकर	संस्कृत	२०–००
५७.	भगवान बटुक भैरव	संकलनकर्ता राधारमण दूबार	संस्कृत	२१–००

आवश्यकतानुसार मूल्य में परिवर्तन हो सकता है।

XOXOX

श्री पीताम्बरा पीठ
ह्रीं
दतिया (म.प्र.)